# मराठी

# बालभारती

## इयत्ता सातवी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.


(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# बालभारती

## इयत्ता सातवी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

BN3TSI

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**

श्री. शिवाजी तांबे
डॉ. सुजाता महाजन

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ

**मुखपृष्ठ** : आभा भागवत

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/22,000

**मुद्रक** : M/S. KALPANA ART PRINTERS,
AURANGABAD

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्‌यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता सातवीच्या वर्गात स्वागत आहे. 'बालभारती' हे मराठी भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! इयत्ता सातवीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपली एकमेकांबरोबर संवाद साधण्याची मुख्य भाषा आहे. ती आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्य प्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचा परिचय तुम्हांला करून दिला आहे. भाषेचा व्यवहारात कसा उपयोग होतो, याचेही नमुने दिले आहेत. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांची तुम्हांला ओळख व्हावी म्हणून बोलीभाषेतील उतारेही दिले आहेत. ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक भाषिक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात 'वाचा', 'चर्चा करूया', 'विचार करा, सांगा', 'खेळ खेळूया', 'खेळूया शब्दांशी', 'माहिती मिळवूया', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'कल्पक होऊया', 'माझे वाचन' यांसारख्या अनेक कृती दिल्या आहेत. त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. संगणक, मोबाईल या माध्यमांचा वापर करूनही तुम्हांला काही कृती करायच्या आहेत. या कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येईल.

तुमच्या कल्पकतेला आणि विचारांना चालना देणाऱ्या या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला जरूर कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ मार्च, २०१७, गुढीपाडवा
भारतीय सौर : ७ चैत्र १९३९

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : प्रथम भाषा मराठी सातवी

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- |
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>➢ आपल्या भाषेत बोलण्याची तसेच चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ गटात कार्य करताना आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे–घेणे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ मराठीबरोबरच आपल्या भाषेतील साहित्य वाचण्याची तसेच लिहिण्याची सुविधा आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>➢ आपल्या परिवाराशी आणि समाजाशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ आपली भाषा वाचत असताना लिहिण्याच्या संदर्भातील क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, अनौपचारिक पत्र, कोडे, संस्मरण इत्यादी.<br>➢ सक्रिय आणि जागरूक असण्यासाठी तयार केले जाणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्र, पत्रिका, चित्रपट आणि दृकश्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची संधी दिली जावी.<br>➢ कल्पनाशक्ती आणि सृजनशीलतेचा विकास करण्याच्या क्रिया. उदा., अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सृजनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित लिखित साहित्य आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>➢ शाळा/विभाग/इयत्ता यांची पत्रिका/भित्तिपत्रिका तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.<br>➢ भाषा समृद्धीसाठी बालसाहित्याबरोबरच इतर साहित्याचा संग्रह करणे व त्याचे सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी. | 07.01.01 विविध लेखनप्रकारांमध्ये लेखकाने मांडलेले विचार/आशय समजून घेतात, आशयाशी संबंधित स्वत:च्या अनुभवांवर आधारित साम्य, सहमती वा असहमती व्यक्त करतात.<br>07.01.02 कोणतेही चित्र/घटना, प्रसंग पाहून त्याचे स्वत:च्या पद्धतीने तोंडी किंवा लेखी स्वरूपात वर्णन करतात.<br>07.01.03 वाचलेल्या साहित्यावर चिंतन करून अधिक चांगल्या पद्धतीने आकलन होण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात.<br>07.01.04 परिसरातील लोककथा, लोकगीते आणि बोलीभाषा यांविषयी चर्चा करतात व त्यांचा आस्वाद घेतात.<br>07.01.05 विविध कला (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) यासंबंधी जिज्ञासा व्यक्त करतात, त्या समजून घेण्याचा प्रयत्न करतात, त्यांचा आस्वाद घेतात.<br>07.01.06 वेगवेगळ्या स्थानिक, सामाजिक आणि भौगोलिक घटनांसंबंधी तर्कशुद्ध प्रतिक्रिया देतात. उदा., पावसाळ्यात सर्व परिसर हिरवागार होणे, याविषयी चर्चा करतात.<br>07.01.07 विविध संवेदनशील मुद्द्यांविषयी स्वत:चे तार्किक विचार तोंडी/लेखी स्वरूपात व्यक्त करतात.<br>07.01.08 विविध साहित्यांतील नवीन शब्द, म्हणी, सुविचार यांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा आस्वाद घेतात, वापर करतात, पाठ्यघटकाची वैशिष्ट्ये शोधतात.<br>07.01.09 कथा, कविता वाचून त्यांचे विविध प्रकार व शैली ओळखतात, त्यांचा आस्वाद घेतात. उदा., वर्णनात्मक, चरित्रात्मक.<br>07.01.10 कोणताही पाठ्यविषय समजून घेताना आवश्यकतेनुसार सहकारी मित्र व शिक्षक यांची संदर्भसाहित्यासाठी मदत घेतात. (उदा., शब्दकोश, इंटरनेट, इतर संदर्भ स्रोत इत्यादी.)<br>07.01.11 भाषेतील बारकावे/लेखन नियमव्यवस्था तसेच नवीन शब्दांचा प्रयोग करतात. उदा., एखाद्या कवितेत आलेले विशेष शब्द, कडवे यांमध्ये भर घालतात, त्याबाबत संकल्पना चित्र तयार करतात.<br>07.01.12 वेगवेगळ्या प्रसंगांत/संदर्भांत सांगितले जाणारे इतरांचे विचार, गप्पा स्वत:च्या शैलीत लिहितात. उदा., आपल्या गावातील चावडीवरील गप्पा किंवा आपल्या परिसरातील वेगवेगळे कार्य करणाऱ्या लोकांविषयीच्या गप्पागोष्टी.<br>07.01.13 मराठी भाषेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य (उदा., बातमीपत्र, बातम्या, कथा, माहितीपर साहित्य, इंटरनेटवर प्रसारित होणारे साहित्य इत्यादी.) समजपूर्वक वाचतात व त्याबाबत आपली आवडनिवड लिखित स्वरूपात स्वत:चे विचार व्यक्त करतात. |

| | |
|---|---|
| ➢ परिपाठ व इतर कार्यक्रमांतून सुविचार, कथा, विविध विषय मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>➢ परिसरातील बोलीभाषांची माहिती मिळवून त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>➢ परिसरातील विविध ठिकाणे, भेटणाऱ्या विविध व्यक्ती यांबाबत विचार मांडण्याची संधी दिली जावी. | 07.01.14 विविध विषय आणि उद्देशांसाठी लिहिताना उपयुक्त शब्द, शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी, विरामचिन्हे व इतर व्याकरणीय घटकांचा उपयोग करतात, त्यांचा संग्रह करतात.<br>07.01.15 भित्तिपत्रिका लेखनासाठी विविध प्रकारचे साहित्य जमवतात व संपादन करतात.<br>07.01.16 घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकतात, त्यात सहभागी होऊन आपले मत मांडतात.<br>07.01.17 विनोद, गाणी, कविता, कथा व संवाद ऐकून आनंद घेतात, या साहित्याच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकून त्याचा आस्वाद घेतात.<br>07.01.18 पाठ्यविषय (गाणी, कविता, समूहगीते) योग्य अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह म्हणतात, त्यांचे साभिनय सादरीकरण करतात.<br>07.01.19 घर, शाळा, समाज व परिसर यांमध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांत सहभागी होतात.<br>07.01.20 योग्य आरोह-अवरोह व विरामचिन्हे यांची दखल घेऊन, अर्थपूर्ण प्रकट वाचन करतात व दिलेल्या वेळेत योग्य गतीने समजपूर्वक मूकवाचन करतात.<br>07.01.21 दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून योग्य शीर्षक देतात.<br>07.01.22 विविध साहित्यप्रकारांचे साभिनय वाचन करतात.<br>07.01.23 लेखन नियमांनुसार वेळेत, योग्य गतीने अनुलेखन व श्रुतलेखन करतात.<br>07.01.24 विविध क्षेत्रांतील व्यक्तींची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करतात.<br>07.01.25 शब्दकोश संदर्भासाठी पाहतात, स्वत:चा शब्दकोश तयार करण्याचा प्रयत्न करतात.<br>07.01.26 परिसरातील सामाजिक समस्यांची माहिती घेतात, त्याबाबत आपले मत मांडतात.<br>07.01.27 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., सामान्यरूप, क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये, केवलप्रयोगी अव्यये, वाक्य व वाक्यांचे प्रकार, शुद्धलेखनाचे नियम. |

## संकेतस्थळे

http://youtu.be/Bot98Qrh2ls
http://youtu.be/lejNM8QGuP4
http://youtu.be/mv_UMoxTvfQ
http://youtu.be/m5iT7CO7s5M
http://youtu.be/pG51VfA2lWI
http://youtu.be/efc6MdWcuH4
http://www.marathikavita.co.in
https://en.m.wikipedia.org/wiki/Sudha_Murthy
http://youtu.be/XwY2k3ocNZI
http://youtu.be/2p1bxOFM0tY
http://youtu.be/1b8O1goYM6o
http://youtu.be/6FTBrtifKYQ
https://en.m.wikipedia.org/wiki/Pandurang_Sadashiv_Khankhoje
http://www.aathavanitligani.com/Song/Anaam_Veera_Jithe_Jahala

**चौकटीत दिलेल्या संकेतस्थळांचा व लिंक्सचा शिक्षकांनी अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.**

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | जय जय महाराष्ट्र माझा (गीत)<br>– राजा बढे | १ |
| २. | स्वप्नं विकणारा माणूस<br>– अशोक कोतवाल | २ |
| ३. | तोडणी<br>– दत्तात्रय विरकर | ९ |
| ४. | श्रावणमास (कविता)<br>– बालकवी | १५ |
| ५. | भांड्यांच्या दुनियेत | १९ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ६. | थोरांची ओळख – डॉ. खानखोजे | २६ |
| ७. | माझी मराठी (कविता)<br>– मृणालिनी कानिटकर–जोशी | ३० |
| ८. | गचकअंधारी<br>– अशोक मानकर | ३३ |
| ९. | नात्याबाहेरचं नातं<br>– सुभाष किन्होळकर | ३९ |
| १०. | गोमू माहेरला जाते (गीत)<br>– ग. दि. माडगूळकर | ४५ |


## भाग – ३


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ११. | बाली बेट<br>– पु. ल. देशपांडे | ४९ |
| १२. | सलाम–नमस्ते !<br>– सुधा मूर्ती | ५५ |
| १३. | अनाम वीरा... (कविता)<br>– कुसुमाग्रज | ६० |
| १४. | कवितेची ओळख<br>– शारदा दराडे | ६४ |
| १५. | असे जगावे (कविता)<br>– गुरू ठाकूर | ७० |



## भाग – ४


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १६. | कोळीण<br>– मारुती चितमपल्ली | ७४ |
| १७. | थेंब आज हा पाण्याचा (कविता)<br>– सुनंदा भावसार | ८० |
| १८. | वदनी कवळ घेता... | ८५ |
| १९. | धोंडा<br>– डॉ. संजय ढोले | ९० |
| २०. | विचारधन | ९९ |
| २१. | संतवाणी<br>– संत नरहरी सोनार,<br>संत कान्होपात्रा | १०० |


मुखपृष्ठावर ब्लू मॉरमॉन हे महाराष्ट्राचं राज्य फुलपाखरू पुस्तकरूपी फुलांतून मकरंदाचा आस्वाद घेताना दाखवलं आहे. शीर्षकपृष्ठावर हेच फुलपाखरू चिखलावर बसलेलं दाखवलं आहे. फुलपाखरं चिखलातूनही क्षार घेतात!

# १. जय जय महाराष्ट्र माझा

भाग–१



• ऐका. वाचा. म्हणा.

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ.।।

रेवा वरदा, कृष्ण कोयना, भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीमथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ।।१।।

भीति न आम्हां तुझी मुळीही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला, जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिव शंभू राजा
दरीदरींतुन नाद गुंजला, महाराष्ट्र माझा ।।२।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देशगौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तक्त राखितो महाराष्ट्र माझा ।।३।।

**राजा बढे** (१९१२–१९७७) : प्रसिद्ध कवी, लेखक, गीतकार, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार. 'माझिया माहेरा जा', 'हसले मनी चांदणे', 'क्रांतिमाला', 'मखमल' इत्यादी गीतसंग्रह प्रसिद्ध; 'गीतगोविंद', 'गाथासप्तशती', 'मेघदूत' इत्यादी काव्यांचे अनुवादही प्रसिद्ध.

प्रस्तुत गीतातून कवीने महाराष्ट्राची थोरवी सांगितली आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून समूहगीत तालासुरांत म्हणून घ्यावे. इतर समूहगीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. स्वप्नं विकणारा माणूस

**अशोक कोतवाल** (१९६१) : 'मौनातील पडझड', 'कुणीच कसे बोलत नाही' हे कवितासंग्रह; 'प्रार्थनेची घंटा', 'सावलीचं घड्याळ' हे ललितलेखसंग्रह; 'घेऊया गिरकी' हा बालकवितासंग्रह प्रसिद्ध.

प्रत्येक मनुष्य आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी सतत धडपडत असतो. स्वहिताबरोबरच समाजाच्या उपयोगी पडणारी व उदात्त हेतू असणारी स्वप्ने पाहावीत, असा संदेश पाठातून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'सावलीचं घड्याळ' या ललितलेखसंग्रहातून घेतला आहे.

माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत. नुसतीच बघता आली पाहिजेत असं नाही, तर ती पूर्ण कशी होतील याचा विचार करता आला पाहिजे. असं आपणच नाही, तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ असे सगळेच लोक म्हणत असतात. आता स्वप्नं ही निर्माण करावी लागतात, की ती उत्पन्न होतात हे आपल्याला माहीत नाही. स्वप्नांविषयी लोक काय काय बोलतात ! कुणी कुणी तर स्वप्नांना भलतंच तुच्छ लेखतात. 'भलती-सलती स्वप्नं पाहू नकोस', असा सल्लाही देतात.


माझं तर म्हणणं असं आहे, ज्याला स्वप्न बघता येत नाही तो माणूसच नाही ! जे स्वप्न आपल्याला समृद्ध करतं, ते बघण्यासाठी संवेदनशील मन असावं लागतं. ज्यांच्याकडे असं तीव्र संवेदनशील मन असतं, ती माणसं आपल्या स्वप्नपूर्तीसाठी वाट्टेल ते करतात. इतरांपासून आपल्याला वेगळं करतात. स्वत: काहीतरी आदर्श बनून ते वावरतात, नाहीतर इतरांना आदर्श बनवतात; पण अशा संवेदनशीलतेचा अभाव असणारी माणसं अधांतरीच तरंगत राहतात. ना धड इकडे, ना धड तिकडे अशीच त्यांची अवस्था असते. लोक तिलाच स्वप्नाळू वृत्ती म्हणत असावेत ! बिना ध्यास नि बिना धडपडीशिवाय असलेली ही स्वप्नाळू वृत्ती तशी घातकच, नाही का ? बालपणी आम्हांला स्वप्नांचा खरा अर्थही काही कळत नव्हता; पण स्वप्न या शब्दाशी आमचा परिचय झालेला होता. रात्री झोपलो म्हणजे आपल्याला झोपेत जे दिसतं, ते स्वप्न असतं आणि ते काही खरं नसतं, असं आम्हांला माहीत झालं होतं.

### तुम्ही काय कराल ?



- तुम्ही चांगले धावपटू आहात. शाळेच्या क्रीडासंमेलनात धावण्याच्या स्पर्धेत पहिले बक्षीस मिळवायचे, हे तुमचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण होण्याकरिता तुम्ही कोणते प्रयत्न कराल ?

आमच्या लहानपणी कोण्या एका गावाकडून एक स्वप्नं विकणारा माणूस घोड्यावर बसून आमच्या गावाकडे यायचा. त्याच्या घोड्याचा 'टबडक् टबडक्' आवाज आला, की आम्ही आवाजाच्या दिशेनं धावत जायचो. आमचं आकर्षण 'घोडा बघणं' हे असायचं; पण घोड्यासोबत मिशीतल्या मिशीत हसणाऱ्या त्या माणसालाही बघणं व्हायचं. तलम रेशमी धोतर, त्यावर तसाच जरीचा सैलसर कुडता, डोक्याला लाल-पांढरा फेटा, डोळ्यांवर चश्मा, पायांत चामडी बूट, गव्हाळ रंगाचा, झुबकेदार मिश्या असलेला हा माणूस होताही तसाच धिप्पाड. या स्वप्नं विकणाऱ्या माणसाची आम्हांला गंमतच वाटायची, शिवाय कुतूहलपण. त्यानं घोड्याच्या पाठीवर ठेवलेल्या मखमली कापडातल्या गाठोड्याकडे आम्ही कुतूहलानं बघायचो.



हा माणूस आमच्या गावच्या पिंपळाच्या पारावर थांबायचा. पाराला असलेल्या लोखंडी कडीला आपला घोडा बांधायचा. घोड्याच्या पाठीवर आणलेलं मखमली कापडातलं गाठोडं जवळ घेऊन, चामडी पिशवीतलं पाणी घटाघटा प्यायचा आणि मग ऐटीत झाडाच्या पारावर बसायचा, तेव्हा त्याच्याभोवती माणसांचा गराडा पडे. त्यानं आजवर घोड्यावरून खूप प्रवास केलेला होता. कित्येक प्रदेश पाहिले होते, कित्येक डोंगरदऱ्या तुडवल्या होत्या, भिन्न स्वभावांची आणि भिन्न संस्कृतींची माणसं पाहिली होती, त्यामुळे त्याच्याकडे बोलण्यासारखं खूप काही असायचं. त्यानं अनुभवलेलं समृद्ध विश्व तो वेगवेगळ्या किश्शांनी रंगवून, फुलवून सांगायचा. लोक त्याच्या गप्पांमध्ये स्वत:ला विसरून जायचे. त्याचं ते भलतंच दिलखेच बडबडणं आणि स्वप्नात धुंद गुंगवणं लोकांना भारी आवडायचं. ऐकताना लोकांची मती कुंठित व्हायची. आपण ऐकतोय ते खरं की खोटं या संभ्रमात ते पडायचे.

ऐकताना लोक तल्लीन होऊन जायचे. त्याच्या त्या अनुभवी बोलांतून लोकांना निरनिराळ्या प्रांतांची, रीतीरिवाजांची माहिती व्हायची. त्यानं वर्णन केलेल्या प्रांतात ते मनानंच भटकून येत. जणू काही आपण स्वप्नातच आहोत, असं त्यांना वाटत राहायचं. मग बऱ्याच वेळानं तो, ते मखमली कापडात बांधलेलं गाठोडं हळूच सोडायचा. त्यात काजू, बदाम, किसमिस, वेलदोडे, सुपारी, खारीक, खोबरं वगैरे असायचं. नाही म्हटलं, तरी लोक घासाघीस करून छटाक-पावशेर विकत घ्यायचेच ! कधीकधी तो गाठोड्यातला खाऊ सगळ्या टिंगू

मुलांना मूठमूठ वाटून द्यायचा. आम्हीही त्याच्यावर भलतेच खूश व्हायचो.

तो निघून गेल्यावर मग लोक म्हणत, 'हा बडबड्या आला, की आपल्यात तरतरी पेरून जातो. त्याच्या बोलण्यानं जगाची ओळख झाल्यासारखं वाटतं. आपलं दु:ख काही काळापुरतं का होईना विसरल्यासारखं होतं. गोडगोड बोलून तो जसं त्याचं स्वप्नच आपल्या डोळ्यांत उतरवून जातो...' पुढे मग लोक त्याला 'सपनविक्या'च म्हणू लागले. त्यालाही त्याचं काहीच वाटेना. तोही मग गमतीनं 'सपन घ्या, सपन' म्हणतच गावात शिरायचा आणि लोकांना रिझवून सुकामेवा विकायचा.

काय झालं कळलंच नाही; पण अचानकच सपनविक्या गावात यायचा बंद झाला. आम्ही रोज त्याची आतुरतेनं वाट पाहायचो; पण तो यायचाच नाही. कधीतरी त्याचा विषय निघायचा अन् गावातले सगळे लोक त्याच्याविषयी भरभरून बोलायचे. महिने, वर्षं उलटून गेली.

एके दिवशी अचानक, एक तरुण गावात आला. गावातल्या पारावर बसला. गावातील पारावर बसलेले लोक त्याच्याकडे टकामका पाहू लागले. तो तरुण सपनविक्यासारखाच दिसत होता. तोच चेहरा, तीच अंगकाठी, जणू सपनविक्याच गावात आला होता. आम्ही सगळी मुलं पाराजवळ जमलो. आमच्या गावातल्या सगळ्यांत वृद्ध तात्यांनी त्याला विचारलं, ''कोण रे बाबा तू? कुठून आलास?''

तो म्हणाला, ''मी तुमच्या सपनविक्याचा मुलगा. गुडघेदुखीच्या त्रासामुळे बाबा बऱ्याच वर्षांपासून गावोगावी जाऊ शकत नाहीत; पण खरं सांगू का? गावांत जाणं, तिथल्या लोकांना एकत्र जमवणं, त्यांच्याशी बोलण्यासाठी सुकामेवा विकणं हे केवळ बाबांचं एक निमित्त होतं. त्यातून त्यांना खूप आनंद मिळत असे. 'आपले अनुभव, आपल्याजवळचं ज्ञान इतरांना सांगावं, दुसऱ्यांना आनंद द्यावा' असं माझ्या वडिलांचं स्वप्न होतं. लोकांची सेवा करण्याचा त्यांचा हा मार्ग मला खूप खूप आवडला. नुकतंच माझं वैद्यकीय शिक्षण पूर्ण झालं आहे. गावोगावी जाऊन वृद्ध, आजारी लोकांची सेवा करायची, असं मी मनोमन ठरवलं आहे. बाबांचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच मी तुमच्या गावात आलो आहे.''

त्याचा आवाज, बोलण्याची ढब, हसणं आम्हांला सपनविक्याची तीव्र आठवण देऊन गेलं. आम्ही सगळे गहिवरून गेलो. काय बोलावं हे कोणालाच समजेना. असंही स्वप्न असतं, एखादा माणूस असंही स्वप्न पाहू शकतो, हे नव्यानंच आम्हांला उमगलं होतं.

***

## स्वाध्याय



**प्र. १. तुमचे मत स्पष्ट करा.**

(अ) गावात येणाऱ्या माणसाला गावकरी 'सपनविक्या' म्हणत.

(आ) स्वप्नं विकणाऱ्या माणसाचा गावात येण्यामागचा उद्देश.

**प्र. २. स्वप्नं विकणाऱ्या माणसाचे खालील मुद्द्यांच्या आधारे दोन-दोन वाक्यांत वर्णन करा.**

स्वप्नं विकणारा माणूस

- त्याचा पेहराव
- त्याचे बोलणे
- त्याचे स्वप्न

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी, तसेच या कथेचे सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या विविध कथांचा संग्रह करून घ्यावा. त्या कथांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे.

**प्र. ३. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) स्वप्नाविषयी लेखकाचे मत

(आ) स्वप्नाविषयी इतरांचे मत

(इ) स्वप्नं विकणाऱ्या माणसाजवळील गाठोड्यातील वस्तू

(ई) स्वप्नं विकणाऱ्याचे किस्से ऐकणाऱ्यांचे फायदे

**प्र. ४. स्वप्नं विकणारा माणूस गावात आल्यापासून गाठोडे सोडेपर्यंतच्या घटनांचा ओघतक्ता तयार करा.**

उदा., (१) पिंपळाच्या पारावर थांबणे.

(२)

(३)

(४)

**प्र. ५. कल्पना करा व लिहा.**

स्वप्नं विकणारा माणूस तुम्हांला भेटला आहे व त्याच्याशी तुमचा संवाद झाला आहे.



**चर्चा करूया.**



झोपेत असताना आपणांस स्वप्नं का पडत असतील, याबाबत विचार करा. घरातील मोठ्या व्यक्तींशी किंवा मित्रांबरोबर याविषयी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) पार–झाडाच्या बुंध्याजवळ बसण्यासाठी सभोवताली बांधलेला ओटा, पार–पलीकडे. असे 'पार' या शब्दाचे दोन अर्थ होतात. लक्षात ठेवा–संदर्भानुसार शब्दांचे अर्थ बदलू शकतात. खालील शब्दांचे प्रत्येकी दोन अर्थ लिहा.**

(अ) हार (आ) कर (इ) वात

**(आ) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) मती कुंठित होणे. | (अ) कंठ दाटून येणे. |
| (२) तरतरी पेरणे. | (आ) विचारप्रक्रिया थांबणे. |
| (३) गहिवरून येणे. | (इ) उत्साह निर्माण करणे. |


**(इ) खाली दिलेल्या शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

(अ) कुतूहल (आ) संभ्रम (इ) ढब (ई) आतुरतेने

**उपक्रम :**

(१) 'या बालांनो या रे या' हे गीत मिळवा व परिपाठात सादर करा.

(२) तुमच्या गावात/परिसरात येणाऱ्या अशा काही व्यक्ती आहेत, ज्यांची तुम्ही आतुरतेने वाट पाहत असता. उदा., फुगेवाला, आइस्क्रीमवाला. अशा एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.



## खेळ खेळूया.

चला मुलांनो, आज आपण एक छानसा खेळ खेळूया. तुम्हांला दिलेल्या अक्षराने सुरू होणाऱ्या गावाचे नाव सुरुवातीला लिहायचे आहे. त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या दुसऱ्या गावाचे नाव लिहायचे. पुन्हा एकदा त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या तिसऱ्या गावाचे नाव लिहायचे. आता तिसऱ्या गावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे गावाचे नाव लिहायचे; पण अशा गावाचे नाव लिहायचे आहे, ज्याचे शेवटचे अक्षर 'र' असेल. बघूया जमते का ते!

> अशाप्रकारे मुले, मुली, फळे, फुले, पक्षी, प्राणी यांची नावे घेऊन गटागटांत हा खेळ खेळता येईल. यातून तुमची शब्दसंपत्ती वाढेल.

उदा., **स** – सोलापूर
**र** – रांजणगाव
**व** – वडनेर
**र** – रावेर

(१) **म** ________
________
________
________ **र**

(२) **ख** ________
________
________
________ **र**

(३) **क** ________
________
________
________ **र**

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

मी शाळा जातो.

मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो.

(२) रेश्मा पालीला घाबरते.

(३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये,

| नाम | + | प्रत्यय |
|---|---|---|
| मित्र | + | -शी |
| पाल | + | -ला |
| दुकान | + | -त |

मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला,-त,-ने,-शी,-चा,-ची,-चे इत्यादी.

**लक्षात ठेवा :** काही वेळा शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाच्या रूपात बदल झालेला दिसत नाही. उदा., खिडकी, खोली यासारखी ईकारान्त स्त्रीलिंगी नामे.

- **आता एक मजेदार खेळ खेळूया.**

शब्दाचे सामान्यरूप न करता काही वाक्ये तयार करा. ती मोठ्याने वाचा. नंतर सामान्यरूपासह ती पुन्हा तयार करा. लिहिताना एक गोष्ट नीट लक्षात ठेवा, की सामान्यरूपातला शब्द आणि त्याचे प्रत्यय जोडूनच लिहायचे असतात. उदा., रवी ने पाल ला मारले. ✗

रवीने पालीला मारले. ✓

घोडा, माळ, पाल, घर, दुकान ही सामान्यनामे आहेत; पण अंजली, सुजाता, राजीव ही विशेषनामे आहेत. विशेषनामांना प्रत्यय लावताना त्यांचे सामान्यरूप होत नाही. उदा., अंजलीला, सुजाताला, राजीवला.

बोलींमध्ये आणि जुन्या मराठीत विशेषनामांची सामान्यरूपे दिसतात. आज ती कमी होत चालली आहेत. पौराणिक पात्रांची नावे मात्र सामान्यरूपात लिहितात. रामाने, दशरथाने, सीतेने, कृष्णाने इत्यादी; पण हीच नावे आताच्या जगातल्या माणसांची असतील, तर सहसा सामान्यरूप होत नाही हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.

✻ आडनावांचे सामान्यरूप होते. उदा., गायकवाडांना, सान्यांना, जोगळेकरांना वगैरे; पण लिहिताना शक्यतो सामान्यरूप न वापरता 'गायकवाड यांना', 'साने यांना' असे लिहितात.

✻ गावांच्या, राज्यांच्या नावांचेही सामान्यरूप होते. उदा., गोवा-गोव्याला, बडोदा-बडोद्याला, पुणे-पुण्याला.

ईकारान्त व अकारान्त ग्रामनामे बऱ्याचदा बदलत नाहीत, हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) ही माझी नवी छोटी शाळा.

या वाक्यात 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' हे सारे शब्द 'शाळा' या नामाची विशेषणे आहेत.

आता हे वाक्य वाचा.

(२) ह्या माझ्या नव्या छोट्या शाळेत क्रीडांगणसुद्धा आहे.

तुमच्या लक्षात आले का, 'शाळा' या नामाला प्रत्यय लागल्यावर 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' ह्या विशेषणांचे रूपसुद्धा बदलले. ते शब्द 'ह्या, 'माझ्या' 'नव्या', 'छोट्या' असे बदलले. याला विशेषणाचे सामान्यरूप म्हणतात. जेव्हा नामाचे सामान्यरूप होते तेव्हा विशेषणांचेपण सामान्यरूप होते; पण त्यांना कुठलाही वेगळा प्रत्यय लागत नाही.

- **आता तुम्ही या उदाहरणाप्रमाणे खालील तक्ता पूर्ण करा.**

| ही | माझी | नवी | छोटी | शाळा | ह्या | माझ्या | नव्या | छोट्या | शाळेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | पुस्तक | - | - | - | - | पुस्तकात |
| - | - | - | - | पंखा | - | - | - | - | पंख्याला |
| - | - | - | - | पुस्तके | - | - | - | - | पुस्तकांमध्ये |

तुमच्या हेही लक्षात आले असेल, की नाम पुल्लिंगी असो, स्त्रीलिंगी असो वा नपुंसकलिंगी, एकवचनात असो की अनेकवचनात, त्याच्या विशेषणांचे सामान्यरूप फक्त 'या' लागून होते.

आहे ना गंमत !

- **अधोरेखित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण करा.**

| वाक्ये | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| (१) <u>रमेशचा</u> भाऊ <u>शाळेत</u> गेला. | (१)<br>(२) | | |
| (२) <u>बँकेने</u> <u>शेतकऱ्याला</u> कर्ज दिले. | (१)<br>(२) | | |
| (३) <u>सुट्टीत</u> तो <u>मित्रांशी</u> खेळतो. | (१)<br>(२) | | |
| (४) <u>मंडईत</u> <u>फळांच्या</u> गाड्या आहेत. | (१)<br>(२) | | |

# ३. तोडणी

**दत्तात्रय विरकर** (१९६५) : विविध वृत्तपत्रे व मासिके यांतून कथा व कवितांचे लेखन. वाटणी, तोडणी या कथा प्रसिद्ध. ऊसतोडणी कामगारांच्या समस्यांचे वास्तव या कथांतून मांडले आहे.

वसंत व मीरा या ऊसतोडणी कामगाराच्या मुलांच्या मनातील शिक्षणाविषयीची तीव्र ओढ प्रस्तुत पाठात व्यक्त केली आहे.

**माहिती घ्या.**

- शेतीच्या खालील कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांची माहिती घ्या व नावे लिहा.
  - (अ) खुरपणी.
  - (आ) बांध घालणे.
  - (इ) पेरणी.
  - (ई) नांगरणी.

BNVGXG

गाव सोडून गाडीत बसल्यावर सगळ्यांच्या डोळ्यांसमोर फक्त ऊस दिसत होता. निघाल्यापासून गावाकडच्या विचारानं सगळ्यांच्या मनात काहूर उठलं होतं. परक्या गावात आपण केव्हा आलो हे तारा अन् शंकरला उमगलंच नाही. सगळ्या तोडणीवाल्यांनी मराठी शाळेजवळच्या मोकळ्या जागेत गाड्या सोडल्या. बैलांच्या मानेवरचं जू खाली ठेवताच सगळी बैलं शेपटी अंगावर मारत अंग खाजवायला लागली. बायकांनी गाडीजवळच चुली पेटवल्या. बाप्या माणसांनी बैलं अन् पोरांनी बादल्या, कळश्या घेतल्या व नदीवर गेली. दामूनंही आपली बैलं नदीवरून पाणी पाजून आणली. मीरा अन् वसंतनं झिऱ्यावर पाण्यासाठी नंबर लावला होता. तारानं भाकरी थापून तव्यावर पिठलं टाकलं तेवढ्यात पोरं पाणी घेऊन आली. 'आवं पाचूंदा सोडा,' लक्ष्मीनं दिलेला आवाज दामूनं ऐकला आणि पाचूंदा सोडून गुडघ्यानं सरमड कडाकडा मोडून बैलांसमोर सारलं. तसा रामा, धोंडू, शंकर सगळ्यांनी आपआपल्या परीनं बैलांसमोर सरमड मोडून टाकलं. पिठलं-भाकरी पोटात ढकलून सगळ्यांनी अंथरुणं पसरली.

तांबडं फुटताच तारा झटकन अंग झटकून उठली. तिनं जर्मलच्या पातेल्यात चहा ठेवला. शंकर जांभई देत उठला. त्यानं अंथरुणाची वळकटी केली. तारानं तोंडावर पोचारा मारला नि बिनदांडीच्या कपात लाल चहा शंकरच्या पुढ्यात केला. 'हं घ्या, च्या घ्या.' शंकरनं चहाचा कप हातात घेतला. 'शंकर ! अरे ये शंकर...आरं मामू चिठ्ठी देऊन गेलाय, थळात जायचंय. निघाया पायजे.' दामूचा आवाज कानावर पडताच 'हा आलू.... आलू', असं म्हणून शंकरनं घटाघटा चहा पोटात ढकलला. सगळ्यांनी नदीच्या काठावर मोकळ्या रानात सामान उतरवलं अन् थळाचा रस्ता धरला. शंकर-तारानंही आपला कोयता सोबतीला घेऊन मीरा अन् वसंतला बरोबर घेतलं. आज 'ऊसतोडणी'चा पहिला दिवस असला, तरी उघड्यावर झोपून थंडीनं अंग काकडून निघतं, म्हणून दुपारीच थळातून लवकर परतायचं, असं सगळ्यांनी ठरवलं होतं. थळात पाय ठेवताच शंकरनं उसावर घाव घालायला सुरुवात केली. मीरानं मोळ्या बांधल्या. दिवस माथ्यावर केव्हा आला ते समजलंच नाही. हिरवा चारा मिळाल्यानं बैलं मस्त जोगली होती.

सगळ्यांनी वाढे टाकून शंकूच्या आकाराच्या कोप्या बांधून सामान लावलं, तसं तारानंही सामान लावून चिमणीचा उजेड करताच मीराला वसंतचं पुस्तक गवसलं. 'वश्या तुपलं पुस्तक...वश्या तुपलं पुस्तक.' मीराचा आरडाओरडा ऐकून वसंतला शाळेची आठवण झाली अन् वसंत कोपीबाहेर बसलेल्या शंकरच्या मागे जाऊन उभा ठाकला. त्यानं शंकरच्या खांद्यावर हात ठेवून विचारलं, 'दादा, मले साळांत कवा धाडणार?' थळामध्ये जोशात काम करणाऱ्या वसंतला शंकरनं पाह्यलं असल्यानं 'साळा बिळा काय बी नाय, बस

झाली आता तुपली साळा. खाऊन घे...आन् झोप. तांबड्यात तोडीला जायचं हाय. जा, झोप जा,' असं म्हणून गप्प केलं. शंकरच्या मागे उभं राहून खांद्यावर हात ठेवून विचारताना उसाच्या पाचटानं साळलेल्या अंगावरच्या खुणा पाहून वसंत हबकून गेला होता. त्याच्या मनात शिक्षणाविषयीची उलघाल होत होती. शंकरच्या बोलण्यानं वसंत उपाशीच झोपला, तर मीराला फार वाईट वाटलं.

कोपीबाहेर अंधूक उजेडात तारानं चूल शिलगावून तवा ठेवला. भाकरी थापण्याच्या आवाजानं वसंतला जाग आली. शंकरनं नदीवर जाऊन गुंडभर, तर मीरानं कळशीभर पाणी आणलं. शंकरनं थळात जायची तयारी चालवली होती. मीरानं पाट्यावर मिरचीचं वाटण वाटून आईकडे दिलं. 'मिरे अगं आवर लवकर, त्या वश्याला उटीव. आरं आवरा लवकर, गाड्या निघाल्या.' शंकरच्या आवाजानं तारानं कालवणाला फोडणी दिली. सगळ्यांच्या गाड्या वाटेला लागल्या. शंकरनंही आपली गाडी जुंपली. तारा धुडक्यात कोयता, भाकरीचं पेंडकं अन् कालवण घेऊन गाडीत बसली, तशी मीराही परकर सावरत बसली. वसंत कोपीमागं खुटून बसला होता. तारानं वसंतपाशी जाऊन समजूत काढून त्याला गाडीत बसवलं अन् गाडी फुपाट्याच्या रस्त्यानं वाटेला लागली.

शंकर आणि तारा उसावर घाव घालत होते, तर मीरा अन् वसंत त्याच्या मोळ्या बांधून सडकेला आणून टाकत होते. सडकेवर पडलेल्या कागदावर वसंतची नजर खिळली, तसा वसंतनं कागद उचलून हातात धरला; पण कागदावरच्या संस्कृतमधल्या शब्दांचा उलगडा नीट होत नव्हता. रस्त्यावर सापडलेल्या कागदावरचे शब्द वसंतनं आईला वाचायला लावताच, 'पोरा, मले तरी कुटं वाचता येतंय, मपली साळा तर दुसरीच झालीय', असं आई म्हणाली. कागदावरच्या शब्दांचा मीराकडूनच नीट उलगडा होईल याची वसंतला खात्री होती, कारण मीराचंही शिक्षण कसंबसं आठवीपर्यंत झालं होतं. तो धावत जाऊन तिला म्हणाला, ''ताई, मला सडकेवर कागद गवसला. त्यावर काय लिव्हलंय बग, काईच कळत नाईये.''

पोराचं शिक्षण अर्धवट राहायची भीती ताराच्या मनात आल्यानं तिनं शंकरला बोलतं केलं. ''पोराचं शिक्षण तोडलं तुमी, कामाला हातभार लागतो...पण त्याच्या आयुष्याचं काय?'' ''अगं व्हईल समदं, आता कुटं गाडी जरासी रुळावर आलीय.'' घाव घातलेला ऊस ताराकडे देत शंकर बोलला.

मीरानं डोक्यावरील मोळी खाली ठेवली. मीरा वसंतच्या हातातील कागद पाहू लागली. वसंत



उत्कंठतेनं मीराकडे बघत होता. ''ही वळ व्हय? हे तर संस्कृतमधलं वाक्य हाय. 'तमसो मा ज्योतिर्गमय' असं लिव्हलंय,'' मीरा म्हणाली. ''म्हणजे काय गं ताई?'' वसंतनं विचारलं. ''तमसो मा ज्योतिर्गमय, म्हंजी अंधारातून उजेडाकडं,'' मीरानं सांगून टाकलं. ''म्हंजे ग ताई?'' पुन्हा वसंतनं विचारलं. ''आता तुला कसं सांगू? हे बघ वश्या, तुला संस्कृतमधलं वाक्य वाचता आलं न्हाई म्हंजी अंधार, अन् पुढल्या वर्गात जाऊन शिकलास तर ...'' मीराचं बोलणं पुरं व्हायच्या आतच ''तर काय व्हईल?'' वसंतनं विचारलं. ''तर वाचता येईल म्हंजी उजेड, म्हंजी अंधारातून प्रकाशाकडं,'' असं म्हणत मीरा माघारी फिरली. तितक्यात वसंतनं मीराचा हात धरून थांबवत म्हटलं, ''अगं, पण दादानंच शिक्षण तोडलं तवा वाचायला तरी कसं येणार? ताई, काही झालं तरी मी शिकणारच.'' त्यांचं हे बोलणं ऐकून

तडातडा तुटणाऱ्या उसागत वसंतचंही शिक्षण तुटत असल्याची जाणीव शंकरला झाली.

बाजार असल्यानं आज 'तोडणी' बंद होती. आजूबाजूच्या कोप्यावरली सारी पोरं शाळेत गेल्यानं वसंत एकटाच कोपीबाहेर बसून काय करावं, या विचारात होता. शेजारच्या कोपीतून दामूची बायको लक्ष्मी कालवणाच्या फोडणीचं वाटण वाटायला बाहेर आली. पाट्यावर मीठमिरची वाटता वाटता लक्ष्मीनं वसंतकडे पाहिलं. ''वश्या, तू आज साळंला न्हाई गेलास व्हय रं?'' वसंतनं हातातला खडा खाली फेकत 'कसा जाणार?' म्हणत मानेला झटका देत तो कोपीत शिरला. ''आवं ओ वसंताची माय,'' असं म्हणत लक्ष्मीनं ताराला साद घातली. ''आले ओ माय... आले...आले,'' म्हणत खाली वाकत कोपीबाहेर आलेल्या ताराला पाहून ''आवं समदी लेकरं साळंला गेली, आन् तुपलं?''

वाटणाची परात हातात घेत लक्ष्मी उभी राहिली. बाजार घेऊन आलेल्या दामू अन् शंकरकडे लक्ष्मीची नजर जाताच शंकरकडे हात दाखवत, ''हे बघा, यास्नीच इचारा की, का साळंला गेला न्हाई म्हणून,'' लक्ष्मीकडे पाहत तारा उत्तरली. लक्ष्मीनं शंकरकडे नजर लावून, ''कावं भावजी, आपल्या समद्यांची पोरं साळंला जात्यात, मग याला कशापाई घरी ठिवलं? त्याचं शिकायचं वय हाय तर शिकू द्या की, मोटा झाला की कामच करणार हाय.''

''व्हय व्हय, म्या बी त्येच म्हंती. हिचं बी शिकणं अर्धंच ऱ्हायलं.'' मीराच्या डोक्यावरून हात फिरवत तारानं लक्ष्मीच्या बोलण्याला साथ दिली. तारानं स्वत:च्या शिक्षणाची आबाळ झाल्याचं म्हणत मीराच्या शिक्षणाची स्तुती केली अन् शंकरला म्हणाली, ''आवं ही लक्ष्मी माय काय म्हंतीया ते तर बघा. वश्याला साळंला घाला म्हंतीया. थोडंसं पैकं कमी मिळंल, पण तो आपल्यासारखा अडाणी तर न्हाई ना ऱ्हाणार. जाऊ द्या त्यास्नी साळंला.'' शंकर म्हणाला, ''लक्ष्मी वैणी समदं खरंय, पण...'' हातातली बाजाराची थैली ताराकडे देत शंकरनं मान फिरवली. ''आता पनबीन काय बी सांगू नगंस. उद्यापास्नं त्येला साळंला धाड.'' सगळं बोलणं ऐकल्यानं दामूनं तोंड उघडलं. कोपीबाहेर चाललेलं सगळं बोलणं आपल्याविषयी असल्यानं वसंतला उभारी आली अन् तो कोपीबाहेर येऊन उभा राहिला. ''आता समदीच म्हणत्यात तर जाऊ द्या, नाई म्हणू नका. पुढला इचार करा.'' तारा म्हणाली. वसंतकडे पाहत 'ये, पोरा ये' म्हणून त्याला जवळ घेत तारानं वसंतला कुरवाळलं.

''आता तुमी समदीच म्हंत्यात तर म्या तरी कशाला आडवा येवू? वसंता, ये इकडं पोरा. आता तू उद्यापास्न साळंला जायचं बरं का! हे बघ पुढल्या बाजारी आपण तुझ्यासाठी पेन आणू.'' वसंतला जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवत शंकर म्हणाला. मीराच्याही आनंदाला पारावार राहिला नाही. तिचेही डोळे पाण्यानं भरले. वसंतनं लगेच मित्रांना गाठलं. 'आता म्या साळंला येणार,' असं वसंत सगळ्यांना सांगत सुटला.



***

**प्र. १. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) मीराने वसंतला 'तमसो मा ज्योतिर्गमय'चा सांगितलेला अर्थ.

(आ) वसंतच्या मनातील शिक्षणाची ओढ.

(इ) 'अगं, पण दादानंच शिक्षण तोडलं तवा वाचायला तरी कसं येणार?' या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ.

**प्र. २. वसंतचे शिक्षणाबाबतचे प्रेम दर्शवणारी वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

**प्र. ३. खालील आकृतीत योग्य शब्द लिहा.**

(अ) बैलांचे खाद्य. [ ]

(आ) शंकूच्या आकाराची झोपडी. [ ]

**प्र. ४. तुम्हांला कथेतील कोणते पात्र सर्वांत जास्त आवडले? सकारण सांगा.**

**प्र. ५. खालील आकृती पूर्ण करा.**

मराठी शाळेजवळच्या मोकळ्या मैदानात गाड्या सोडल्यावर खालील व्यक्तींनी काय काय केले?

मीरा, वसंत | इतर बायका | दामू | तारा

## खेळूया शब्दांशी.

**(अ) गटात न बसणारा शब्द शोधून लिहा.**

(१) श्रीमंत, धनवान, गरीब, लखपती.

(२) रात्र, निशा, प्रभात, यामिनी.

(३) अशिक्षित, निरक्षर, अंगठाबहाद्दर, शिक्षित.

(४) गवसणे, मिळणे, हरवणे, सापडणे.

**(आ) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांच्या रूपात योग्य बदल करून वाक्ये पुन्हा लिहा.**

(आनंदाला पारावार न उरणे, हबकून जाणे, हातभार लावणे, आबाळ होणे.)


(१) वडिलांच्या नोकरीनिमित्त सतत होणाऱ्या बदल्यांमुळे केशवच्या शिक्षणाची .............. .

(२) गावाहून आलेल्या आजीला पाहून नंदाच्या.............. .

(३) सिमरन आईला घरातल्या कामांसाठी.............. .

(४) रस्त्यावर जोरजोरात भुंकणाऱ्या कुत्र्यांना पाहून रेश्मा.............. .

**(इ) खालील शब्दांना 'पर' हा एकच शब्द जोडून नवीन अर्थपूर्ण शब्द तयार होतात. ते बनवा. मराठी भाषेतील अशा विपुल शब्दसंपत्तीचा अभ्यास करा. त्याप्रमाणे वेगवेगळे शब्द तयार करा.**




उदा.,परप्रांत.

**(ई) खालील शब्दांत लपलेला अर्थ शोधून लिहा.**

(१) तांबडं फुटलं.

(२) गाडी रुळावर आली.

(३) अंधाराकडून उजेडाकडे.

(४) चूल शिलगावली.

**(उ) खालील वाक्ये प्रमाणभाषेत लिहा.**

(१) ' पोरा, मले तरी कुटं वाचता येतंय. '


(२) ''अवं समदी लेकरं साळंला गेली आन् तुपलं?''

(३) ''आता तुमी समदीच म्हंत्यात तर म्या तरी कशाला आडवा येवू?''

(४) ' आता म्या साळंला येणार. '

**(ऊ) खालील विषयासंदर्भात तुमच्या मनातील भावना व्यक्त करा.**








**लिहिते होऊया.**

- **या पाठात ग्राम जीवनातील काही शब्द आलेले आहेत, त्याची यादी करा आणि त्यांचा अर्थ समजून घ्या.**

**उपक्रम :**

'सा विद्या या विमुक्तये' हे 'ब्रीदवाक्य' म्हणून वापरले जाते. प्रत्येक संस्थेला, शाळेला, मंडळाला आपले स्वत:चे असे ब्रीदवाक्य असते. अशी ब्रीदवाक्ये मिळवा. या ब्रीदवाक्यांचा अर्थ समजून घ्या.

**भाषेचा नमुना**

# अहिराणी बोली

*गावात तात्यावाचून पान हालानं नही. मानोस काही सिकेल व्हता आसे नही. पन कोनी काय टाप त्याले आंग्ठेबहादूर म्हनानी? चांग्ला जुनी फायनल व्हयेल व्हई आसे वाटानं. तात्या ह्या चार भाऊ, तिन्ही भाऊ वावरात काम कराना. तात्याले वावरात जावानी कदी पाळी वनी नही. तात्या घरना कारभारी, घरना जस्या कारभारी तस्या गावनाभी कारभारी. चोवीसतास भायेरल्याज उट्यारेट्या करी ऱ्हावाना. गावातला लोकंभी त्याले सळ खाऊ देवाना नही.*

*गावात कोनाकडे मांडोना बेत ऱ्हावो, तात्या पायजेच. साखरपुडा, नारळ ऱ्हावो तात्या पायजेच. कोना वाटा पाडाना ऱ्हावोत, तात्या पायजेच. सायखडं घी जावाले तात्याना नंबर पयला, वावरातल्या बांधवरथून कज्या ऱ्हावोत मिटाडाले तात्या पायजेच. पंगतम्हानभी बसा मंडळी आसे म्हनालेभी तात्याज पायजे. म्हंजे मरनदार ऱ्हाव का तोरनदार ऱ्हाव, तात्यासवाई पान्टं हालानं नही. तात्यानीभी भू सिफरत व्हती. सग्ळी जागावर तात्या हजर ऱ्हायना नही आसे कदीज जये नही. सकाळीजना पाऱ्हे तात्या जस्या दखावाना तस्याज ताजावताना रातलेभी दखावाना. याळम्हान कव्हळज तोंडवरथून पानी फिरावाना नही, तरी तात्यानी तोंड आत्तेज धुयेल व्हयी आसे दखावानं. तात्याना कप्डा धुवळाफूल ऱ्हावाना. टोपीले टार्च दियेल ऱ्हावानी. आठोडाभर तात्या त्याज कप्डा वापराना, पन कधी मळेल दखावाना नहीत. तात्या पारवर बसाना, वावरातली कज्या मिटाडाकरता तात्या गाडावर बसीसन वावरात जावाना, पांदीधरी फोपाटाच फोपाटा. वावरात वारावावधननी भवरी उठानी तरी तात्याना कप्डा धुवळाफूलज दखावाना. आस्या आम्हाना तात्या कायेम रुबाबबनज जगना!*

**दिलीप धोंडगे** (१९५६) : कवी, समीक्षक, लेखक. 'शैलीमीमांसा', 'तुका म्हणे भाग १ व २', 'तुकारामांच्या अभंगांची चर्चा भाग १ व २', 'तुकोबांच्या अभंगांची शैलीमीमांसा', 'तात्पर्य', 'हरवले गाव' ही पुस्तके प्रसिद्ध.

'सांगनं नही पन सांगनं वनं' या पुस्तकातून वरील अहिराणी बोलीतील उतारा घेतला आहे.

## शोध घेऊया.



- **आपल्या महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य म्हणजे दर बारा कोसांवर बोलीभाषा बदलते. महाराष्ट्रामध्ये विविध बोलीभाषा बोलल्या जातात. अशा बोलीभाषांची आंतरजालाच्या साहाय्याने माहिती मिळवा. कोणत्या भागात कोणती बोली बोलली जाते, त्याची नोंद करा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना अहिराणी बोलीभाषेतील वरील उतारा योग्य उच्चारांसह वाचून दाखवावा. उताऱ्यातील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण समजावून सांगावे.

# ४. श्रावणमास

• ऐका. वाचा. म्हणा.

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे.
सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला!
सुंदर परडी घेउनि हाती पुरोपकंठी शुद्धमती,
सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले-पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात,
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत!



**बालकवी**–त्र्यंबक बापूजी ठोमरे (१८९०-१९१८) : निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध. बालवयातच कवितालेखनाला प्रारंभ. १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या कविसंमेलनात 'बालकवी' म्हणून गौरवण्यात आले. 'बालकवींची कविता' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने श्रावण महिन्यातील निसर्गसृष्टीचे विलोभनीय व सुंदर वर्णन केले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत व साभिनय म्हणून दाखवाव्यात. कवितांना योग्य चाली लावाव्यात. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरांत म्हणून घ्याव्यात.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रसंगी काय घडते ते लिहा.**

| प्रसंग | काय घडते |
|---|---|
| (१) पहिला पाऊस आल्यावर | |
| (२) सरीवर सरी कोसळल्यावर | |

**प्र. २. निरीक्षण करा व लिहा.**

श्रावण महिन्यातले तुम्ही
पाहिलेले आकाशातील विशेष बदल

**प्र. ३. खालील तक्ता पूर्ण करा.**

कवितेत आलेली यांची नावे

प्राणी | पक्षी | फुले

**प्र. ४. 'सुंदर बाला या फुलमाला' या काव्यपंक्तीत सारख्या अक्षराचा उपयोग अधिक केल्यामुळे नाद निर्माण होतो, त्यामुळे पंक्ती गुणगुणाव्याशा वाटतात. कवितेतील अशा ओळी शोधून लिहा.**

**प्र. ५. कवितेतील खालील अर्थाच्या ओळी लिहा.**

(अ) क्षणात पाऊस पडतो तर क्षणात ऊन पडते.
(आ) झाडांवर, घरांवर कोवळे कोवळे ऊन पडते.
(इ) हरिणी आपल्या पाडसांसह कुरणात बागडत आहेत.

**प्र. ६. कवितेच्या खालील ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.

BP5C24

## खेळूया शब्दांशी.

- **खालील शब्दांसाठी कवितेत आलेले समानार्थी शब्द शोधून लिहा.**

| | | |
|---|---|---|
| (१) बासरी – | (४) मेघ– | (७) वृक्ष– |
| (२) स्त्रिया – | (५) गुराखी– | (८) मुख– |
| (३) आकाश– | (६) पृथ्वी– | (९) राग– |

**प्रकल्प :**


बालकवींच्या आणखी निसर्गकविता मिळवा. त्यांतील तुम्हांला आवडलेली कविता परिपाठात तालासुरांत सादर करा. बालकवींच्या कवितांचा संग्रह करा.




## खेळ खेळूया.

- खाली समानार्थी शब्दांचा जिना दिला आहे. दिलेल्या चौकटीत आडवे-उभे शब्द भरायचे आहेत. एका जिन्याच्या पायऱ्या तुम्हांला उतरून दाखवल्या आहेत. दुसऱ्या जिन्याच्या पायऱ्या तुम्हांला उतरायच्या आहेत.

(१) मस्तक
(२) कचरा
(३) रात्र
(४) पाणी
(५) जनता
(६) मुलगी




(१) पुढारी
(२) दिनांक
(३) पक्षी
(४) आकाश
(५) डोळे
(६) आश्चर्य






## लिहिते होऊया.

- श्रावण व वैशाख या दोन्ही महिन्यांतील निसर्गात जाणवणारा फरक तुमच्या शब्दांत लिहा.

## आपण समजून घेऊया.

- मागील इयत्तेत आपण नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या विकारी शब्दांचा अभ्यास केला आहे.

या इयत्तेत आपण क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या अविकारी शब्दांचा अभ्यास करणार आहोत. क्रियाविशेषण अव्यये, शब्दयोगी अव्यये, उभयान्वयी अव्यये व केवलप्रयोगी अव्यये या शब्दप्रकारांना **अविकारी** म्हणतात, कारण लिंग, वचन, विभक्ती इत्यादींमुळे त्या शब्दप्रकारांतील शब्दांच्या मूळ रूपांमध्ये काही बदल होत नाही.

- खालील परिच्छेद वाचा.

रवी वारंवार आजारी पडतो. त्याचे घर शाळेच्या पलीकडे आहे. मी अनेकदा त्याच्या घरी जातो. आजही गेलो होतो. मला पाहताच तो झटकन उठला. मी त्याला म्हणालो, ''तू हल्ली सारखा आजारी पडतो आहेस. मी काल तुझी खूप वाट पाहिली. मला तुझ्याशिवाय अजिबात करमत नाही. मी तुला नेहमी सांगतो, की दररोज व्यायाम कर, तुझ्या शरीराची ताकद आपोआप वाढेल.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित केलेले शब्द क्रियाविशेषण अव्यये आहेत. **क्रियाविशेषण अव्यये** वाक्यातील क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

**लक्षात ठेवा : विशेषणे** नाम व सर्वनामांबद्दल अधिक माहिती देतात, तर **क्रियाविशेषण अव्यये** क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात.

**शिक्षकांसाठी :** क्रियाविशेषण अव्यये व त्यांचे प्रकार यांची विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक सराव करून घ्यावा. क्रियाविशेषण अव्ययांचा वापर करून वाक्ये तयार करण्यास सांगावे.

## चला संवाद लिहूया.

- पाऊस व छत्री या दोघांमधील संवादाची कल्पना करा व लिहा, हा संवाद वर्गात सादर करा.





पाऊस : ..............................................................................

छत्री : ..............................................................................

पाऊस : ..............................................................................

छत्री : ..............................................................................

पाऊस : ..............................................................................

छत्री : ..............................................................................

पाऊस : ..............................................................................

छत्री : ..............................................................................

पाऊस : ..............................................................................



## सारे हसूया.



**बंटी :** अरे मित्रा, मी अशा वस्तूचा शोध लावलाय, ज्यामधून आपण बाहेरचं सर्व काही पाहू शकतो.

**दिनू :** अरे वा! अशी कोणती वस्तू आहे ती ?

**बंटी :** खिडकी.

# ५. भांड्यांच्या दुनियेत

भांडी हा मानवाच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग आहे. धान्य साठवणे, अन्न शिजवणे, अन्न सेवन करणे इत्यादींसाठी भांड्यांचा वापर फार पूर्वीपासून होत आहे. माणसांची गरज व त्या त्या काळात उपलब्ध साधनसामग्री यांनुसार भांडी तयार होत गेली, किंबहुना होत आहेत.

भांड्यांच्या स्वरूपातील बदलांचा हा प्रवास भांडी स्वत: मुलांना सांगत आहेत.

उन्हाळ्याची सुट्टी सुरू होताच अरुण व आदिती आजीआजोबांकडे गावी पोहोचले. तिथे मामांची मुले त्यांची आतुरतेने वाट पाहत होती. आता काय, मुलांची नुसती धमाल ! आंबे, कलिंगडे, ऊस खाणे आणि विहिरीत पोहणे असा मुलांचा कार्यक्रम निश्चित असायचा. उन्हामुळे आजी त्यांना दुपारी घराबाहेर जाऊ द्यायची नाही. दुपारी मुले घरातच काही ना काही खेळ खेळायची. अशाच एका दुपारी मुले लपाछपी खेळत होती. माधववर राज्य होते. आदिती कोठीच्या खोलीत लपायला गेली. तेवढ्यात तिचे लक्ष कोपऱ्यात ठेवलेल्या जात्याकडे गेले. तिने पहिल्यांदाच जाते पाहिले होते. 'हे काय आहे?' असे पुटपुटत तिने आपल्या भावंडांना कोठीच्या खोलीत बोलावले अन् जाते दाखवले. त्यांच्याकडे पाहून जात्याने स्मितहास्य केले.



**जाते** : काय मुलांनो ! ओळखलं का मला ? मी जातं.

**अरुण** : तू इथे काय करतोस ?

**जाते** : काय सांगू तुम्हांला, आजकाल लोक माझा फक्त लग्नाची हळद दळण्यासाठीच उपयोग करतात अन् नंतर असं कोपऱ्यात ठेवून देतात. आता काय! माझे नवे मित्र, सगेसोयरे स्वयंपाकघरात विराजमान झाले आहेत.

**आदिती** : तुझे मित्र, सगेसोयरे ? कोण ते आम्हांला नाही समजलं.

**जाते** : तुम्हांला काहीच माहीत नाही आमच्याबद्दल ?

(जाते कोठीतल्या इतर भांड्यांना उद्देशून बोलते.)

सांगूया का आपण यांना, आपला जन्म, विकास आणि आपल्यात होत गेलेल्या बदलांबद्दलची माहिती ?

(कोठीतील जुन्या प्रकारची सर्व भांडी माना डोलावतात.)

**दगडी पाटा** : थांब, मी सांगतो त्यांना आपला इतिहास. बरं का मुलांनो ! मानव जसा शेती करू लागला, स्थिर जीवन जगू लागला तशी त्याला अन्न शिजवणं, अन्न साठवणं यासाठी भांड्यांची आवश्यकता वाटू लागली. या गरजेपोटी त्यानं मातीपासून मडकी, पसरट



ताटल्या, वाडगे, पराती, रांजण, घडे अशी नित्योपयोगी भांडी बनवली.

**माधव** : अरे पण, आम्ही आजही मातीच्या माठातलं थंडगार पाणी पितो. छोट्या छोट्या मडक्यांत दही लावतो; पण काय रे, माणसानं फक्त मातीचीच भांडी बनवली का ?



**माहिती मिळवा.**

- उन्हाळ्यात माठाला ओले, सुती कापड का गुंडाळतात ?
- मातीचा माठ, रांजण जमिनीत का पुरतात ?

**सुरई** : नाही, तसं नाही. मातीच्या भांड्यांबरोबरच दगडी, लाकडी, चामड्याची भांडीही मानवानं तयार केली. तुम्ही चामडी बुधले, वाळलेल्या भोपळ्यापासून बनवलेले तुंबे कधी पाहिले आहेत का ?





**मंदा** : हो हो ! मी आंतरजालावर अशा भांड्यांची खूप चित्रं पाहिली आहेत. अजूनही आदिवासी भागातील लोक अशा वस्तूंचा उपयोग करतात, हेही वाचलं आहे.


**खलबत्ता** : मुलांनो, लाकडापासून बनवलेली, भिंतीलगत ठेवलेली ही काठवट पाहा. गव्हाचं, बाजरीचं, ज्वारीचं अशी पिठं मळण्यासाठी, भाकरी थापण्यासाठी तिचा उपयोग केला जायचा. आजही ग्रामीण भागांत काही घरांतून तिचा वापर होताना दिसतो.



(काठवटही न राहवून बोलू लागली.)

**काठवट** : अगं मंदा, तुला आठवतं का? तुझ्या आजीला आमचा नवा मित्र-मिक्सरची खूप भीती वाटायची. दाण्याचा कूट, मिरच्या, हळद, धने असं काहीबाही कुटण्यासाठी उखळ-मुसळ, दगडी खल किंवा हा खलबत्ता आजी वापरायची. पाटा-वरवंटा वापरायची.

आता तुम्हीच सांगा मुलांनो, आज उखळीमध्ये कोण पदार्थ कुटत बसतंय? लावला मिक्सर, की झालं काम. वेळ वाचतो अन् श्रमही वाचतात. पूर्वी पिठाच्या, मसाल्याच्या गिरण्या नव्हत्या. गृहिणी जात्यावर धान्य दळायच्या. धान्य पाखडायला सूप असायचं.






**मंदा** : हे सगळं खरं आहे; पण आज ही सर्व कामं करायला वेळ कोणाकडे आहे ?

**जाते** : मातीच्या व लाकडाच्या भांड्यांपाठोपाठ माणसानं तांबं, लोखंड या धातूंचा शोध लावला आणि मग भांडी बनवण्यासाठी त्यांचा वापर होऊ लागला; पण या धातूंच्या शोधामुळे भांडीसंस्कृती अधिक प्रगल्भ आणि विकसित होत गेली बरं का !

**अरुण** : म्हणजे फक्त भांडी बनवण्यासाठी या धातूंचा खूप उपयोग होऊ लागला, असंच तुला म्हणायचंय का? पण जातेभाऊ, आम्ही लोखंड आणि तांबं या धातूंच्या भांड्यांबरोबर चांदीचीदेखील भांडी पाहिली आहेत.

**जाते** : पलंग, खुर्ची, टेबल, कपाट, दारं-




खिडक्या, मोठे दरवाजे यांसारख्या लोखंडापासून तयार होणाऱ्या वस्तू तुम्ही पाहिलेल्या आहेत. त्याचबरोबर स्वयंपाकासाठी लोखंडी कढई, तवा यांसारख्या भांड्यांचा वापर होतानाही तुम्ही पाहिलं आहे.

**माहिती मिळवा.**

- ❖ बांधकाम क्षेत्रात लोखंड या धातूचा उपयोग मोठ्या प्रमाणात का होत असावा ?
- ❖ लोखंडाच्या कढईत वा तव्यात भाजी का करतात ?

तांबं आणि लोखंड या धातूंच्या जोडीला चांदी, शिसं या धातूंचाही वापर सुरू झाला. धातूंच्या पाठोपाठ काचेपासून वस्तू बनू लागल्या. तांबं आणि चांदीला पर्याय म्हणून संमिश्र धातू, पितळ, कांसे यांपासून भांडी बनवली जाऊ लागली.




**माहिती मिळवा.**

- ❖ भांडी बनवण्यासाठी धातूंचा वापर का सुरू झाला असावा ?

**प्रशांत** : मग स्टेनलेस स्टीलची भांडी वापरात कधी आली ?

**सुरई** : पितळी व तांब्याच्या भांड्यांची जागा ॲल्युमिनिअम, हिंडालियम आणि स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांनी घेतली. सध्या सगळीकडे स्टेनलेस स्टीलची भांडी बघायला मिळतात.

**जाते** : पूर्वी अंघोळीसाठी घंगाळं, पाणी तापवायला बंब, पाणी साठवायला कळशी, घागर, तपेले, हंडा असायचा; पण आता सर्रास प्लॅस्टिकच्या बादल्या, टब दिसतात.




**अरुण** : काय रे जातेभाऊ, जेवणाच्या पंगतीत ताट म्हणून केळीची पानं, पत्रावळी, तसेच वाट्यांसाठी द्रोण असायचे. हात धुवायला तस्त असायचं. होय ना ?

**जाते** : अरुण, तुला बरंच माहीत आहे की! गाई-म्हशींच्या दुधासाठी कासंडी किंवा चरवी, ताकासाठी कावळा, लोण्याचा वाडगा, तुपाची बुधली, बुडकुली, ओगराळी, पळी, तसराळी, कुंडा अशा कितीतरी नावांची भांडी स्वयंपाकघरात वावरत असायची. आता स्वयंपाकघरात गॅसची शेगडी वापरत असल्यानं, चूल व त्यावर स्वयंपाक करण्याचं प्रमाणही कमी होत आहे.



**माहिती मिळवा.**

- ❖ चूल पेटवताना फुंकणीने अग्नीवर फुंकर का घातली जाते ?

**मंदा** : पण या काळात मातीपासून तयार होणारी भांडी बंद झाली का?

**उखळ** : नाही, तसं नाही. या धातूंच्या शोधामुळे मातीची भांडी बनवणं बंद झालं, असं मुळीच नाही. उलट आज, भांडी तयार करण्यासाठी माती वापरण्याची परंपरा म्हणजे भांडी संस्कृतीचा पाया मानला जातो.

**जाते** : आज मोठ्या प्रमाणावर चिनी माती किंवा सिरॅमिक्स यांचा वापर करून विविध भांडी व वस्तू तयार होत आहेत. झाकणाच्या भांड्यांचा प्रसार झाला. किटलीचा रंग, आकार, त्यावरील नक्षीकाम, तसंच रत्नजडित सुरया अशा कलात्मक गोष्टी भांड्यांमध्ये येऊ लागल्या.



**आदिती** : हो हो, हे अगदी खरं आहे. आमच्या घरी स्टेनलेस स्टील, नॉनस्टिक व कोटेड मेटलची भांडी आहेत.

**खलबत्ता** : प्रत्येकजण स्वत:च्या खिशाला परवडणारी, सहजपणे उपलब्ध होणारी आणि वापरण्यास सोपी असणारी भांडी खरेदी करण्याचा प्रयत्न करतो.

**प्रशांत** : एकूण काय, तर भांडी हे मानवी संस्कृतीचं अविभाज्य अंग आहे. गरजेनुसार भांड्यांमध्ये विविधता येत गेली असली, तरी जिथे जिथे मानवी समाज, तिथे तिथे भांडी असणारच.

**आदिती** : आज आम्हांला तुम्हां सर्वांबरोबर खूप मजा आली. आम्ही तुम्हां सगळ्यांचे खूप आभार मानतो, कारण तुम्ही आम्हांला भांड्यांच्या दुनियेची सफरच घडवून आणली!

***

**माहिती मिळवा.**

❖ **चहाची किटली, कपबश्या, प्लेट्स, वाट्या इत्यादी चिनी मातीची किंवा सिरॅमिक्सची का असतात?**

## स्वाध्याय



**प्र. १. खालील विधानांमागील कारणांचा शोध घ्या व लिहा.**

(अ) शेती व्यवसाय व स्थिर जीवनामुळे माणसाला भांड्यांची गरज पडली.


(आ) पूर्वी मोठ्या प्रमाणावर केळीच्या पानावर जेवण्याची पद्धत होती.

(इ) आज घरोघरी मिक्सर वापरतात.

(ई) मातीच्या भांड्यांचा जास्तीत जास्त वापर करावा.

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

मानवाने ज्या घटकांपासून भांडी बनवली ते घटक.



प्र. ३. 'भांडी हे मानवी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे.' या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

प्र. ४. तुमच्या घरातील निरुपयोगी वस्तूंचे तुम्ही काय कराल, ते सांगा.

प्र. ५. दोन-दोन उदाहरणे लिहा.

(१) मातीची भांडी-

(२) चामड्यापासून बनवलेली भांडी-

(३) लाकडी भांडी-

(४) तांब्याची भांडी-

(५) चिनी मातीची भांडी-

(६) नॉनस्टिकची भांडी-

(७) काचेची भांडी-

प्र. ६. यांना काय म्हणतात?

(अ) जेवणासाठी पंक्तीत वापरण्यात येणारे ताट.

(आ) जेवणापूर्वी व जेवणानंतर हात धुवायचे भांडे.

(इ) दुधासाठीचे भांडे.

(ई) ताकासाठीचे भांडे.

(उ) पूर्वी अंघोळीसाठी वापरायचे भांडे.

## खेळूया शब्दांशी.

- कंसातील शब्द व शब्दसमूह यांमध्ये योग्य बदल करून रिकाम्या जागा भरा.

(अविभाज्य अंग, नित्योपयोगी, विराजमान होणे, सगेसोयरे)

(अ) संत तुकारामांनी वृक्षांना .............. संबोधून त्यांचा गौरव केला.

(आ) .............. वस्तू जपून व व्यवस्थित ठेवाव्यात.

(इ) आज शाळेतील ज्येष्ठ शिक्षक मुख्याध्यापक पदावर .............. .

(ई) कुटुंब हे मानवी जीवनाचे .............. आहे.

**उपक्रम :**

तुमच्या घरातील चार जुन्या भांड्यांची चित्रे काढा व रंगवा.



## चर्चा करूया.

- अंघोळीचे पाणी तापवण्यासाठी बंब वापरण्याचे प्रमाण कमी झाले आहे.
- दैनंदिन जीवनात चांदीची भांडी वापरण्याचे प्रमाण नगण्य आहे.

## माहिती मिळवूया.



- ❖ पत्रावळी तयार करण्यासाठी कोणकोणत्या झाडांची पाने वापरतात?
- ❖ पत्रावळीची पाने एकमेकांना कशाच्या साहाय्याने जोडली जातात?
- ❖ पूर्वी वापरत असलेल्या व आता वापरत असलेल्या पत्रावळींमध्ये कोणते बदल झाले आहेत?



## माहीत आहे का तुम्हांला?

- खालील उतारा वाचा. त्यातील घटना क्रमाने सांगा.

### कल्हई म्हणजे काय?



स्वयंपाकघरातल्या जुन्या तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांची जागा जशी स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांनी घेतली, तसतशी कल्हई आणि कल्हईवाले दुर्मीळ होत गेले. तांब्या, पितळेची भांडी चकचकीत करून त्यावर कथील धातूचा थर लावण्याचे काम हे कल्हईवाले करत. गल्लीगल्लीतून फिरून 'कल्हईवालाऽऽ' अशी आरोळी ठोकल्यानंतर एखाद्या झाडाखाली कल्हईवाला त्याचे दुकान थाटत असे.

तांब्याच्या भांड्यात आंबट किंवा आम्लधर्मी पदार्थ बनवले असता, त्यांच्यात रासायनिक प्रक्रिया होऊन अन्न बिघडण्याची शक्यता निर्माण होते. काही वेळेस अन्नाची चव बिघडते, तर काही वेळेस अन्नपदार्थांच्या रंगात बदल होतो. त्यातून विषबाधा होण्याचा धोका संभवतो. हे टाळावे म्हणून तांब्याच्या आणि पितळेच्या भांड्यांना आतून कल्हई केली जाते.

जमिनीत छोटा खड्डा खणून त्यात भट्टी तयार केली जाते. त्यातील विस्तवावर भांडे आतल्या बाजूने तापवले जाते. पांढऱ्या रंगाची नवसागराची (अमोनिअम क्लोराइड) भुकटी वापरून भांडे आतल्या बाजूने घासून स्वच्छ, लख्ख केले जाते. हे करताना पांढरा, उग्र वासाचा धूर तयार होतो. भांडे गार होण्यापूर्वीच कथील (टिन) धातूचा छोटा तुकडा भांड्यात टाकला जातो. कथील हा मऊ, लकाकणारा, निळसर-पांढऱ्या रंगाचा उपयुक्त धातू आहे. तो पटकन वितळतो. अतिशय कौशल्याने कल्हईवाला तो वितळलेला धातू पटकन भांड्यात सर्वत्र पसरवून त्याचा लेप देतो. भांडे थंड करण्यासाठी ते थंड पाण्यात टाकले जाते. कल्हई केलेल्या भांड्यात बनवलेले जेवण शरीरासाठी अपाय करत नाही, म्हणून दर काही महिन्यांनी तांब्या-पितळेच्या भांड्यांना कल्हई करणे गरजेचे असते.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या पाठाचे सादरीकरण करून घ्यावे. तसेच वरील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घ्यावे. उताऱ्यातील कृती क्रमाने सांगण्याची सूचना द्यावी. घटनाक्रम सांगताना योग्य ते मार्गदर्शन करावे.

- **वाक्यातील क्रिया केव्हा घडली, कोठे घडली, किती वेळा घडली, कशी घडली यांवरून क्रियाविशेषण अव्ययांचे चार मुख्य प्रकार पडतात.**

## क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार



**पूर्वी शिक्षक पगडी घालत असत.**
**– कालवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., आधी, सध्या, हल्ली, सदा, उद्या, नित्य, वारंवार इत्यादी.



**गोगलगाय हळू चालते.**
**– रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., पटकन, पटपट, जलद, आपोआप इत्यादी.



**सभोवार जंगल होते.**
**– स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा., सर्वत्र, इथे, जिथे, जिकडे, खाली, मागे, पलीकडे इत्यादी.




**टोपलीत भरपूर फुले आहेत.**
**– परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये**
उदा.,किंचित, काहीसा, दोनदा, अत्यंत, नेहमी इत्यादी.

- **खाली दिलेल्या शब्दांचे क्रियाविशेषण अव्ययांच्या प्रकारांनुसार वर्गीकरण करा.**

तिथे, दररोज, क्षणोक्षणी, सावकाश, तिकडे, अतिशय, पूर्ण, परवा, जरा, मुळीच, कसे, वर, थोडा, सतत, झटकन.

कालवाचक क्रियाविशेषण अव्यये



स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यये



रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये



परिमाणवाचक/संख्यावाचक क्रियाविशेषण अव्यये



## शब्दकोडे सोडवूया.

- **खालील चौकोनांतील अक्षरांमध्ये क्रियाविशेषणे लपलेली आहेत. उभ्या, आडव्या व तिरप्या पद्धतीने अक्षरे घेऊन क्रियाविशेषणे तयार करा व दिलेल्या जागेत लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ह | ळू | **थो** | डे | आ | रो |
| आ | ज | **डा** | **मो** | **ज** | **के** |
| ज | रा | **सा** | व | **का** | श |
| त | सा | जि | र | ल | **ही** |
| अ | ने | क | दा | चि | त |
| ति | क | डे | खा | ली | र |

# ६. थोरांची ओळख — डॉ. खानखोजे

भाग–२




गदर क्रांतीचे प्रणेते ते मेक्सिको शेतीतले जादूगार असा प्रवास करणाऱ्या डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे ऊर्फ भाऊ यांचं सारं आयुष्यच विस्मयकारी घटनांनी भरलेले आहे.

तात्या आजोबांच्या मांडीवर बसून लहानगे भाऊ सतत स्वातंत्र्यलढ्याविषयीच्या कथा ऐकत असत. भाऊ हे आजोबांचे तसेच आईचेही लाडके होते. भाऊ प्राथमिक शाळेत जाऊ लागले, तसे त्यांचे मित्रमंडळही वाढू लागले. भाऊ व त्यांच्या साऱ्या मित्रांची माडीवरच्या खोलीत बंद दाराआड बसून काहीतरी खलबतं चालायची. इंग्रजांना व त्यांच्या सैन्याला कसं पळवून लावता येईल, याचे डावपेच ते आखत असत. लहानपणापासूनच इंग्रज सरकारविरुद्धचा तीव्र असंतोष भाऊंच्या मनात होता. इंग्रजांना देशाबाहेर काढल्याशिवाय देशाची परिस्थिती सुधारणार नाही, म्हणून त्याविरुद्ध लढा द्यायचा, असं भाऊंनी मनोमन ठरवलं.

पुढे खेडोपाडी जिथे संधी मिळेल तिथे भाऊ स्वदेशी चळवळ, भारतीय इतिहास, भारतीय स्वातंत्र्य या विषयांवर भाषणं देत असत. स्वातंत्र्यासाठी कार्यरत असताना भाऊंनी शिक्षण योग्य प्रकारे पूर्ण करावं, लग्न करून संसार करावा, असं त्यांच्या वडिलांना वाटत होतं; परंतु भाऊंचं मन वळवण्यात वडिलांना यश आलं नाही.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग असणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या भेटीसाठी भाऊ पुण्याला गेले. तिथे त्यांच्या सहवासात ते राहू लागले. त्यांच्या सहवासात राहणं ही भाऊंना मोठी पर्वणीच वाटत असे. भाऊंना रणशास्त्र शिकावं असं वाटत होतं. टिळकांनीही त्याला अनुमती दर्शवली. इंग्रज सरकारच्या आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज अशा सैन्याशी टक्कर द्यायची असेल, तर परदेशी जाऊन आधुनिक लष्करी शिक्षण घ्यावं, असा टिळकांनी त्यांना सल्ला दिला. सन १९०६ साली लोकमान्य टिळकांच्या सांगण्यावरून त्यांनी मायदेश सोडला.

अमेरिकेतील 'सान् राफाएल' येथील लष्करी शिक्षण देणाऱ्या ॲकॅडेमीत भाऊ दाखल झाले. शिस्तपालन, अभ्यासातील प्रगती, सर्व प्रकारच्या कामांतील तत्परता, शरीरचापल्य पाहून ॲकॅडेमीतील शिक्षकवर्ग भाऊंवर खूश होता. लष्करी शिक्षण घेत असताना कोणतीही उणीव राहू नये, म्हणून ते प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. १९१० साली 'टमाल पेस

मिलिटरी ॲकॅडमी'चा डिप्लोमा त्यांना मिळाला.

भारतीय बहुजन समाज शेतकऱ्यांचा आहे. शेती सुधारण्यावरच त्यांची खरी उन्नती व आर्थिक स्वातंत्र्य अवलंबून आहे. कृषक व श्रमजीवी एकत्र आले, तर इंग्रजांना सहज देशातून घालवून देऊ शकतील असा त्यांना विश्वास होता. शेतीच्या निमित्तानं बहुजन समाजात क्रांतीचा प्रचार करता येईल, अशा विचारानं त्यांनी कृषिशास्त्रात शिक्षण पूर्ण करायचं ठरवलं. वॉशिंग्टन स्टेट कृषी महाविद्यालयात त्यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी नाव नोंदवलं. १९१३ साली त्यांनी मास्टर ऑफ सायन्स (एम. एस.) ही पदवी मिळवली.

कृषिशिक्षण घेत असताना त्यांनी अमेरिकेत क्रांतिकेंद्रं काढली. गदर उठावाच्या आखणीत ते आघाडीवर होते. लाला हरदयाळ, पं. काशीराम, विष्णू गणेश पिंगळे, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेंद्रनाथ दत्त हे क्रांतिकारक त्यांचे सहकारी होते. सशस्त्र लढा संघटित करण्यासाठी त्यांनी जपान, अमेरिका, कॅनडा, इराण, मॉस्को, बर्लिन अशी भ्रमंती केली आणि अपार साहसे अंगावर घेतली.

कृषिशास्त्रात डॉक्टरेट प्राप्त केल्यानंतर मेक्सिको येथील सरकारी कृषी विद्यालयात त्यांची प्राध्यापकपदी नेमणूक झाली. त्यांच्या अध्यापनाचा लौकिकही वाढत होता. 'जमीन आणि पिके' या विषयात त्यांच्या शब्दाला मोल आलं. 'जेनेटिक्स' या विषयात त्यांचा दबदबा वाढला. राष्ट्रीय प्रदर्शनात मिळालेल्या प्रथम पुरस्कारामुळे त्यांचा लौकिक अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. अध्यापनाव्यतिरिक्तच्या वेळात त्यांनी त्यांच्या प्रयोगशाळेत आणि प्रयोगक्षेत्रात गव्हावर अभ्यास सुरू केला. त्या प्रयोगांतून त्यांनी गव्हाचे विविध वाण तयार केले. पावसाळ्यात नि उन्हाळ्यात येणाऱ्या गव्हाची संकरित जात, तांबेरा न पडणारी आणि बर्फालाही दाद न देणारी, विपुल उतारा देणारी जात, अत्यंत कमी पावसात भरपूर उतारा देणारी जात इत्यादी.

डॉ. खानखोजेंचा 'जेनेटिक्स' क्षेत्रातला अभ्यास, 'जमीन आणि पिके' याबाबतीतले प्रयोग, गव्हावरचे संशोधन इत्यादी लक्षात घेऊन मेक्सिकन सरकारच्या शेतीसुधार मंडळाने त्यांना आमंत्रण दिले. संपूर्ण मेक्सिकोचा अभ्यासदौरा करावा, सर्व ठिकाणच्या कृषिसंस्था, संशोधन केंद्रे पाहावी, शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडचणी, अनुभव, विचार समजून घ्यावे, सुधारणा सुचवाव्या या कामगिरीवर डॉ. खानखोजेंची नेमणूक झाली. त्यांच्या दौऱ्याची मेक्सिकन सरकारने व्यवस्था केली. या दौऱ्यानंतर



त्यांनी मेक्सिकन जनतेचे मुख्य अन्न असलेल्या मक्याची पैदास नि दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने संशोधनाला सुरुवात केली. मेक्सिकोतील 'तेवो सिंतले' ही निरुपयोगी वनस्पती आणि मका यांचे संकरण करून त्यांनी 'तेवो-मका' ही मक्याची नवीन संकरित जात निर्माण केली. एकेका मक्याच्या ताटावर तीस-तीस कणसे नि ती डाळिंबाप्रमाणे संपूर्णपणे भरलेली. अमेरिकेत यशस्वी झालेले मक्यासंदर्भातील प्रयोग त्यांनी मेक्सिकोत राबवले, त्यामुळे मेक्सिकोत मक्याची लागवड आणि पैदास उत्तमरीत्या वाढली. मेक्सिकन सरकारने १९३० सालचा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरणारा आणि संशोधनासाठी असणारा पुरस्कार देऊन डॉ. खानखोजेंचा गौरव केला.

गहू, मक्यानंतर त्यांनी तूर, चवळी यांचे विविध वाण तयार केले. सोयाबीनची लागवड करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. त्यांनी शेवग्यावरही संशोधन केले. शेवग्याचा पाला, मुळ्या, शेंगांतील बिया आणि त्या बियांपासून मिळणारे सुगंधी तेल यांचे महत्त्व विशद करणारी पुस्तिका प्रकाशित करून सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली.

अपार देशप्रेम असणारा एक क्रांतिकारक, शेतकऱ्यांविषयीची कळकळ असणारा एक कृषितज्ज्ञ म्हणजे डॉ. पांडुरंग खानखोजे होय.

***

संदर्भ : डॉ. खानखोजे
नाही चिरा ... - वीणा गवाणकर

## स्वाध्याय



**प्र. १. खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा.**

(अ) तात्या आजोबांच्या मांडीवर बसून भाऊ स्वातंत्र्यलढ्याविषयीच्या कथा ऐकत असत. ☐

(आ) भाऊंचं मन वळवण्यात वडिलांना यश आलं. ☐

(इ) लोकमान्य टिळकांनी भाऊंना परदेशी जाऊन शिकून परतण्याचा सल्ला दिला. ☐

(ई) भाऊंनी गहू, मका, तूर आणि चवळी यांचे वाण तयार केले. ☐

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**भाऊ खेडोपाडी जाऊन या विषयांवर भाषणं देत.**

☐ ☐ ☐

**प्र. ३. कंसातील योग्य पर्याय शोधून रिकाम्या जागा भरा.**

(अ) भाऊंनी मास्टर ऑफ सायन्स ही पदवी ............. येथे प्राप्त केली.
(जपान/अमेरिका/मेक्सिको)

(आ) ............. या विषयात भाऊंचा दबदबा वाढला.
(फिजिक्स/जेनेटिक्स/मॅथमॅटिक्स)

(इ) भाऊंनी ............. या विषयात डॉक्टरेट मिळवली.
(वनस्पतिशास्त्र/प्राणिशास्त्र/कृषिशास्त्र)

**प्र. ४. मक्यापासून कोणकोणते पदार्थ तयार केले जातात, त्यांची यादी तयार करा.**



## चर्चा करूया.

- **'कृषिशास्त्रात झालेल्या विविध संशोधनांमुळे धान्याची विपुलता वाढली आहे', या विषयावर वर्गात चर्चा करा.**

## शोध घेऊया.



- **दूरदर्शन, वृत्तपत्रे, पुस्तके, आंतरजाल यांसारख्या विविध माध्यमांद्वारे तुम्हांला आवडणाऱ्या थोर व्यक्तींची माहिती मिळवा. त्या माहितीचे हस्तलिखित तयार करा.**

## तुम्ही काय कराल?

- तुम्ही सहलीसाठी गडावर गेला आहात, तेथील परिसरात फिरताना तुम्हांला पाण्याच्या बाटल्या व कचरा दिसत आहे.



## वाचा.

आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. आपल्या देशाचा राज्यकारभार घटनेनुसार चालतो. भारतीय घटनेने सर्व भारतीयांना काही मूलभूत हक्क दिले आहेत. जसे, समानतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क. दैनंदिन जीवन जगत असताना मनुष्याला अनेक गोष्टींची आवश्यकता असते. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याला समाजातील विविध घटकांवर अवलंबून राहावे लागते. अनेक घटकांच्या खरेदीसाठी आपण बाजारात जातो. दुकानात जातो. मालाची वा वस्तूंची खरेदी करणाऱ्या व्यक्तीला ग्राहक म्हणतात, तर माल वा वस्तूंची विक्री करणाऱ्या व्यक्तीला विक्रेता म्हणतात हे आपल्याला ठाऊक आहे. काही प्रसंगी ग्राहक व विक्रेता यांच्यामध्ये विवाद होतात, त्यांच्या हितसंबंधांत बाधा वा दुरावा निर्माण होतो. या दोहोतले हितसंबंध चांगल्या प्रकारे राहावेत, ग्राहकांच्या हितसंबंधांचे रक्षण व्हावे, ग्राहकांसंबंधी विवाद मिटावेत व याच्याशी संबंधित अशा इतर गोष्टींसाठी **'ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६'** या नावाचा कायदा करण्यात आला.

आपण खरेदी करत असलेल्या मालावर, वस्तूवर वा वस्तूच्या पुडक्यावर लिहिलेल्या किमतीपेक्षा जास्त किंमत जर विक्रेता आपल्याकडून घेत असेल किंवा मागत असेल, तर त्याविरुद्ध आपण आवाज उठवू शकतो. कोणताही विक्रेता नागरिकांच्या जीवितास वा सुरक्षिततेस घातक ठरणारा माल, बनावट माल ग्राहकांस विकत असेल, तर आपण या कायद्याचा आधार घेऊ शकतो. तक्रार निवारण करून घेण्यासाठी प्रत्येक ग्राहकास योग्य त्या ग्राहकमंचाकडे जाण्याचा हक्क असतो.

- **खाली दिलेला तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | क्रियापद | क्रियाविशेषण | क्रियाविशेषणाचा प्रकार |
|---|---|---|---|
| (१) काल तो मुंबईला गेला. | | | |
| (२) तो भरभर जेवतो. | | | |
| (३) इथे शहाळी मिळतात. | | | |
| (४) मी तो धडा दोनदा वाचला. | | | |

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यये लिहा.**

(ढसाढसा, सावकाश, टप्‌टप्, आपोआप)

(अ) माझ्या डोळ्यांतून············ आसवे गळू लागली.

(आ) मी आईच्या गळ्यात पडून ············ रडलो.

(इ) रात्र होताच सगळ्यांचे डोळे ············ मिटू लागतात.

(ई) पक्ष्याने आपले पंख ············ फडफडवले.

# ७. माझी मराठी




• ऐका. वाचा. म्हणा.

माझी भाषा माझी आई
अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात
होऊ नये उतराई.

तिच्या एकेका शब्दाला
रत्न-कांचनाचे मोल,
कधी तप्त लोहापरी
कधी चांदणे शीतल.

रानवाऱ्याच्या गंधात
माझी मराठी भिजली,
लेऊनिया नाना बोली
माझी मराठी सजली.

माझ्या भाषेचे अमृत
प्राशेल तो भाग्यवंत,
तिचा नाही दुजाभाव
असो कोणताही पंथ.

माझ्या मराठी भाषेची
काय वर्णावी थोरवी,
दूर देशी ऐकू येते
माझ्या मराठीची ओवी.

**मृणालिनी कानिटकर-जोशी** (१९६९) : आकाशवाणी व दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांचे लेखन. 'सीमंतिनी' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

मातृभाषेविषयी आपल्या मनात आपुलकी असते. आपल्या आईविषयी सर्वांना प्रेम असते, तसे प्रेम मराठी भाषेविषयी सर्वांना वाटते. आपल्या मराठी भाषेतील शब्दांचे महत्त्व, बोलींचे महत्त्व, मराठी भाषेची थोरवी प्रस्तुत कवितेतून सांगितली आहे.




**प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) कवयित्रीचे मराठी भाषेशी नाते–

(आ) खरा भाग्यवंत–

(इ) (ई)




**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) विविध बोलींमुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे.

(आ) माझ्या मराठीची ओवी दूर देशांतही ऐकायला मिळते.

**प्र. ३. खालील कवितेच्या ओळींतील भाव तुमच्या शब्दांत लिहा.**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई,
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई.

**प्र. ४. खालील शब्दांचा उपयोग करून तुमच्या मनाने वाक्ये तयार करा.**

(१) ऋण (२) थोरवी (३) उतराई (४) भाषा



## चर्चा करूया.

- **जागतिक मराठी राजभाषा दिनाचे तुमच्या शाळेत आयोजन करायचे आहे. त्यासाठी तुम्ही कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन कराल, त्याची यादी तयार करा.**

## खेळूया शब्दांशी.

- **कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) आई (२) भिजली (३) थोरवी

## कल्पक होऊया.

- खाली दिलेल्या भेटकार्डावर तुमच्या आवडत्या मित्र/मैत्रिणीच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा संदेश तयार करा.




- खालील तक्त्यात तुमच्या आवडत्या सणांची नावे लिहून त्या निमित्ताने तुमच्या मित्र/मैत्रिणीसाठी शुभेच्छा संदेश तयार करा व लिहा.

| सण | संदेश |
|---|---|
| गुढीपाडवा | स्वागत नववर्षाचे, आशा-आकांक्षांचे, सुखसमृद्धीचे, पडता दारी पाऊल गुढीचे! |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने भेटकार्डे तयार करून घ्यावीत. प्रसंगानुरूप शुभेच्छा संदेश तयार करून घ्यावेत.

# ८. गचकअंधारी

**अशोक मानकर** (१९५९): ग्रामीण विनोदी कथालेखक. 'हेंबाळपंथी', 'हुनेर', 'गणपत फॅमिली इन न्यूयॉर्क', 'गचकअंधारी' हे कथासंग्रह प्रसिद्ध. चित्रपट, दूरदर्शन मालिका, माहितीपट यांसाठी कथा व संवादलेखन.

सदाचा मुलगा गजानन सदाबरोबर बाजारात जाण्यासाठी सतत पाठीमागे लागायचा. एके दिवशी सदा त्याला घाबरवण्यासाठी गचकअंधारी नावाच्या एका काल्पनिक जनावराची भीती त्याला दाखवतो. पावसाच्या तडाख्यातून वाचण्यासाठी गावात शिरलेला वाघ व बाजाराला निघालेला सदा यांच्यात ज्या घटना घडतात, त्या विनोदी व मार्मिक शैलीतून लेखकाने मांडल्या आहेत.

**माहिती मिळवा.**

- मराठी साहित्यातील विनोदी लेखन करणाऱ्या खालील लेखकांच्या पुस्तकांची नावे लिहा.

| लेखक | पुस्तकांची नावे |
|---|---|
| चिं. वि. जोशी | |
| पु. ल. देशपांडे | |
| द. मा. मिरासदार | |

एका गावात सदा व सखू नावाचे जोडपे राहत होते. त्यांना गजानन नावाचा मुलगा होता. त्यांचा गाडगी, मडकी करण्याचा धंदा होता. भाजलेली मडकी सदा पंचक्रोशीतील गावांतल्या बाजारात विकायला नेई. गाढवाच्या पाठीवर मडकी ठेवून ते हाकत हाकत तो बाजाराला जायचा आणि येताना त्याच्या पाठीवर बसून यायचा. कधी कधी एखाद्या बाजारात मडकी शिल्लक राहत असत. ती तो कुण्या ओळखीच्या घरी ठेवायचा.

सदाचे व्यवस्थित चालले होते. आठवड्यातून दोन-तीनदा आपले वडील कुठेतरी बाजाराला जातात, हे लहानग्या गजाननला कळू लागले होते. वडिलांबरोबर बाजारात जाण्यासाठी आता तो सारखाच हट्ट करू लागला होता. दरवेळी त्याची समजूत घालता घालता सदा व सखू मेटाकुटीला येत असत.

एके दिवशी सदाला मडकी विकायला शेजारच्या गावात जायचे होते. भल्या पहाटे उठून सखूने भाकरी थापल्या. शिदोरी बांधून दिली. त्या वेळी गज्या गाढ झोपला होता. सदाला ज्या बाजाराला जायचे होते तिथे मागची मडकी शिल्लक होती. त्याने ती ओळखीच्या घरी ठेवली होती. त्यामुळे त्याला फक्त गाढवावर बसून जायचे होते. त्याने गाढव रात्रीच गावात चरायला सोडले होते. ते शोधले आणि त्यावर बसले, की परस्पर निघायचे या बेताने सदाने आवरले. अंगणातल्या चपला पायांत सरकवल्या. तो बाहेर पडणार, तोच गज्याला नेमकी जाग आली.

खाटेवरून धाडकन उडी घेऊन पळतच बापाजवळ येत त्याने गिल्ला केला, ''मी येतो, मी येतो.'' सदाने डोक्याला हात लावला.



रात्री सदाच्या गावालगतच्या परिसरात जोराचा वादळी पाऊस झाला होता. विजा कडाडल्या होत्या. गारपीट झाली होती आणि त्या तडाख्यात एक वाघ सापडला होता. वाघाने बावचळून आपल्या जागेवरून पळ काढला होता. आसरा शोधत तो सदाच्या गावात येऊन धडकला होता. पहाटेपर्यंत कुठेतरी आश्रय घेऊ नि झुंजूमुंजू होताच इथून निघून जाऊ, या हिशेबाने वाघाने गावात जागा शोधण्याचा प्रयत्न केला. इकडे शोध, तिकडे शोध करत त्याला एक पडके खिंडार दिसले. आत जाऊन वाघ बाजूच्या भिंतीलगत उभा राहिला. ही सदाच्या घराची मागची भिंत होती.

साहजिकच खिंडारात भिंतीशी उभ्या असलेल्या वाघाला सदाच्या घरातले बोलणे स्पष्ट ऐकू येत होते.

सदा विचार करत म्हणाला, ''बाबू, तुले म्या नेलं असतं, पन अंधार किती हाय. रातच हाय ना अजून.''

गज्या उसळला, ''असू द्या. मी येतो, मी येतो.''

''लेका, रस्त्यावर या वक्ती कोला असते बरं.''

''असू द्याऽऽ.''

''लाहान लेकराले उचलून नेते म्हंतात तो.''

''निऊ द्या. कै नै, मी येतो... येतो...''

''तिकळे लांडगा येते मंग.''

''यिऊ द्या. मी येतो. येतो म्हंजे येतोऽऽ.''

''पुळे जंगल लागते. जंगलात वाघ असते या टैमाले.''

''हूं ! असू द्या. कै भेव नोका दाखू मले वाघा-फाघाचा.''

ते ऐकून वाघ मनाशी म्हणाला, 'लोयच आटेल पोट्टं दिसून रायलं.'

''अन् वाघानं खाल्लं त तुले?'' सदानं म्हटलं. तसा गज्या तोंड वेडावत म्हणाला, ''मले खाल्लं त तो काय तुमाले सोळनार हाये काय? कै नै मले मैत हाये. मी यिऊ नोय म्हनून तुमी मले भेव दाखून रायले.''

सदाने विचार केला. डोळे मोठे करून म्हणाला, ''या वक्ती जंगलात कदी ना ते गचकअंधारी भेटली त म्हनू नोको मले.''

गज्या गडबडला, ''गचकअंधारी?''

''हौ, गचकअंधारी.''

''काय होय हे गचकअंधारी?''

''गचकअंधारी मैत नै तुले? लेका, गचकअंधारी वाघासिंव्हालेई एका घासात खाते म्हंतात. आपल्याले भेटली त? कै नै भौ, एवळं खतरनाक जनवार तरी हाये काय कोंतं?''

''खतरनाक?'' आता गज्या हादरला. शहारून आईजवळ पळाला अन् म्हणाला, ''मी नै येत मंग. जा तुमीच.''

सदाची युक्ती फळाला आली.

वाघ मनातून भ्याला. 'कोंती गचकअंधारी होय बावा! आपल्याले भेटली त? कै नै भौ, थोळसंक दिसाले लागल्यावर चाल्ले जाऊ अथून.'

सदा लगबगीने घराबाहेर पडला. रात्री चरायला सोडलेले गाढव शोधू लागला. अद्याप गुडूप अंधार होता. ही गल्ली बघ, हा उकिरडा बघ, तो बघ, असे सगळीकडे फिरत अखेरीस त्याच्या घरामागच्या खिंडाराजवळ आला.

भिंतीशी वाघ उभा होता. दुरून त्याची अस्पष्टशी आकृती दिसताच सदा स्वत:शी उद्गारला, 'हाये सायाचं. मी साऱ्या गावात पाहून रायलो अन् हे गधळं पायलं त अथी उभं.'

सदा तरातरा चालत आला. गच्चकन वाघाचा कान पकडला आणि टांग फेकून टपकन त्याच्या पाठीवर बसला.

वाघ प्रचंड हादरला. 'बापरे! हे गचकअंधारी हाय!' असं स्वत:शी म्हणताना त्याला हिव भरलं.

सदानं रपदिशी पायांच्या टाचा त्याच्या पोटावर हाणल्या. घाबरलेला वाघ आपल्या पाठीवरचा स्वार घेऊन निमूट चालता झाला.

वाघाची चालण्याची गती पाहून सदाने विचार केला- 'लोय जोऱ्यानं चालून रायलं गधळं. बरोबर हाये, राती सट खाल्लं वाट्टे यानं. चाल म्हना लेका. मलेई बरंच हाये. तिकळे गज्या भेला. आता अटालाच नै रायला. आता काय, मस्त बाजारात जानं अन् भदाळं इकनं.'

स्वारीने गाव ओलांडले. जंगलचा रस्ता धरला.

अजून किट्ट काळोखच होता; पण आकाशात चांदण्या लुकलुकत होत्या. पहाटेची थंडगार हवा सुटली होती. हवेच्या झुळका सदाला मोरपिसाच्या स्पर्शासारख्या वाटत होत्या आणि इकडे वाघाचा धावा सुरू होता, 'हे देवा, दया कर...मले वाचो. माल्या पाठीवरची ही बला जाऊ दे.'

पूर्वेला प्रभा फाकण्याच्या बेतात आली. मान डोलावत इकडे तिकडे पाहताना सदाचे लक्ष वाघाच्या पाठीवर गेले. गाढवाचा राखाडी सोडून पिवळा रंग आणि त्यावर काळे पट्टे दिसताच त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. 'हे कसं काय?' असे म्हणत सदाने मान थोडी कलती केली आणि पाहतो तर काय? साक्षात वाघ! त्याला कापरे भरले. तो थाड्थाड् उडू लागला. या छेडछाडीने वाघ सदाच्या दुप्पट हलू लागला. मनाशी म्हणू लागला, 'गचकअंधारी झटके देऊन रायली, म्हंजे आपल्याले खायाची तयारी करून रायली हे.'



सदा आकाशाकडे पाहत करुणा भाकू लागला, 'हे इस्वरा, काय बुद्धी देली बावा. गधं सोळून वाघाच्या पाठीवर बसलो अन् हा वाघई मले घिऊन चाल्ला .... पन मी याले दिसलो त?... त हा माही नळ्ली फोळ्ल्याशिवाय राह्यत नै... मले वाचो याच्यातून... या संकटातून तार.'

सदाला दरदरून घाम फुटला. एवढ्या थंड वातावरणातही घामाने तो वरपासून खालपर्यंत थबथबला. डोक्यापासून घामाच्या धारा ओघळू लागल्या. घाम वाघाच्या पाठीवर उतरू लागला, तेव्हा वाघाची घाबरगुंडी उडाली. 'घेऽवो. आता त गचकअंधारी पानी सोळून रायली, म्हंजे मले हे आता पान्यात भिजू भिजू खाते.' ह्या विचाराने वाघाचे काळीज जोरजोरात धडधडू लागले.

कापरे भरलेला सदा सुटकेचा काही मार्ग सापडतो का म्हणून इकडे तिकडे पाहू लागला. दूरवर त्याला वडाचे झाड दिसले. त्याच्या पारंब्या जमिनीपर्यंत आलेल्या होत्या आणि हा रस्ता वडाच्या झाडाखालून जात होता. सदाच्या जिवात जीव आला. वाघ जेव्हा झाडाखालून जाऊ लागला, तेव्हा सदाने विलक्षण चपळाई केली. लोंबणारी पारंबी पकडत तो वाघाच्या पाठीवरून सटकला आणि सरसर वर गेला.

सदा असा अलगत वेगळा होताच, 'जमलं बाबा! सुटलो. नाहीतर गचकअंधारी आज आपल्याले खाल्ल्याबिगर राहत नव्हती. धन्य रे बाबा तुही', असे म्हणत वाघ सुसाट पळत सुटला!

***

## स्वाध्याय



**प्र. १. खालील वाक्ये वाचा. प्रत्येक घटनेमागील तुम्हांला जाणवलेली कारणे लिहा.**

(अ) सदा मडकी विकून येताना गाढवाच्या पाठीवर बसून येत असे.

(आ) गज्याने वडिलांसोबत जाण्याचे नाकारले.

(इ) वाघ सदाच्या दुप्पट हलू लागला.

(ई) सदा आकाशाकडे पाहत करुणा भाकू लागला.

**प्र. २. खालील मुद्द्यांवर दोन-तीन वाक्यांत माहिती लिहा.**

सदाचा व्यवसाय → सदाचा मुलगा गजानन → सदाची झालेली फजिती → सदाने स्वत:ची केलेली सोडवणूक

**प्र. ३. कोण, कोणास व का म्हणाले?**

(अ) ''कै भेव नोका दाखू मले वाघाफाघाचा.''

(आ) ''या वक्ती जंगलात कदी ना ते गचकअंधारी भेटली त म्हनू नोको मले.''


(इ) 'गचकअंधारी झटके देऊन रायली.'

(ई) 'गचकअंधारी आज आपल्याले खाल्ल्याबिगर राहत नव्हती.'

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार अभ्यासा.**

'भीती वाटणे' हा खालील वाक्प्रचारांचा अर्थ आहे.




एकाच अर्थाचे इतके वाक्प्रचार असणे, हे मराठी भाषेच्या समृद्धीचे लक्षण आहे. याप्रमाणे एकाच अर्थाच्या अनेक वाक्प्रचारांचा संग्रह करा.

(आ) **आपल्या आजूबाजूच्या चार–पाच कोसांच्या आतील गावांना, खेड्यांना मिळून 'पंचक्रोशी' म्हणतात. यासारखे खालील शब्दसमूहांबद्दल प्रत्येकी एक शब्द लिहा.**

(अ) ज्यास कोणी शत्रू नाही, असा.
(आ) मोफत पाणी मिळण्याचे ठिकाण.
(इ) धान्य साठवण्याची जागा.
(ई) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा.
(उ) डोंगर पोखरून आरपार केलेला रस्ता.

(इ) **खालील चौकोनात विशेष्य व विशेषणे एकत्रित दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

काळोख, विलक्षण, पारंबी, पाऊस, वादळी, लोंबणारी, चपळाई, किट्ट.

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

(ई) **कंसात दिलेल्या वाक्प्रचारांच्या रूपात योग्य बदल करून वाक्ये पूर्ण करा.**
(मेटाकुटीला येणे, गिल्ला करणे, घाबरगुंडी उडणे, शंकेची पाल चुकचुकणे.)

(अ) पतंग पकडण्यासाठी धडपडणाऱ्या मुलांनी एकच ...................... .
(आ) उघड्या भांड्यातील पाणी पाहून अबोलीच्या मनात ...................... .
(इ) लहान मुलांची मस्ती बघून आईचा जीव ...................... .
(ई) पोलिसांना बघून चोरांची ...................... .



## विचार करा. सांगा.

- **हा पाठ वाचताना तुम्ही खूप हसलात, असे पाठातील विनोदी प्रसंग सांगा.**
- **'गचकअंधारी' हे पाठातील पात्र काल्पनिक आहे की खरे, याबाबत तुमचे मत लिहा.**
- **पाठाच्या दृष्टीने 'गचकअंधारी' या पात्राचे महत्त्व स्पष्ट करा.**



## माझे वाचन.

मराठी साहित्यात विनोदी लेखन करणाऱ्या लेखकांची शिक्षक व पालक यांच्याकडून माहिती घ्या. विनोदी लेखन करणाऱ्या लेखकाचे एखादे पुस्तक वाचा. त्यातील एखादी गोष्ट वर्गात सादर करा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील परिच्छेद वाचा.**

शाळा सुटताच मुले शाळेबाहेर आली. शाळेच्या फाटकासमोर काही मुलांचे पालक उभे होते. रस्त्यावर वाहनांची गर्दी होती. मुलांसाठी वाहने थांबली. मुलांनी रस्ता ओलांडला.

वरील अधोरेखित शब्द स्वतंत्र नाहीत. -बाहेर, -समोर, -वर, -साठी हे शब्द अनुक्रमे शाळा, फाटक, रस्ता, मुले या शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. -पूर्वी, -पुढे, -आधी, -नंतर, -पर्यंत, -आत, -बाहेर, -मागे, -मुळे, -शिवाय हीदेखील शब्दयोगी अव्यये आहेत.

अनेक क्रियाविशेषणे शब्दयोगी अव्यये म्हणून वापरली जातात. अशा वेळी ती प्रत्ययांप्रमाणे शब्दांना जोडूनच लिहायची असतात.

ही दोन वाक्ये पहा.

(१) तो पूर्वी सैन्यात होता. ‘पूर्वी’- क्रियाविशेषण अव्यय

(२) जेवणापूर्वी हात धुवावेत. ‘-पूर्वी’ शब्दयोगी अव्यय

या पूर्वी आपण प्रत्यय जोडण्यापूर्वी नामांचे, सर्वनामांचे सामान्यरूप होते, हे पाहिले. शब्दयोगी अव्यये जोडण्यापूर्वीही नामांचे, सर्वनामांचे सामान्यरूप होते.

वरील परिच्छेदात शाळे-, मुलां-, रस्त्या-, वाहनां- हे सामान्यरूप झालेले शब्द आहेत.

- **खालील परिच्छेद वाचा. त्यातील शब्दयोगी अव्यये अधोरेखित करा.**

आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे. झाडाभोवती भक्कम पार बांधला आहे. त्या पारावर बसून आम्ही डबा खातो. झाडाखाली खेळतो. शाळेची घंटा होईपर्यंत झाडाजवळ मुलांची गर्दी असते. हे वडाचे झाड शाळेच्या पहिल्या दिवसापासून मला एखाद्या मित्राप्रमाणे वाटते.

## भाषेची गंमत

भाषेचा वापर करत असताना व लिहिताना आपण नैसर्गिकरीत्या थांबतो. आपण आजूबाजूला वावरत असताना, प्रवास करत असताना अनेक पाट्या वाचतो. त्यावर काही सूचना दिलेल्या दिसतात. बऱ्याचवेळा काही शब्द योग्य ठिकाणी न जोडल्यास किंवा न तोडल्यास वाक्याचा अर्थ बदलून जातो व त्यातून गंमत निर्माण होते.

उदा., (१) इथे वाहन लावू नये.
इथे वाहन लावून ये.
(२) हिरवळीवर कचरा टाकू नये.
हिरवळीवर कचरा टाकून ये.

या प्रकारची तुमच्या वाचनात आलेली वाक्ये लिहा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना शब्दयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

# ९. नात्याबाहेरचं नातं

**सुभाष किन्होळकर** (१९७०) : ‘मशाल’, ‘रानमेवा’ हे काव्यसंग्रह; ‘ट्रिंग ट्रिंग’, ‘हसत-खेळत’ हे बालकवितासंग्रह; ‘झळ’ ही कादंबरी; ‘गगनगंध’ हा ललितलेखसंग्रह प्रसिद्ध.

लेखक थंडीच्या तडाख्यात सापडलेल्या कुत्र्याच्या गोंडस पिलाला घरी घेऊन येतात. त्याला पाळतात. ‘डांग्या’ नावाच्या या कुत्र्याच्या स्वभावातील स्वामिभक्ती, रुबाबदार दिसणे, वागण्यातील ऐट व त्याचा कुटुंबाला लागलेला लळा इत्यादी गोष्टी प्रस्तुत पाठात लेखकांनी रोचक व वेधक प्रसंगांतून शब्दबद्ध केल्या आहेत.

**तुम्ही काय कराल?**

- एका कुत्र्याच्या पिल्लाच्या पायाला इजा झाली आहे, अशा प्रसंगी तुम्ही काय कराल?
- तुमच्या घराच्या बाहेरील बाजूस चिमणी घरटे बांधत आहे.

थंडीचा हळवा झंकार सर्वांगाला वेढून टाकणारा. रान, पानाफुलांना आपल्या इशाऱ्यावर नाचवणारा. नदीच्या झुळझुळणाऱ्या पाण्याला मंद लहरींवर खेळवणारा. आकाश स्वच्छ. पुनवेच्या रेखीव छटांनी तर रात्रीचं अंतरंगच उजळून निघालेलं. जिकडे तिकडे लख्ख झगमगाट पसरलेला. रात्र काहीशी सामसूम; पण मन वेल्हाळ.

रात्र जशीजशी आगेकूच करू लागलेली तशी थंडीची लाटही वाढलेली. सारी थरथरती लाट मफलर, कानटोपी आणि स्वेटरमध्ये बंदिस्त झालेली. अशा कडाडत्या थंडीतही गावगल्लीची वाट सरळ गावाबाहेर घेऊन गेलेली. तिथं चार-सहा जणांचा घोळका शेकोटी पेटवून असलेला. शेकोटीभोवती मक्याच्या कणसांचा भुसा पडलेला. चार-दोन गवऱ्याही त्याच्या बाजूला आपल्या अस्तित्वाची चाहूल देत असलेल्या. शुभ्र चांदण्यांच्या प्रकाशकिरणांत त्यांच्या चाललेल्या भेंड्यांना रंग चढलेला. माझाही त्यांच्यातील सहभाग आनंदाची वृद्धी करणारा. शेकोटीपासून दहा-पंधरा पावलांच्या अंतरावर असलेलं एक कडुलिंबाचं झाड चांदण्यांच्या लख्ख प्रकाशात अधिकच प्रसन्न दिसत होतं. वाऱ्याच्या झोतात हलणारी त्याची डहाळी मन आकर्षित करणारी. सारं भावस्पंदनावर झंकार उठवणारं. अशा चित्तवेधक झाडाच्या बुंध्याशी नजर वळताच आश्चर्याचा धक्का बसून गेलेला. कसली वळवळ म्हणावी? कोण असावं?

नकळत माझी पावलं बुंध्याच्या दिशेनं वळली. सोबतीला मित्रही. सर्वांनाच उत्सुकता लागलेली. काय असावं बरं तिथं एवढ्या कडक थंडीत! पाहतो तर काय... एक लहानसं कुत्र्याचं पिल्लू. अंगाचं गाठोडं करून पडलेलं. समोरच्या दोन्ही पायांत मान खुपसलेली. हुडहुडी रोखण्याचा त्याचा चाललेला प्रयत्न आम्हांला सुन्न करून गेला. थंडीच्या ओलसरपणानं त्याच्या केसांवर जणू कुणी पाणीच शिंपडलंय की काय असा भास झालेला. इवल्याशा जिवाला तशी थंडी असह्यच.

रात्रीचा दहा-साडेदहाचा सुमार. गाव तसं शांतच. अशा शांत वातावरणात त्या इवल्याशा पिल्लाची तीक्ष्ण नजर आमच्यावर खिळली. काय शोधत असावं ते पिल्लू आमच्यात? आधार तर मागत नसावं! अगदी आधारच, म्हणूनच तर त्याचं नखशिखान्त न्याहाळणं चाललेलं. आमच्याकडे वळलेली त्याची दृष्टी त्याच्या सगळ्या वेदनांना डोहात टाकणारी. अधूनमधून त्याचं चाललेलं कण्हणं, विराम शांततेचा भंग करणारं. त्याच्याविषयी सगळ्यांच्या मनात कणव निर्माण झाली. त्यानं उठण्याचा प्रयत्न केला, पण पाय बधिर झालेले.

त्या पिल्लाची धडपड पाहून माझी पावलं नकळत त्याच्या दिशेनं खेचली गेली. मला येताना पाहून त्याला एकदम हायसं वाटलं. आधार देण्यासाठी कुणीतरी

धावून आल्याची त्याला जाणीव झाली. पाय उचलून त्यानं माझं स्वागत करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. माझ्या हाताचा त्याला स्पर्श होताच त्याच्या डोळ्यांत लख्ख प्रकाश जाणवला. त्याला अतिशय सुखावल्यासारखं वाटलं. का, कशी, पण त्याच्याविषयी माझ्या मनात स्नेहभावना उमलली. त्याचं अंग थरथरू लागलं. त्याची हुडहुडी रोखण्यासाठी मी माझ्या गळ्यातला मफलर त्याच्या अंगावर टाकला. मफलरमुळे काहीशी ऊब मिळाल्यानं त्याचा चेहरा अधिकच खुलला. हुडहुडीही थांबली.

दिलं तर त्यानं कोठे जावं ? कोण देईल त्याला आधार ? कोण लळा लावील ? असे कितीतरी प्रश्न मनात घिरट्या घालून गेले; पण त्याला असं अर्ध्यावर सोडून देणं अशक्य. पुन्हा बाबांचा मुक्या शब्दांचा मार निमूटपणे सोसला.

पिल्लू दिसायला कापसासारखं. तेजस्वी डोळे, मऊ कान, लांबट नाक. त्याला पाहताच प्रेम जडावं इतकं आकर्षक. त्याला हवा असलेला माझा आधार अगदी पक्का, म्हणून रात्रभर त्याला अंथरुणापाशी झोपवलं. माझ्या अंगावरील ब्लँकेटच्या उबेमुळे त्याला



लहानग्या गोंडस पिल्लाला हवा असलेला आधार मिळाला. त्याला अतिशय खुशी झाल्याचं जाणवलं. त्याच्या चोरट्या नजरेनं त्यानं मला पुन्हा न्याहाळलं. मलाही त्याच्याविषयी आपुलकी निर्माण झाली. त्याला कायमचा आधार मिळावा म्हणून मी त्याला थेट माझ्या घरी घेऊन आलो. घरात माझा प्रवेश होताच घरातली मंडळी एकदम बावरली. ''टाक ते पिल्लू खाली, टाक म्हणतो ना !'' बाबांनी चांगलंच फटकारलं; पण मनात त्या पिल्लाविषयी रुखरुख. आपण पिल्लाला सोडून

थंडीपासून संरक्षण मिळालं. एक मित्र मिळाल्याचं समाधान त्याच्याही आणि माझ्याही चेहऱ्यावर झळकू लागलं. ध्यानीमनी नसताना जुळून आलेलं नातं अगदी सुखावून गेलं. त्याला आता प्रेमाची ऊब मिळाली, त्यामुळे त्याचं कण्हणंही थांबलं. शांत झोपही लागली. चिंबओल्या स्वप्नांचा फुलोर दोघांच्याही स्वप्नात बहरून आला.

सकाळच्या प्रसन्न हळदुल्या किरणांना साक्ष ठेवून त्याचा नामकरण सोहळा क्षणभरात आटोपला गेला.

त्याच्या दांडग्या शरीराला अनुरूप असं त्याचं 'डांग्या' नाव ठेवलं. मित्रमंडळींनाही त्याचं नाव आवडलं. आता तोही सगळ्यांचा खास मित्रच बनला. प्रत्येकाला त्याचा लळा लागला. त्याची दुडुदुडु चाल भावणारीच. त्याचे तेजस्वी डोळे अगदी बोलके. त्याच्या मनातील गोष्टीला जणू उजाळा देणारे. अंगावर पडणारी त्याची झेप उत्साह द्विगुणित करणारी.

डांग्या लहानाचा मोठा होऊ लागला. वाढत्या वयासोबत त्याचा चेहरा अधिक प्रसन्न, शरीरयष्टी अधिक दणकट. त्याचं तरणंबांड शरीर येणाऱ्या-जाणाऱ्याच्या नजरेला भुरळ घालणारं. दोन्ही डोळ्यांच्या खाली असलेले पिवळसर पट्टे आणि मागच्या पायांच्या बोटांवर असलेले लालसोनेरी पट्टे सगळ्यांचं लक्ष आकर्षित करणारे.

डांग्याचं ओट्यावर पाय पसरून बसणं, रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांच्या डोळ्यांना मोहून टाकणारं. दूरवरून आलेली मित्रमंडळींची शीळ तर त्याची जणू पाठच झालेली. शिळेच्या रोखानं त्याचं दुडदुडणं लक्षवेधक. साऱ्या गावाला भुरळ घातलेली. त्याचं सोज्वळ रूप पाहून आईबाबांनासुद्धा त्याचा नकळत लळा लागून गेला. डांग्यालाही त्यांच्याविषयी खूप जिव्हाळा. त्यानं जणू त्यांच्या थेट हृदयातच प्रवेश केला.

त्याच्या नावाची कीर्ती सर्वदूर पसरली. प्रत्येकाच्या डोळ्यांत त्याचं रूप नटलं. डांग्या अतिशय प्रामाणिक. घरादारात, शेतातसुद्धा त्याचा प्रामाणिकपणा जाणवलेला. शेतातील त्याची रखवाली अट्टल चोराची दातखिळी बसवणारी. डांग्याच्या नुसत्या कर्तबगारीनं भल्याभल्यांची बोबडी वळायची. पक्क्या हिमतीचा राखण्या मिळाला, म्हणून त्याच्या नावानं मनात घर केलेलं, जे कधीही विसरता येणार नाही. रात्रीची त्याची राखणदारी उभार डोळे तेवत ठेवणारी.

त्याची भारदस्त छाती पाहून झाडांवरील माकडांची अक्षरश: घाबरगुंडी उडायची. डांग्याचं नुसतं झाडाखाली बसून राहणंही माकडांच्या काळजात धस्स करणारं. एवढंच नव्हे, तर त्याच्या भीतीनं खारूताईसुद्धा पळायची. डांग्या असेपर्यंत तिलाही उपवास. इतर प्राण्यांनासुद्धा भीती वाटावी, असंच त्याचं शरीर अगडबंब.

कोण कशासाठी शेतात आला, याचा अंदाज समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांतून त्याला सहज आलेला असायचा. त्याची हुशारी, चपळता अगदी वाखाणण्याजोगी. एखाद्या वेळी माझी अनुपस्थिती कुणालाही न कळणारी, एवढी छाप डांग्यानं पाडलेली. विश्वस्तच म्हणावा त्याला. त्याच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वानं थेट माझ्या हृदयात शिरकाव केला. एक सच्चा दोस्त मिळाल्याचं समाधान डोळ्यात झळकलेलं.

दूरवरून घुमवलेली शीळ डांग्याच्या कानावर पडली; की मागच्या दोन्ही पायांवर उभा राहून माझ्या येण्याची चाहूल घ्यायचा. मान उंचावून ओळखीचं रूप न्याहाळायचा. कानांची उघडझाप करून पुन्हा दुसऱ्या शिळेचा कानोसा घ्यायचा. एखाद्या पाहुण्याच्या स्वागतासाठी जसं आपण पुढे जाऊन स्मितहास्य करतो, तसाच तोही माझ्या स्वागतासाठी दुडदुडत यायचा. अंगावर झेप घ्यायचा. त्याच्या तोंडानं हात चाटायचा. किती प्रेम एका प्राण्याकडून ! ना नात्याचा, ना गोत्याचा. केवळ एक अनवधानानं, वेळप्रसंगानं घडून आलेलं नातं अविस्मरणीय होऊन गेलं.

***

http://essaynotes.cjkwebgroup.com

https://simple.wikipedia.org/wiki/Dog

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे मूकवाचन करून घ्यावे. पाठातील एखाद्या परिच्छेदाचे अनुलेखन तसेच श्रुतलेखन करून घ्यावे.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील विधानांमागील कारणे लिहा.**

(अ) लेखकांनी कुत्र्याच्या पिल्लाला थेट घरी आणले.

(आ) लेखकांनी कुत्र्याच्या पिल्लाचे नाव 'डांग्या' ठेवले.

(इ) लेखक डांग्याला 'पक्क्या हिमतीचा राखण्या' म्हणतात.

**प्र. २. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) थंडीच्या झंकाराची वैशिष्ट्ये.

↓ ↓ ↓ ↓

(इ) खालील बाबतींत डांग्याचे वर्णन करा.

↓ दिसणे ↓ शरीरयष्टी ↓ चाल ↓ नजर

(आ) कुत्र्याच्या पिल्लाला थंडी असह्य झाली, हे वर्णन करणारी पाठातील वाक्ये.

↓ ↓ ↓ ↓ ↓

**प्र. ३. खालील घटनांचे काय परिणाम झाले ते लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) लेखकांनी पिल्लाच्या अंगावर मफलर टाकला. | |
| (२) कुत्र्याचं पिल्लू रात्रभर लेखकांच्या अंथरुणापाशी झोपलं. | |
| (३) लेखकांच्या हाताचा डांग्याला स्पर्श झाला. | |
| (४) लेखकांच्या मित्रमंडळींनी दूरवरून घुमवलेली शीळ डांग्याच्या कानावर पडली. | |

**प्र. ४. योग्य जोड्या लावा.**


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पिल्लाची धडपड पाहून | (अ) थंडी असह्य होत होती. |
| (२) रात्र आगेकूच करू लागली | (आ) मन आकर्षित करत होती. |
| (३) वाऱ्याने हलणारी डहाळी | (इ) थंडीची लाट वाढली. |
| (४) इवल्याशा जिवाला | (ई) पावलं नकळत त्याच्याकडे खेचली गेली. |


## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे तुम्हांला समजलेले अर्थ लिहा.**

(१) हुडहुडी
(२) रुखरुख
(३) फुलोर
(४) अष्टपैलू व्यक्तिमत्त्व
(५) विश्वस्त
(६) सोहळा


**(आ) खालील शब्दांचा सहसंबंध लावा.**




**(इ) खालील प्रत्येक शब्दासाठी कुंडीत फुललेल्या शब्दांतून दोन-दोन विरुद्धार्थी शब्द शोधा व लिहा.**

(१) थंड ×
(२) शांत ×
(३) मान ×
(४) स्वदेश ×
(५) आरंभ ×




**(ई) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कणव निर्माण होणे. | (अ) दया निर्माण होणे. |
| (२) काळजात धस्स होणे. | (आ) उत्साह वाढणे. |
| (३) उत्साह द्विगुणित होणे. | (इ) आकर्षित करणे. |
| (४) भुरळ घालणे. | (ई) भीतीने धक्का बसणे. |

**(उ) खालील शब्द अभ्यासा आणि तुमच्या लेखनात त्यांचा वापर करा.**


(१) नखशिखान्त- पायाच्या नखांपासून डोक्यापर्यंत.
(२) आपादमस्तक- पायापासून डोक्यापर्यंत.

**उपक्रम :**

टीव्हीवरील विविध वाहिन्यांवर प्राणिजीवनविषयक प्रसारित होणारे कार्यक्रम तुम्ही पाहता. तुम्हांला आवडणाऱ्या प्राणिजीवनविषयक कार्यक्रमांची यादी तयार करा.



## लिहिते होऊया.




## आपण समजून घेऊया.

- **शब्दयोगी अव्यये व क्रियाविशेषण अव्यये यांतील फरक.**

  खालील दोन गटांतील वाक्ये वाचा.

| गट १ | गट २ |
| --- | --- |
| (१) मी रोज सकाळी सहा**पूर्वी** उठतो. | (१) **पूर्वी** राजेशाही होती. |
| (२) तो आरशा**समोर** उभा होता. | (२) माझा मित्र **समोर** उभा होता. |
| (३) डोंगरा**वर** हिरवेगार गवत उगवले होते. | (३) ताईने **वर** पाहिले. |

वरील दोन्ही गटांत 'पूर्वी, समोर, वर' हे शब्द दिसतात. पहिल्या गटात ते शब्दांना जोडून आले आहेत, म्हणून ती **शब्दयोगी अव्यये** आहेत. दुसऱ्या गटात ते स्वतंत्रपणे आले असून वाक्यांतील क्रियापदांबद्दल विशेष माहिती सांगतात, म्हणून ती **क्रियाविशेषण अव्यये** आहेत.

- **खालील शब्दांचा 'क्रियाविशेषण' व 'शब्दयोगी अव्यये' असा दोन्ही प्रकारे उपयोग करून प्रत्येकी दोन वाक्ये लिहा.**

  पुढे, मागे, बाहेर, खाली, जवळ, नंतर.

- **खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा व ती कोणत्या शब्दांशी संबंध जोडतात ते लिहा.**

  (अ) मी परीक्षेनंतर पोहण्यास शिकणार आहे.


  (आ) तुझ्यादेखील हे लक्षात कसे आले नाही ?

  (इ) रस्त्यावरील विजेचे दिवे गेले होते.

  (ई) देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का ?

**लक्षात ठेवा :** शब्दयोगी अव्यये सामान्यत: नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात; पण कधीकधी ती क्रियापदे व क्रियाविशेषणे यांनाही जोडून येतात. उदा., बोलल्यावर, आल्यानंतर, थोडासुद्धा, कालपर्यंत, पूर्वीपेक्षा.

# १०. गोमू माहेरला जाते



• ऐका. वाचा. म्हणा.

गोमू माहेरला जाते हो नाखवा ।
तिच्या घोवाला कोकण दाखवा ।।

दावा कोकणची निळी निळी खाडी
दोन्ही तीराला हिरवी हिरवी झाडी
भगवा अबोली फुलांचा ताटवा ।।१।।


कोकणची माणसं साधी भोळी
काळजात त्यांच्या भरली शहाळी
उंची माडांची जवळून मापवा ।।२।।

सोडून दे रे खोड्या साऱ्या
शिडात शीर रे अवखळ वाऱ्या
झणी धरणीला गलबत टेकवा ।।३।।

**ग. दि. माडगूळकर** (१९१९-१९७७) : प्रसिद्ध कवी, लेखक, पटकथालेखक, कादंबरीकार, 'गीतरामायणकार'. 'जोगिया', 'चैत्रबन', 'वैशाखी', 'पूरिया' इत्यादी गीतसंग्रह; 'गीतगोपाल', 'गीतसौभद्र' ही काव्यनिर्मिती; 'कृष्णाची करंगळी', 'तुपाचा नंदादीप' हे कथासंग्रह; 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या प्रसिद्ध.

कोकण, कोकणातील खाडी, तेथील निसर्गसौंदर्य, कोकणातील साधी भोळी माणसे यांचे सुरेख वर्णन प्रस्तुत गीतात कवीने केले आहे.

## स्वाध्याय



**प्र. १. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचे कवी | कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेत वर्णन केलेल्या गोष्टी |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. २. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) गोमूचे माहेर– ☐

(आ) कोकणची माणसं– ☐

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) कोकणची वैशिष्ट्ये

(आ) खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(अ) काळजात त्यांच्या भरली शहाळी → ☐

(आ) झणी धरणीला गलबत टेकवा → ☐

**प्र. ४. कवीने वाऱ्याला केलेल्या विनंतीचा अर्थ तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**



### चर्चा करूया.

- **शहाळ्यातले पाणी आरोग्यदायी असते, याबाबत शिक्षक व पालकांशी चर्चा करा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) नाखवा (३) भोळी

(२) खाडी (४) साऱ्या

**(आ) खालील शब्दांचे तुम्हांला माहीत असणारे अर्थ लिहा.**

(१) शीड (२) माड (३) खाडी (४) शहाळी (५) झणी (६) गलबत



## विचार करा. सांगा.

- **तुमच्या घरी आलेल्या पाहुण्यांना तुम्ही तुमच्या गावातील कोणकोणती स्थळे दाखवाल, त्या स्थळांचे थोडक्यात वर्णन करा.**

## माहिती मिळवूया.



- **आपल्या देशातील कोणकोणत्या राज्यांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या राज्यांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.**
- **आपल्या राज्यातील कोणकोणत्या शहरांना, गावांना समुद्रकिनारा लाभला आहे, त्या गावांच्या, शहरांच्या नावांची माहिती आंतरजालावरून मिळवा व नोंद करा.**

## आपण समजून घेऊया.


- **खालील परिच्छेद वाचा.**

नंदा आणि आई मंडईत पोहोचल्या अन् पावसाची रिमझिम सुरू झाली. आई नंदाला म्हणाली, ''तू कांदे, बटाटे व लसूण घे, तोपर्यंत मी भाजीपाला घेते.'' आईने भाजीपाला खरेदी केला, शिवाय फळेही घेतली. नंदाने आईला विचारले, ''आई, लसूण घेऊ की आले घेऊ?'' आई म्हणाली, ''दोन्ही घे; पण लवकर आवर, कारण जोराचा पाऊस सुरू होईल. पाऊस आला, तर आपण भिजू; म्हणून तुला 'घाई कर' असं सांगते आहे.'' नंदा म्हणाली, ''कशाला एवढी चिंता करतेस? आपण रिक्षा किंवा बसने घरी जाऊ, म्हणजे आपण पावसात भिजणार नाही.''

वरील परिच्छेदातील अधोरेखित शब्द दोन वा अधिक शब्दांना किंवा दोन वा अधिक वाक्यांना जोडण्याचे काम करतात, म्हणून या शब्दांना **उभयान्वयी अव्यये** म्हणतात.

'उभय' या शब्दाचा अर्थ **दोन** व 'अन्वय' या शब्दाचा अर्थ **संबंध** असा आहे. दोन शब्द किंवा दोन वाक्ये यांचा संबंध जोडणे, हे उभयान्वयी अव्ययाचे कार्य आहे. आणि, शिवाय, की, पण, अथवा, अन्, परंतु, नि हे सर्व शब्द **उभयान्वयी अव्यये** आहेत.

- **खालील उभयान्वयी अव्ययांचा वाक्यांत उपयोग करा.**




- **खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये अधोरेखित करा.**

(अ) सशाची आणि कासवाची पळण्याची शर्यत लागली.
(आ) आईने काटकसर केली; पण काही शिल्लक उरले नाही.
(इ) ती कलिंगड किंवा खरबूज आणणार आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उभयान्वयी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

## भाषेचा नमुना

# सामवेदी बोली

गावात झुजूकाका घारा पेपर यासॉ. तॉपान दोपारसॉ बारा वाजता. झुजूने पेपर उगडलॉ आन पेपरराशी काळ्या अक्षरात लिवीलेली हेडलाईन जोराय वाशीली. 'वसईच्या पश्चिम किनारपट्टीवर स्कायलॅब पडणार.' आत्ये या स्कायलॅबला पड्यादो वसयसॉ किनारॉ बरॉ दिखलॉ. पेपराशा या बातमीन्ये जकल्या गावाशे जकले घाभरे घुभरे झाले. स्कायलॅब पड्यासा आन आपून जकले मरॅशे. मग का? आत्ये रेल्यात तोड्ये दि धमाल करॉन घ्याऑ या कल्पनेने जकले मज्या करण्या कामाला लागले. लोकांना आजूबाजूला बग्यादो वेळूस नॉतो. जही जही १४ तारीख जवळ येतोती तही तही जकल्याई अवस्था घनी बिकट हॉत गेली. बबनशी गत पान तहीस होती. भाटात केळीऑ अंगाठो जरी मोडलो तरी त्याला वाट्यासा स्कायलॅब पडले हायदे आ? एकदासा चौदा जानेवारीओ दी उजाडलो. जॉहो उजाडलॉ तॉहो, तो मावळलॉ पान. पान स्कायलॅब पडताना कुनालास दिखला नाय; पान अजून रात बाकी होती. कहेबहे जिवणे आटपॉन लोक खाट्येऑर पडलॉता पान निज भगून कुना डॉळ्यात येत नॉती. रात आस्ते आस्ते पुड्ये सरकातोती. घड्याळाये काट्ये कय दिखात नॉते, पान त्याई टिकटीक जोराय आयकॉ येतोती. आन एकदम भॉठो आवाज जालॉ. बायारशा खांबोरसॉ दिऑ विजलॉ. लाईट गेली. काळॉकिट. बबनने हळूहळू डॉळे उगडले. समोर त्याला त्याई बय बारझाड करताना दिखली. समोर बय दिखलेऑर त्याला बरा वाटला. त्याने बयला हाक मारली. 'बलो, स्कायलॅब आपल्यास घरोर पडला गा का?' 'रातसा कईस पडला नाय, पान पात्येराती शिशा झाड पडला.'

बरोबर साडेबारा टोल्याला पेपरवालॉ काका आलॉ. त्याने टाकीलॅलो पेपर झुजूने टुक्याशा अगोदर बबनने टुकीलॉ, आन पेपरातशी हेडलाईन जकल्याना आयको जायदे ऑड्या जोरात वाशीली. 'काल सकाळी दहा वाजून १० मिनिटांनी स्कायलॅब अरबी समुद्रात कोसळले.' क्षणभर जकला शांत जाला, आन जमलेल्या जकल्यांने एकदम जल्लोश केलॉ.

**सिरील मिनेझीस** (१९६५) : प्रसिद्ध लेखक. 'धरायला गेलो एक', 'आभास' इत्यादी मराठी एकांकिका; 'मिंगॅरऽ ऽऽ' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

'बबन' या कथासंग्रहातून वरील उतारा घेतला आहे.

## शोध घेऊया.



- **कोकणी बोलीभाषेत साहित्यलेखन करणाऱ्या विविध लेखक व कवींची माहिती मिळवा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना बोलीभाषेतील वरील उतारा योग्य उच्चारांसह वाचून दाखवावा. उताऱ्यातील शब्दांचे अर्थ व भाषेचे वेगळेपण समजावून सांगावे.

# ११. बाली बेट

भाग - ३

**पु. ल. देशपांडे** (१९१९-२०००) : प्रसिद्ध विनोदी लेखक व नाटककार. 'नस्ती उठाठेव', 'बटाट्याची चाळ', 'गोळाबेरीज', 'असा मी असा मी', 'फसवणूक' इत्यादी विनोदी पुस्तके; 'अंमलदार', 'भाग्यवान', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'ती फुलराणी' इत्यादी नाटके; 'व्यक्ती आणि वल्ली' हे व्यक्तिचित्रण; 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' ही प्रवासवर्णने प्रसिद्ध.

C33H0J

प्रस्तुत पाठात लेखकांनी इंडोनेशियामधील बाली बेट व तेथील निसर्गसृष्टी यांचे नयनरम्य वर्णन केले आहे.

**तुम्हांला काय वाटते?**

- एखाद्या ठिकाणी सहलीला जाण्यापूर्वी कोणकोणत्या गोष्टींची पूर्वतयारी करणे आवश्यक असते, असे तुम्हांला वाटते? त्या सर्व गोष्टींची यादी तयार करा.

इंडोनेशिया हा समुद्रात रत्नजडित कंठा फेकून द्यावा, तसा एक पाचूच्या बेटांचा पुंजका आहे; पण बाली मात्र ह्या कंठ्यातील कंठमणी. इंडोनेशियातल्या बेटांच्या समूहात बाली बेट एखाद्या ठिपक्यासारखेच, आपल्या गोव्याएवढे आणि गोव्यासारखेच.



आपल्या नृत्य-गायन-शिल्प-चित्र अशा विविध ललितकलांचा रंगीबेरंगी गोफ विणणारे. ह्या बेटात भारतीय संस्कृतीचे केवळ अवशेष आहेत असे म्हणणे, हा ह्या बेटांचा अपमान आहे. लक्ष मोती उधळून मातीत चूर होऊन जावे आणि एखादा मोती कुठेतरी दूर पडून तसाच अभंग राहावा, असे हे बाली बेट आहे.

जकार्ताहून रात्री अकराच्या सुमारास बालीला जाणाऱ्या विमानातून निघालो आणि मध्यरात्री बालीमधल्या देनपसार गावच्या चिमुकल्या विमानतळावर उतरलो. बाली हा टुरिस्टांचा स्वर्ग, त्यामुळे इथले टुरिस्टखाते अतिशय तत्पर आहे. मी कोण आहे, हे कळल्यावर तिथला एक तरुण अधिकारी म्हणाला, ''तुम्हां उभयतांचे अधिक मन:पूर्वक स्वागत!''

मध्यरात्रीची वेळ. किर्र जंगलातून आमची मोटार समोरचा वळणदार रस्ता काटत निघाली होती. भोवती माडांच्या राया. मधूनच झापांची छपरे असलेला झोपड्यांचा पुंजका मोटारीच्या दिव्यांच्या प्रकाशात दिसून नाहीसा होई. माझ्या शेजारी बसलेल्या अमेरिकन म्हातारीने तेवढ्यात 'हौ वंडऽफुल्!' म्हणायला सुरुवात केली होती. एखाद्या रहस्यमय कादंबरीच्या पहिल्या पानातून जावे तसे सुमारे तास, दीडतास त्या किर्र झाडीतून वाट काढत आमची मोटार सागर बीच हॉटेलच्या टुमदार बंगलीपुढे आली आणि तिथल्या तरुण बाली सुंदरीने आमचे स्वागत केले. रात्रीचा दीड-दोनचा सुमार असेल; पण ती तरुणी आणि स्वागत विभागातले ते चपल तरुण चेहऱ्यावर जागरणाचा यत्किंचितही ताण न दाखवता स्वागत करत होते. ह्या बेटात घड्याळ नावाची गोष्ट नाही, हे लगेच लक्षात आले. त्यांनी आम्हां प्रवाशांच्या नेमलेल्या खोल्या दाखवून दिल्या. पाच मिनिटांतच बाली बेटाने माझे घोरणे ऐकायला सुरुवात केली.

पहाटे लवकर जाग आली. बाहेरच्या ओटीवर येऊन पाहातो तो दारात समुद्र! त्या अंधूक प्रकाशात कोळ्यांच्या चिमुकल्या होड्या मासेमारीला निघाल्या होत्या. ओटीपुढच्या अंगणात मी फिरायला सुरुवात



केली. फक्त देवळातला पहाटेचा चौघडा वाजत नव्हता, एरवी थेट गोवे. मी जनाची किंवा मनाची पर्वा न करता मुक्त आवाजात गायला सुरुवात केली— 'प्रियेऽ पहा! रात्रीचा समय सरुनि येत उष:काल हाऽऽ!' अण्णा किर्लोस्करांनी गुर्लहोसूरच्या आसपास असलीच एखादी पहाट फुटताना पाहूनच ते गाणे लिहिले असावे. एखाद्या रम्य नाटकाची नांदी सुरू व्हावी तशी ती पहाट होती. पहाटेला स्वप्नांची परिसमाप्ती होते म्हणतात; पण बाली बेटातल्या त्या पहाटेने एका स्वप्नाची नांदी सुरू केली आणि चांगला आठवडाभर मी त्या बालीतल्या स्वप्नसृष्टीत वावरत होतो. असा सुंदर प्रदेश आणि इतकी अश्राप माणसे पुन्हा कधी पाहायला मिळणार?

इंडोनेशियावर डचांनी राज्य केले; पण बालीला मात्र कोणी बदलू शकले नाहीत. कुणी म्हणतात, डचांनी बालीचा म्यूझिअम पीस केला. ह्या बेटाचे प्रदर्शन मांडले. त्यांच्या चित्रविचित्र चाली तशाच ठेवल्या. टुरिस्टांचे आकर्षण कायम राहावे म्हणून असेलही कदाचित; पण जे आहे ते रम्य आहे, मनोहर आहे, निष्पाप आहे; पण 'आहे' म्हणताना जीभ चाचरते, कारण सुधारलेल्या दुनियेकडून येणारे वारे बाली बेटावरूनही वाहू लागले आहेत. डोक्यावर विमाने घरघरायला लागली आहेत. रेडिओने त्यांना उरल्या जगाशी जखडले आहे. एखादा तंबूतला सिनेमाही फिरत असेल, शिवाय वर्तमानपत्रेही आहेतच.

हॉटेलातल्या त्या बगिचातून मी आणि माझी पत्नी नाटकातल्या बगिचाच्या प्रवेशातून हिंडल्यासारखे हिंडत होतो. समुद्रकिनाऱ्याच्या इतक्या जवळ, इतका गर्द बगिचा क्वचित पाहायला मिळतो. माडापोफळींच्या राया असतात; पण माड आणि पोफळींखेरीज इतर इतकी झाडे होती, की काही वेळाने आम्ही त्या झाडांकडे पाहत नसून ती झाडेच 'ही कोण मंडळी आली आहेत' म्हणून आमच्याकडे पाहताहेत की काय, असे मला वाटायला लागले. मला अज्ञात असलेल्या फुलांनी बहरलेली ती रोपटी! एखाद्या शिशुवर्गात शिरल्यावर तो वर्ग जसा काहीशा भीतीने नि काहीशा गमतीने नव्या पाहुण्यांकडे पाहतो, तशी ती फुले आमच्याकडे पाहत होती. आम्ही पुढे सरकल्यावर त्यांनी एकमेकांकडे पाहून मिस्कीलपणाने डोळेही मिचकावले असतील. ती फुलबाग त्या भल्या पहाटे अगदी टवटवीत जागी होती. वेलींचेही अंगधुणे झाले होते. वृद्ध वृक्षांचा समुदाय तेवढा अजून झोपेतल्या डुलक्या देत होता. काही जागी, काही झोपलेली अशी त्या सागर बीच हॉटेलातील ती बाग एखाद्या मुलांमाणसांनी, लेकीसुनांनी भरलेल्या नांदत्या गाजत्या एकत्र कुटुंबासारखी वाटत होती. उणीव होती ती पहाटेचे मंगल पाठ म्हणणाऱ्या सृष्टीच्या गाणाऱ्या भाटांची! बाली बेटात जर मला कुठे शोधून सापडले नसतील तर ते पक्षी. इतक्या सुंदर बेटावर पाखरे का नसावीत? त्या भाटांची उणीव मी माझ्या गाण्याने भरून काढत होतो. कदाचित त्या स्वरांनीच भयभीत होऊन तो पक्षिगण बेट सोडून त्या दिवशी बेपत्ता झाला असल्यास न कळे! शापसंभ्रमातल्या पुंडरिकासारखा 'मजवरि तरु कुसुमरेणु वरुनि ढाळिती–' म्हणत म्हणत माझ्या सहधर्मचारिणीसमवेत मी त्या बागेतून हिंडलो. बाली बेटावरच्या त्या पहाटवाऱ्याने आम्हांला पुरते झपाटले होते. पहाटेचे एकच सुंदर स्वप्न दोघांनाही एकदम पडले होते.

***

## स्वाध्याय



**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**

(अ) बाली बेटावरील विविध ललितकला

(आ)

| बेटाचे वर्णन करण्यासाठी लेखकांनी वापरलेले शब्द | बाली बेटावरील कलांसाठी लेखकांनी वापरलेले शब्द |
|---|---|
| | |

**प्र. २. खालील कल्पना स्पष्ट करा.**


(अ) बाली बेट म्हणजे रत्नजडित कंठ्यातील कंठमणी आहे.

(आ) बाली हा टुरिस्टांचा स्वर्ग आहे.

(इ) ह्या बेटावर घड्याळ नावाची गोष्ट नाही.

(ई) बाली बेटावरील बाग एकत्र कुटुंबासारखी वाटत होती.

**प्र. ३. खालील मुद्द्यांच्या आधारे बाली बेटाची माहिती लिहा.**




**प्र. ४. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) पहाटेला स्वप्नांची परिसमाप्ती होते म्हणतात.

(आ) पाच मिनिटांतच बाली बेटाने माझे घोरणे ऐकायला सुरुवात केली.

(इ) वेलींचेही अंगधुणे झाले होते.

(ई) त्या भाटांची उणीव मी माझ्या गाण्याने भरून काढत होतो.



**विचार करा. सांगा.**

- **बाली बेटावर पक्षी का नसतील ?**
- **आज शहरात चिमण्या का दिसत नाहीत ?**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचा अर्थ समजून घ्या.**

(अ) टुरिस्टांचा स्वर्ग. (इ) अश्राप माणसे. (उ) तंबूतला सिनेमा.

(आ) किर्र जंगल. (ई) गाणारे भाट.

**(आ) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन भिन्न अर्थ लिहा.**

(अ) अभंग– (आ) बोट–

**(इ) खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**

(१) उभयता (२) यत्किंचितही (३) चौघडा (४) चित्रविचित्र

**उपक्रम :**

पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेली पुस्तके मिळवा. वाचा.

## शोध घेऊया.



**(अ) आंतरजालाच्या साहाय्याने आशिया खंडाचा नकाशा पाहा. आशिया खंडातील कोणकोणत्या देशांना समुद्रकिनारा लाभला आहे व त्या समुद्रांत कोणती बेटे आहेत याचे निरीक्षण करा व त्याची नोंद करा.**


| देश | लाभलेला समुद्रकिनारा | तेथील बेटे |
|---|---|---|
| | | |

**(आ) आंतरजालाच्या साहाय्याने अंदमान–निकोबार या बेटांची माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे मिळवा.**

(१) तेथील आदिवासी (३) निसर्गसौंदर्य

(२) आदिवासींचे जीवनमान (४) तेथील सोईसुविधा

- **प्रेक्षणीय स्थळाच्या संदर्भात खाली काही मुद्दे दिले आहेत. त्यांच्या आधारे तुम्ही भेट दिलेल्या एखाद्या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन लिहा.**



## माहिती मिळवूया.



### केल्याने देशाटन...

**त्वरा करा ! त्वरा करा !**

**आजच लक्ष्मी टूर्सला भेट द्या !**

**लक्ष्मी टूर्सतर्फे आयोजित उन्हाळी सुट्टीतील खास परदेश सहल**



**आपली सहल निश्चित करा.**
**उन्हाळी सुट्टीचा आनंद घ्या.**

**२८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करणाऱ्याला प्रवास-शुल्कात ५०% सवलत व भेटवस्तूंची खैरात.**

**सहलीचा कालावधी : मे महिना**

**संपर्कासाठी कार्यालयाचा पत्ता : लक्ष्मी टूर्स, लक्ष्मीकांत बिल्डिंग, लक्ष्मीनगर, पुणे.**

- **वरील जाहिरात वाचा. त्याआधारे खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) सहलीचे आयोजक कोण आहेत ?
(२) सहलीची वैशिष्ट्ये कोणती ?
(३) सहलीला जाण्यासाठी नोंदणी करणाऱ्याला सवलत का दिली असावी, असे तुम्हांला वाटते ?
(४) प्रस्तुत जाहिरात विश्वसनीय आहे, असे तुम्हांला वाटते का ? जाहिरातीतील कोणती गोष्ट तुम्हांला अविश्वसनीय वाटते ?

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास !
चांगले काम केलेस बाळा !



अरेरे !
फार वाईट झाले !



बापरे !
केवढा मोठा साप !




अहाहा !
पिसारा फुलवलेला मोर !

वरील वाक्यांतील शाबास, अरेरे, बापरे, अहाहा ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांना **उद्गारवाचक शब्द** असेही म्हणतात. वा, आहा, अहाहा, अरेरे, अबब, बापरे, ठीक, अंहं, छे ही काही केवलप्रयोगी अव्यये आहेत. तुम्हांला आणखी काही सुचतात का पाहा आणि लिहून काढा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा.

• खालील चित्रांचे निरीक्षण करा. चित्रांतील व्यक्ती कोणत्या चुका करत आहेत, त्या चुकांचा परिणाम काय होऊ शकतो, यांवर गटात चर्चा करा. चर्चेतील मुद्द्यांचे वर्गात गटनिहाय सादरीकरण करा.




वाहतुकीचे नियम पाळा,
रस्त्यांवरचे अपघात टाळा.



असा प्रवास धोकादायक,
जिवावर बेतल्यास हानिकारक.



वाहनांची क्षमता जाणून घ्या,
सुरक्षित प्रवासाची हमी घ्या.



हसा, खेळा, पण शिस्त पाळा,
रस्त्यावर खेळण्याचा मोह टाळा.

• खालील पाट्यांवर वाहतूक सुरक्षिततेच्या संदर्भात घोषवाक्ये तयार करून लिहा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध सामाजिक समस्यांच्या संदर्भातील चित्रांचा संग्रह करण्यास सांगावे. अशी संग्रहित चित्रे विद्यार्थ्यांच्या गटागटांत देऊन त्यावर चर्चा घडवून आणावी. चर्चेनंतर गटनिहाय सादरीकरण करून घ्यावे.

# १२. सलाम–नमस्ते !

**सुधा मूर्ती** (१९५०) : प्रसिद्ध लेखिका. 'वाइज अँड अदरवाइज', 'सामान्यांतले असामान्य', 'अस्तित्व', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'गोष्टी माणसांच्या' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. प्रस्तुत पाठ 'पुण्यभूमी भारत' या कथासंग्रहातून घेतला आहे. सुधा मूर्ती यांच्या मूळ इंग्रजी कथासंग्रहाचा मराठी अनुवाद लीना सोहोनी यांनी केला आहे.

C3CS57

अत्यंत गरीब परिस्थिती असूनही माणुसकी, प्रामाणिकपणा, कष्टाळूवृत्ती, दुसऱ्यांच्या दु:खांविषयीची जाणीव इत्यादी गुण शेख महंमद व त्याची मृत्यूच्या दारात उभी असलेली बहीण झुबेदा यांच्या ठायी दिसून येतात.

प्रस्तुत पाठात लेखिकेने याचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन केले आहे.

**माहिती मिळवा.**

- तुमच्या परिसरातील गरजू, अनाथ, अपंग इत्यादी व्यक्तींसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांविषयी माहिती मिळवा.

शेख महंमदचं एक छोटंसं दुकान होतं. तो वह्यांची किरकोळीनं विक्री करायचा. दरवर्षी जून महिन्यात मी त्याच्याकडून मोठ्या संख्येनं वह्या विकत घेत असे. आम्ही त्या झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वाटत असू. त्याचं दुकान आमच्या ऑफिसच्या जवळच होतं. दुकानाची जागा भाड्याची होती. शेख महंमद फार संकोची स्वभावाचा होता. तो वह्या आणून आमच्याकडे पोहोचवायचा. आमचा चेक तयार झाला, की आम्ही त्याला तसं कळवायचो. मग तो येऊन चेक घेऊन जायचा.

एकदा असाच तो आमच्या ऑफिसात आला होता. त्या वेळी आम्ही सर्वजण मिठाई खात होतो. मी शेखच्या हातावर मिठाई ठेवली; पण त्यानं ती खाल्ली नाही.

''का रे शेख? तुला मधुमेहाचं दुखणं वगैरे आहे का?''

''नाही मॅडम. खाऊ घरी न्यावा म्हटलं. घरात लहान मुलं आहेत. माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.''

''तुला किती मुलं आहेत?'' मी विचारलं. ती तेवढीशी मिठाई घरी जाऊन पुरली असती की नाही, कोणास ठाऊक !

''मॅडम, मला एक मुलगी आहे. शिवाय माझी भाचीपण माझ्याकडेच असते.''

''का बरं? तुझी भाची तुझ्याकडे का असते?''

''माझी बहीण झुबेदा विधवा आहे आणि ती आमच्याकडेच राहते.''

मला ते ऐकून शेखबद्दल वाईट वाटलं. तो एक छोटा दुकानदार होता. तो काही खूप कमवत नव्हता, त्यामुळे त्याच्या कुटुंबाविषयी आणखी माहिती काढावीशी मला वाटली.

''झुबेदा काय करते?''

''ती उत्तम शिवणकाम करते. ती आणि माझी बायको अशा दोघीजणी मिळून घरी शिवणाचा व्यवसाय करतात. अल्लाची मेहेरबानी आहे. आमचं छोटंसं भाड्याचं घर आहे. आम्ही समाधानी आहोत.''

त्याचं ते उत्तर माझ्या हृदयाला स्पर्श करून गेलं. आजकालच्या जगात 'समाधान' हा शब्द तसा दुर्मीळच झाला आहे.

असेच काही महिने लोटले आणि एक दिवस शेखचा मला फोन आला, ''मॅडम, या खेपेला मला तुम्ही चेक ॲडव्हान्समध्ये देऊ शकाल का?''

''का बरं शेख? काही खास कारण?''

''होय मॅडम. झुबेदाला कॅन्सर झालाय. उद्या तिचं ऑपरेशन आहे.''

मी ताबडतोब ऑफिसात निरोप ठेवून चेक त्याच्या घरी लगेच पाठवून दिला; पण त्याच्याबद्दल मनात

विचार येऊन मन उदास झालं. त्या ऑपरेशनचा खर्च भरपूर येणार होता, ती रक्कम जमा करण्यासाठी शेखची नक्कीच खूप धावपळ चालू असणार; पण तरीही त्यानं माझ्याकडे पैसे मागितले नव्हते.

अनुभवानं मला बरंच काही शिकवलंय. आपल्या स्वत:च्या हिऱ्याच्या कुड्या पर्समध्ये लपवून गोरगरिबांसाठी निधी गोळा करायला आलेल्या बायका मी पाहिल्या आहेत. आपल्या मुलांना शिष्यवृत्ती मिळावी, म्हणून ती मुलं अनाथ असल्याचं सांगताना, चांगल्या सधन कुटुंबातल्या आई-वडिलांना मी पाहिलंय. कितीतरी माणसं फाउंडेशनकडून मदत पदरात पाडून घेण्यासाठी आपल्या आईला निराधार ठरवून मोकळी होतात, हेही मी पाहिलंय. जर एखाद्या व्यक्तीला मदत मिळाली नाही, तर ती व्यक्ती आयुष्यातून उठेल असं आम्हांला ज्या कुणाबद्दल वाटेल, त्यालाच फाउंडेशन मदत करेल, असा माझा नेहमी आग्रह असतो.

मी शेखला फोन केला. ''शेख, मला एक सांग, या ऑपरेशनच्या पैशांची काय व्यवस्था केली आहेस तू?''

''मॅडम, मी झुबेदाचे आणि माझ्या बायकोचे सगळे दागिने विकले आहेत. शिवाय बँकेकडूनही थोडं कर्ज घेतलं आहे.''

''शेख, तू आम्हांला का नाही मदतीसाठी विचारलंस?''

''मॅडम, मला निदान एवढं तरी परवडतंय; पण आणखी कित्येक लोक आमच्याहूनही गरीब असतात. माझ्यापेक्षा त्यांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

त्याचं ते उत्तर ऐकून मन हेलावलं. जास्त काही न बोलता मी त्याला दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलची सर्व कागदपत्रं घेऊन येण्यास सांगितलं. मी त्याला पुढे काही बोलायची संधीच दिली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी सगळी कागदपत्रं घेऊन तो ऑफिसात आला. मी त्याला थोडा वेळ थांबायला सांगितलं. सगळी कागदपत्रं नीट तपासून पाहिली आणि नंतर त्याला पन्नास हजारांचा चेक लिहून दिला. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य होतं. ''मॅडम, तुमच्याकडून एवढे पैसे मिळतील असं मला वाटलंच नव्हतं. तुम्ही माझ्या संकटात आपलं माणूस समजून मदतीला धावून आला आहात.''

हे असलं बोलणं मी सहसा फारसं मनावर घेत नाही. जेव्हा कधी मी गरजूंना मदत करते तेव्हा ते मला असं काहीतरी म्हणतातच; पण एकदा त्यांची गरज भागली, संकटातून मुक्तता झाली, की ते बोलण्याचेही कष्ट घेत नाहीत. असेच काही दिवस लोटले. ऑपरेशन व्यवस्थित पार पडल्याचा निरोप शेखनं आमच्या ऑफिसात ठेवला होता. त्यानंतर बरेच दिवस त्याच्याकडून काहीच बातमी कळली नाही. आमचंही त्याच्याकडे काही काम निघालं नव्हतं.

एक दिवस सकाळच्या वेळी मी ऑफिसात पाऊल टाकलं आणि रिसेप्शन काउंटरपाशी शेख थांबलेला मला दिसला. त्याच्याबरोबर चार वर्षांची छोटी मुलगीपण होती. तिच्या अंगात साधाच सुती फ्रॉक होता; पण झालरी, बटणं वगैरे लावून सुरेख शिवलेला होता. तिच्या केसांना भरपूर तेल लावून चापूनचोपून एक पोनीटेल बांधली होती.

शेखचा चेहरा दु:खी दिसत होता.

''काय शेख? कसा आहेस तू? तुला भेटीची वेळ वगैरे दिली होती की काय?''

''सॉरी मॅडम, दोन आठवड्यांपूर्वीच झुबेदा गेली. तुम्ही तिला इतकी मदत केली; पण तिचं नशीबच खोटं. खरंतर तुम्हांला येऊन भेटायची, तुम्हांला सलाम करायची इच्छा होती हो तिची; पण अल्लानं तिला नेलं. मी तिच्या मुलीला घेऊन आलोय. ही तबस्सुम.''

मी तबस्सुमकडे पाहिलं. हे एवढं मोठं ऑफिस... ही सभोवताली एवढी सगळी अनोळखी माणसं... बिचारी बावरली होती.

त्या अनाथ मुलीकडे पाहून मला वाईट वाटलं. आपल्या नशिबात काय वाढून ठेवलंय, याची तिला कल्पनाही नव्हती. तिच्या मामानं तिला सांगितलं, ''बेटी, मॅडमको सलाम करो!'' त्याबरोबर त्या पोरीनं आपले इवलेसे हात उचलून मला सलाम केला.

माझ्या तोंडून शब्द फुटेना.

शेखनं डाव्या हाताच्या बोटांनी डोळे पुसले आणि खिशातून एक पाकीट काढलं. ''मॅडम, हे तुमच्यासाठी आहे. झुबेदानं पाठवलंय. मला यायला उशीर झाला त्याबद्दल सॉरी हं.''



मी तो लिफाफा उघडला. आत तीन हजार रुपये होते. मी गोंधळून शेखकडे पाहिलं. ''मॅडम, तुम्ही पन्नास हजार दिले होते; पण झुबेदाचं ऑपरेशन आणि औषधपाण्यासाठी फक्त सत्तेचाळीस हजारच खर्च आला. आपण आता यातून काही वाचत नाही हे जेव्हा झुबेदाला समजलं, तेव्हा ती म्हणाली, 'आपण उरलेले पैसे मॅडमना परत करू. निदान दुसऱ्या कुणाच्यातरी उपयोगाला येतील. एखादा नशीबवान असेल, त्याचा जीवतरी वाचेल. आता हे पैसे माझ्यावर खर्च करून वाया घालवायला नकोत आपण.' ''

माझ्या नकळत माझ्या डोळ्यांतलं पाणी गालावरून वाहू लागलं. मी झुबेदाला कधीच भेटले नव्हते; पण दुसऱ्यांविषयीची तिच्या मनातली ही कळकळ पाहून मी थक्क झाले.

इतक्या गरिबीत आणि यातना सहन करतानासुद्धा तिनं दुसऱ्या गरजू रुग्णांचा विचार करावा, ही गोष्ट विस्मयचकित करून सोडणारी होती. आपण स्वत: संकटाशी झुंज देत असताना दुसऱ्याचा विचार करणारी माणसं या जगात विरळच ! इथे तुमचं शिक्षण, भाषा, जातपात, धर्म या कशाकशाचा संबंध नसतो. त्यासाठी हृदयात अपार करुणा असावी लागते.

मी तो लिफाफा तसाच शेखला परत देऊन म्हणाले, ''हे पैसे तबस्सुमसाठी आहेत. अल्लाची तिच्यावर मेहेरबानी असू दे. तिला नीट शिकू दे. तुला जर काही मदत लागली, तर प्लीज मला सांग. इतरांविषयी करुणेची भावना बाळगण्याच्या बाबतीत ती आपल्या आईच्याही चार पावलं पुढे जाऊ दे. आपली ही जी भूमी आहे ना, ती श्रीमंत का आहे, माहीत आहे? सोन्याच्या किंवा हिऱ्याच्या खाणी तिच्या पोटात आहेत, म्हणून नव्हे. या झुबेदासारख्या लोकांमुळेच तिचं ऐश्वर्य वाढणार आहे.''

तबस्सुम नुसती तिथे बसली होती. तिला काहीच कळत नव्हतं. माझे शब्द पचनी पडणं शेखलाही कठीण जात होतं.

***





## स्वाध्याय

**प्र. १. खालील वाक्यांमधून पाठातील त्या त्या व्यक्तीचा दिसणारा गुण लिहा.**

(अ) लेखिका झोपडपट्टीतील शाळकरी मुलांमध्ये वह्या वाटत.

(आ) 'माझ्यापेक्षा त्यांनाच याची गोडी जास्त.'

(इ) ''मॅडम, माझ्यापेक्षा गरीब लोकांना तुमच्या मदतीची जास्त गरज आहे.''

(ई) ''मॅडम, तुम्हांला सलाम करण्याची झुबेदाची इच्छा होती.''

(उ) त्या अनाथ मुलीकडे बघून मला वाईट वाटलं.

**प्र. २. स्वभाववैशिष्ट्ये लिहा.**

झुबेदाचा भाऊ–
शेख महंमद याची स्वभाववैशिष्ट्ये

**प्र. ३. शेख महंमदमार्फत झुबेदाने उरलेले पैसे लेखिकेला परत केले, ही घटना तुम्हांला काय शिकवते?**

**प्र. ४. लेखिकेची तबस्सुमविषयीची भावना तुमच्या शब्दांत सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

- **खालील इंग्रजी शब्दांसाठी वापरले जाणारे मराठी भाषेतील शब्द लिहा.**

(१) ऑफिस– (३) हॉस्पिटल– (५) ऑपरेशन–

(२) चेक– (४) ॲडव्हान्स– (६) कॅन्सर–



## विचार करा. सांगा.

- **या पाठातील कोणत्या व्यक्तिरेखा तुम्हांला आवडल्या व त्या का आवडल्या याबद्दल तुमचे मत सांगा.**
- **या पाठातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत सांगा.**

## माहिती मिळवूया.



- **गरजू रुग्णांना मदत करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था आहेत, त्याविषयी आंतरजालावरून माहिती मिळवा.**
- **खालील स्वभाववैशिष्ट्ये असलेल्या तुमच्या परिसरातील व्यक्तींची नावे लिहा.**

(गप्पिष्ट, लाजाळू, रागीट, शांत, हजरजबाबी.)

- **खालील चित्रे पाहून आपल्या भावना व्यक्त करणारी वाक्ये लिहा.**





- **खालील वाक्यांत योग्य केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

(अ) .............. काय सुंदर आहे ताजमहाल !

(आ) .............. किती जोरात ठेच लागली !

(इ) .............. किती उंच आहे ही इमारत !



## वाचा.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून आशयानुसार परिच्छेद तयार करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.**

वर्गातील मुलांना बाई सांगत होत्या, ''आपलं बोलणं, वागणं, आवडीनिवडी, स्वभाव, विचार, सवयी एवढंच नव्हे, तर आपली प्रकृती, आरोग्य, बुद्धिमत्ता या सर्व गोष्टींचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्वावर होत असतो. आपल्याला अवांतर वाचन करायला, मैदानावर खेळायला आवडत असेल, मित्रांची संगत, सोबत भावत असेल, तर या सर्व गोष्टी आपलं व्यक्तिमत्त्व फुलवण्यात साहाय्यक ठरतात. घरातल्या वातावरणाचा, संस्कारांचा परिणाम आपल्या वर्तनावर, स्वभावावर, विचारांवर व आपल्या भाषेवर होत असतो. ज्या घरात मुलांच्या विचारांना, मतांना, प्रश्न विचारण्याला स्वातंत्र्य दिलं जातं, त्या घरातील मुलं स्वतंत्र विचारांची व ठाम व्यक्तिमत्वाची होतात. त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव असते. याउलट काही मुलं फार आक्रमक असतात. 'मी म्हणेन तेच खरं' अशी वागणारी असतात. अशी मुलं इतरांच्या भावनांची कदर करत नाहीत. त्यांच्या वागण्यात बेजबाबदारपणा, बेफिकीर वृत्ती जाणवते. ती कायम ढेपाळलेली, अरसिक, रूक्ष व निरुत्साही, घाबरलेली, चिंतित असतात. अशी मुलं कुणाचे चांगले मित्र बनू शकत नाहीत व मनमोकळेपणानं वावरू शकत नाहीत. तुम्हांला तुमचं व्यक्तिमत्त्व कसं घडवायचं आहे, हे केवळ तुमच्या हातात आहे. स्वत:ला फुलवायचं, अष्टपैलू बनवायचं, की अरसिक, बेजबाबदार बनवायचं; स्वत:चे विचार व्यक्त करायला शिकायचं, की दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी प्यायचं; दिलखुलास जगायचं की रडतखडत, घाबरत घाबरत जगायचं, तुम्हीच ठरवा, स्वत:ला कसं घडवायचं.''

# १३. अनाम वीरा...

• **ऐका. वाचा. म्हणा.**

अनाम वीरा जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !

धगधगतां समराच्या ज्वाला या देशाकाशीं
जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !

मूकपणाने तमी लोपती संध्येच्या रेषा —
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा !

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उधाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव !

जरी न गातिल भाट डफावर तुझें यशोगान !
सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान !

काळोखातुनि विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा !



**कुसुमाग्रज** –विष्णू वामन शिरवाडकर (१९१२-१९९९) : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'समिधा', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'मारवा', किनारा' इत्यादी काव्यसंग्रह; 'वैजयंती', 'राजमुकुट', 'कौंतेय', 'नटसम्राट', 'वीज म्हणाली धरतीला', 'विदूषक' इत्यादी नाटके प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने देशाच्या सीमेवर शत्रूशी लढणाऱ्या, वेळप्रसंगी प्राणार्पण करून देशाचे रक्षण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात सैनिकांना अभिवादन केले आहे.

**प्र. १. कवींनी असे का म्हटले असावे, असे तुम्हांला वाटते?**

(अ) स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली न वात !

(आ) जळावयास्तव संसारातुन उठोनिया जाशी !

(इ) सफल जाहले तुझेच हे रे तुझेच बलिदान !

**प्र. २. खालील आकृती पूर्ण करा.**

**देशासाठी प्राणार्पण केलेला सैनिक 'अनाम' राहिला आहे, असे कवींना वाटते, त्याची कारणे लिहा.**

**प्र. ३. खालील जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) धगधगतां समराच्या ज्वाला | (अ) शांतपणे मरण स्वीकारणे |
| (२) मरणामध्ये विलीन | (आ) निर्भयपणे, मनात कोणतीही आसक्ती न ठेवता |
| (३) ना भय ना आशा | (इ) भावना व्यक्त न करणे |
| (४) नच उधाणले भाव | (ई) महाभयंकर युद्ध |

**प्र. ४. खालील शब्दांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) अनाम वीरा–

(२) जीवनान्त–

(३) संध्येच्या रेषा–

(४) मृत्युंजय वीर–



## लिहिते होऊया.

- **तुम्ही कोण होणार, ते ठरवा. त्यासंबंधित खाली काही प्रश्न दिले आहेत, त्यांवर विचार करा. त्या प्रश्नांची उत्तरे तयार करून त्यांचे सलग लेखन करा.**

**मी.......... होणार!**

- मी...... व्हायचे का ठरवले आहे?
- मी...... होण्याबाबत माझ्या कुटुंबातील सदस्यांची काय मते आहेत?
- ......होण्यासाठी मी काय प्रयत्न करणार आहे?
- मी ...... बनल्यानंतर भविष्यात काय काय करणार आहे?

## म्हणी ओळखूया.

- **खालील वाक्ये वाचा. वाक्याच्या अर्थानुसार योग्य म्हण लिहा.**

(१) गणपतरावांकडे जोपर्यंत प्रतिष्ठेचे पद होते, धनसंपत्ती होती, तोपर्यंत त्यांच्याकडे येणाऱ्या पैपाहुण्यांचा राबता होता. जसे ते सेवानिवृत्त झाले, तसा माणसांचा वावर कमी झाला आहे, म्हणतात ना.......

(२) रेहानाची कंपासपेटी हरवली, तिने ती घरभर शोधली. शेजारीपाजारीही जाऊन पाहिले; पण कंपासपेटी कोठेच नव्हती. शेवटी ती रेहानाच्याच दप्तरातच सापडली, म्हणतात ना.......

(३) पावसात भिजणाऱ्या कावळ्याने ठरवले, पावसाळा संपला, की घर बांधायचे. पावसाळा संपला, पण इकडे तिकडे फिरण्यात तो विसरून गेला. पुन्हा पावसाळा आला. पावसात भिजताना त्याला आठवले, की आपण घर बांधायचे ठरवले होते, म्हणतात ना.......

(४) फर्नांडिस खूप बुद्धिमान व प्रसंगावधानी म्हणून प्रख्यात होते. त्यांचा मुलगा फिलिप जसजसा मोठा होऊ लागला, तसतसे त्याच्यात हे गुण दिसू लागले. गावातले सगळे म्हणू लागले,.......



## वाचा व लिहा.

- **खालील उतारा वाचा. विरामचिन्हांचा योग्य वापर करून उतारा पुन्हा लिहा.**

मुलांनो शाळेत तुम्हांला अनेक मित्र असतात तुमची काळजी घेणारे तुमचे आरोग्य जपणारे असे अनेक मित्र तुमच्या सभोवती आहेत कोण बरे आहेत हे मित्र असा प्रश्न तुम्हांला निश्चितच पडेल आपल्याला फळे फुले सावली देणारे वृक्ष आपल्याला पिण्यासाठी पाणी देणाऱ्या नद्या श्वसनासाठी ऑक्सिजन देणारी हवा आपण ज्यावर निवांतपणे राहतो अशी जमीन अर्थातच आपल्या सभोवतालचा निसर्ग हाच आपला खरा मित्र आहे

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय?**

संपूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला **वाक्य** म्हणतात. वाक्याचे दोन भाग असतात. ज्याच्याविषयी सांगायचे ते **उद्देश्य** आणि जे सांगायचे ते म्हणजे **विधेय**.

'त्याचा मोठा मुलगा दररोज आगगाडीने मुंबईला जातो.'

या वाक्यात मुलाविषयी सांगायचे आहे, म्हणून 'मुलगा' हे उद्देश्य, तर 'जातो' हे विधेय आहे. या वाक्यातील 'त्याचा', 'मोठा' हे शब्द उद्देश्याचा विस्तार आहेत, तर 'दररोज', 'आगगाडीने' हे शब्द विधेयाचा विस्तार आहेत.

काही छोटी वाक्ये तयार करून त्यांतील उद्देश्य, विधेय ओळखा आणि त्यांचा विस्तार करता येतो का ते पाहा.

**हे करून पाहूया.**

प्रत्येकाच्या अंगी काही कलाकौशल्ये असतात. त्या कलाकौशल्यांतून नवनिर्मिती होत असते. या कलाकौशल्यांतून आपल्याला आपले विचार व्यक्त करता येतात. असे विचार, कल्पना आपणांस चित्रांच्या साहाय्यानेही प्रकट करता येतात. चला पाहूया, ही अनोखी चित्रकला!





प्रत्येकाला चित्र काढायला आवडतं. जे काढावंसं वाटतं, ते रेखाटणं म्हणजे चित्र. चित्र दुसऱ्याला दाखवण्यासाठी असतं, असं मुळीच नाही. चित्र काढायचं ते आपल्या आनंदासाठी. अशी चित्रांची मौज अनुभवायची असेल, तर एक छानसा मार्ग म्हणजे भिंतीवरची चित्रं.

'कागदावरचं चित्र' हातांची बोटं आणि मनगट वापरून काढावं लागतं. कागदावरील चित्राचा आकार लहान असतो, त्यामुळे आकारबद्ध रेखाटन येणं हे एक कौशल्य आहे. ते सर्वांनाच प्राप्त होतं असं नाही; पण भिंतीवरच्या चित्राचं तसं नाही. भिंतीवरच्या चित्रासाठी खांद्यापासून हात हलवावा लागतो. त्यासाठी चित्र रेखाटण्याचं कौशल्य यायलाच पाहिजे, असं काही नाही, फक्त त्यासाठी चित्र रेखाटणाऱ्या गटाचं पूर्ण नियोजन पाहिजे.

भिंतीवरचं चित्र कसं काढायचं? अगदी सोपं आहे. एखादं सोपं चित्र निवडायचं. त्यात रंग कोणते भरायचे, त्या रंगांचं मिश्रण कसं तयार करायचं ते निश्चित करायचं. उदा., आपण भिंतीवर झाडं, पानं, फुलं, डोंगर, पक्षी, सूर्य असं निसर्गचित्र काढायचं ठरवलं, तर आधी पार्श्वभूमी रंगवून घ्यायची. नंतर संपूर्ण भिंतीला फिकट रंग द्यायचा. झाडाचा आकार काढून घ्यायचा. प्रत्येक चित्राची जागा ठरवून घ्यायची. मग त्या रंगवलेल्या भिंतीवर ठरवलेल्या चित्राच्या बाह्यरेषा काढायच्या. त्यात रंग भरायचे. रंगकाम करताना गडद, विरोधी रंग वापरायचे म्हणजे चित्र आकर्षक दिसतं. सगळ्यांत शेवटी चित्रातील बारकावे रंगवायचे.

**लिहिते होऊया.**

- **तुम्हांला काय करायला आवडते ते सांगा. त्यासंबंधी खाली काही प्रश्न दिले आहेत. त्यांवर विचार करा व लिहा.**

  (अ) तुमचा आवडता छंद कोणता? त्यासाठी तुम्ही दिवसभरात किती वेळ देता?

  (आ) तुमच्या आवडत्या छंदाबाबत तुमच्या घरातील व्यक्ती तुम्हांला कोणती मदत करतात?

# १४. कवितेची ओळख

**शारदा दराडे** (१९७९) : विविध वृत्तपत्रे व मासिकांतून लेखन. 'गाडग्यातील अमृतवाणी' या काव्यसंग्रहात काही कवितांचे लेखन. सदर पाठ्यपुस्तकासाठी महाराष्ट्रातील शिक्षकांकडून मागवण्यात आलेल्या एकांकिकांतून प्रस्तुत एकांकिकेची निवड करण्यात आली आहे. लेखिका जि. प. प्रा. शाळा, पिंपळगाव चिलमखा केंद्र मेहुनाराजा, ता. देऊळगांव राजा, जि. बुलडाणा येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

सुधीरला शाळेत 'काव्यप्रतिभा' या विषयावर आधारित एक प्रकल्प शिक्षिका देतात. सुधीरचा हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्याच्या घरातील सर्वजण कवितेतून संभाषण करतात. लेखिकेने या काव्यरूपी संभाषणातील गंमतजंमत प्रस्तुत एकांकिकेतून मांडली आहे.

### तुमचा अनुभव सांगा.

- प्रकल्प म्हणजे काय?
- या पूर्वी शाळेत दिलेल्या प्रकल्पांपैकी तुम्हांला कोणता प्रकल्प सर्वांत जास्त करायला आवडला? का ते लिहा.
- प्रकल्प पूर्ण करताना तुम्ही अनुभवलेला अविस्मरणीय अनुभव थोडक्यात सांगा.

(शाळा सुटते. सुधीर घरी येतो; पण तो कुणाशीच बोलत नाही. विचारांत गुंतलेला असतो.)

**आजोबा :** अरे! सुधीर केव्हा आलास? आजचा प्रवेश असा शांत कसा?

**सुधीर :** आजोबा, काव्यप्रतिभा वाढवा, म्हणजे काय हो?

**आजोबा :** कोणी सांगितलं रे तुला हे?

**सुधीर :** आज शाळेत बाईंनी आम्हांला 'काव्य प्रतिभा वाढवण्यासाठी तुम्ही केलेले प्रयत्न' हा प्रकल्प दिलाय. मला तर ताणच आलाय.

**आजी :** अरे, फार सोपं आहे ते! कविता करण्याची, समजून घेण्याची आपली आकलनशक्ती वाढवणं, म्हणजे काव्यप्रतिभा वाढवणं. त्यासाठी तू प्रयत्न करायचे आहेस, हेच सांगितलंय बाईंनी.

**सुधीर :** पण मी हे कसं करू?

**आजोबा :** अरे, काळजी नको करूस. यासाठी आपण सगळे मिळून प्रयत्न करू, म्हणजे तुझी काव्यप्रतिभाही वाढेल आणि कविता करणं, कवितेचं आकलन होणं म्हणजे काय हेही तुला समजेल.

**आजी :** तुम्ही हो काय प्रयत्न करणार?

**आजोबा :** आपण आजपासून कवितेत संभाषण करायचं. ते तो कागदावर उतरून घेईल, म्हणजे त्याला कविताही समजेल अन् त्याचा प्रकल्पही पूर्ण होईल.

**आई :** सुधीर हातपाय धू अन् दूध घे.

**सुधीर :** आजी मी कागद अन् वही घेतो. आताच आपण सुरुवात करू.

(आजी दिवा लावते व मोठ्याने 'शुभंकरोती' म्हणते.)

**आजी :** घरामध्ये लावते सांजवात,
भाजी करते आता कांद्याची पात.



**आजोबा :** आता म्हाताऱ्याचा वाढतो वात,
नको भाजी करू तू कांद्याची पात.

**आजी :** कधीतरी कशाला म्हणतील का हो ?
मी सांगितलेल्या भाजीला नेहमीच देतात
खो.

**सुधीर :** ए माझी सुपर आजी,
तुला आवडेल ती कर भाजी.

**आजोबा :** तू बनव भाजी छान छान चवळी,
ए सुधीर, आण रे इकडे दातांची कवळी !

**आजी :** बरं बाई, तुमची इच्छा हाच ध्यास,
भाजी बनवते चवळीची खास.

(सगळेजण खो-खो हसतात.) (बाबांची रात्रपाळी असते.)

**बाबा :** अगं आई, अगं आई,
पटकन खायला दे ना गं काही.
मला ऑफिसला जाण्याची घाई,
नाहीतर बॉस करू देणार नाही सही.

**सुधीर :** कसली घाई, कसली सही,
आजीनं दिलं चपाती दही.

**आई :** काय बाई कवितेची कमाल,
बोलतात नि हसतात तोंडावर
धरून रुमाल.

**आजी :** आता सोड रे घराचा पाश,
ऑफिसात जा आता सावकाश.

(बाबा ऑफिसला जातात.) (आजोबा फिरायला निघतात.)

**आजोबा :** मला द्या काठी नि चप्पल,
कोटाचं जोडून द्या तुटलेलं बक्कल.

**आजी :** तुम्हांला तर समजतच नाही,
तोडून ठेवता काही ना काही.

**आई :** आई, तुम्ही बाबांवर चिडू नका,
रागाचा तुम्ही सोडा हेका.

**आजी :** म्हणे रागाचा सोडा हेका,
कामाचा का मी घेतलाय ठेका ?
शिवणकाम शिकलीस, पण
बक्कल लावायला चुकलीस.

**आई :** चिडता का हो माझ्यावर ?
माया करावी सर्वांवर.

**सुधीर :** तुम्ही आता नका भांडू,
भांडण ऐकून येतंय रडू.
लहान तोंडी मोठा घास,
करपलेल्या भाजीचा सुटलाय वास.

(सुधीर रुसतो. तेवढ्यात ताई येते. तिला हे वातावरण नवीन असते. विषय समजताच खो-खो हसते; पण आनंदित होते व सहभागी होते.)

**ताई :** बरं का आजोबा अन् आजी,
दूर करू सुधीरची नाराजी.
कवितेत मारेल तो बाजी.
आई, आहे का घरात पिठाची सोजी ?

**आई :** सोजी तुला हवी तरी कशाला ?
लाडू खातेस अन् बशी ठेवतेस उशाला.

**सुधीर :** चला सगळे जेवण करू,
चवळीच्या भाजीवर ताव मारू.

(सगळेजण एकत्रित मिळून जेवण करतात.)

**आजी :** रात्र झाली आता झोपा,
उघडू सकाळी कवितेचा खोपा.

(सर्वजण झोपतात.) (सकाळी उठल्यावर सुधीरला सर्वजण कामात दिसतात. सुधीर आईकडे जातो.)

**आई :** सूर्य उगवला, चिमण्या उडाल्या,
सगळ्यांच्या अंघोळी झाल्या.
हवा सुटली आहे गार गार,
अंघोळीचे पाणी केले गरम फार.

**ताई :** (सुधीरला) अंघोळ कर पटकन,
नाष्टा कर चटकन.
झालाय उशीर तुला,
झटपट आवर मुला.

**आजी :** आजोबांना द्या स्वेटर, मफलर,
आणा कानटोपी,
थंडीपासून बचावाची हीच युक्ती सोपी.

(सुधीर अंघोळ करून आवरून येतो.)

**ताई :** सुधीर तू लिहून घे नीट,
यमक जुळायला हवे फिट.
शब्दांचे यमक हवे नीट,
तरच बनते कविता धीट.

(बाबा रात्रपाळीहून परत येतात. कालचा विषय त्यांच्या लक्षात येतो. ते गालातल्या गालात हसतात. खुर्चीवर रेलून बसतात.)

**बाबा** : कामाचा आलाय आता कंटाळा,
दया थोडे पाणी टाकून वाळा.
(आई कणीक मळत असते.)
कणीक तुम्ही नंतर मळा,
अगोदर शिऱ्यासाठी रवा चाळा.

**आई** : तोंड धुवा, अंघोळ करा, खा गरम शिरा,
मग सुधीरच्या डब्यासाठी बटाटे तुम्ही चिरा.

**आजी** : सुधीर आवर दप्तर ठीक,
नाहीतर कचऱ्याचे येईल त्यात पीक,
टापटीपपणा दररोज शीक.

**सुधीर** : आजी, आई खूप छान,
मला नाही कशाचीच वाण.
तुमच्यावाचून हलेना पान.

(आजोबा होकार दर्शवतात. तेवढ्यात बाबा काही पुस्तके सुधीरच्या हातात देतात.)


**बाबा** : बस झाला कवितांचा पाऊस,
अशाने थोडीच पूर्ण होणार हौस !
(पुस्तके देत)
हा घे थोरांच्या कवितांचा मळा,
वाचून लागेल तुला कवितांचा लळा.

(सुधीर कवितांची पुस्तके वाचतो. त्यात तल्लीन होऊन जातो. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान घरातील सर्वांना दिसते.)

**सुधीर** : बाबा, आई, ताई, आजोबा अन् आजी
असं झालंय वाचू किती ?
कविता अंगणात उतरल्या अति,
त्या मी वेचू कशा अन् किती ?
शांताबाईंची बाग अन् सुर्वेंची गिरणी,
गदिमांचे घर अन् बालकवींची फुलराणी.
चेतवले भावनांचे मोहोळ तुम्ही मनी.

(सर्वजण टाळ्या वाजवतात व सुधीरचे अभिनंदन करतात. तो प्रसन्नतेने प्रकल्प लिहून शाळेत बाईंकडे सादर करतो.)

***



## स्वाध्याय



**प्र. १. खालील चौकटी पूर्ण करा.**

(अ) आजीने काव्यप्रतिभा वाढवण्याचा सांगितलेला अर्थ.

(आ) सुधीरची काव्यप्रतिभा वाढवण्यासाठी कुटुंबाने केलेली मदत.

(इ) बाबांनी सुधीरला कवितांची पुस्तके आणून देण्याचे कारण.

(ई) कुटुंबातील सदस्यांनी सुधीरचे अभिनंदन करण्याचे कारण.

**प्र. २. पाठातील 'कवितेतून बोलण्याची गंमत' तुमच्या शब्दांत मांडा.**

**प्र. ३. या पाठातील आशयाच्या आधारे तुमच्या शब्दांत एक छानशी कथा तयार करून लिहा.**

**प्र. ४. 'आम्ही चित्र काढतो' या विषयावर तुम्ही व तुमचे वर्गमित्र यांच्यातील संवाद कवितेच्या माध्यमातून सादर करा.**

**प्र. ५. पाठातील कोणता काव्यसंवाद तुम्हांला सर्वाधिक आवडला, ते सकारण सांगा.**

प्र. ६. खालील आकृती पूर्ण करा.

पाठात आलेल्या साहित्यिकांची नावे



## चर्चा करूया.


- तुम्हांला कविता करायला आवडत असल्यास तुम्ही त्यासाठी कोणते प्रयत्न कराल?
- तुम्ही 'काव्यवाचना'चा कार्यक्रम ऐकला असल्यास तो तुम्हांला कसा वाटला, याबाबत मित्रांशी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

- खालील वाक्प्रचारांचा अर्थ चौकटीतून शोधून लिहा.

(अ) खो देणे.
(आ) पाश सोडणे.
(इ) हेका धरणे.
(ई) भावनांचे मोहोळ चेतवणे.

नकार देणे.
बंधनातून मुक्त होणे. हट्ट करणे.
भावना जागृत करणे.



## खेळ खेळूया.

(अ) खालील कंसात काही म्हणी दिलेल्या आहेत. दिलेल्या वाक्यांशी संबंधित म्हण ओळखा व लिहा.

(अति तिथे माती, आगीतून उठून फुफाट्यात पडणे, पळसाला पाने तीनच, नावडतीचे मीठ अळणी, थेंबेथेंबे तळे साचे, कामापुरता मामा, गर्वाचे घर खाली)

(अ) फुशारकी मारणाऱ्याचा पराजय होतो.

(आ) एखाद्याकडून काम करून घेताना गोड बोलायचे आणि काम झाले, की त्याला सोडून द्यायचे.

(इ) सर्वत्र परिस्थिती समान असणे.

(ई) थोडे थोडे जमवून मोठा संचय करणे.

(उ) एका संकटातून बचावणे व दुसऱ्या संकटात सापडणे.

(ऊ) कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईट असतो.

(ए) न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती पसंत पडत नाही.

(आ) खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यामध्ये एकच शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला आहे. खालील वाक्ये वाचा त्यातील ठळकपणे दाखवलेल्या शब्दांचे अर्थ समजून घ्या. तुम्हीही याप्रमाणे वाक्ये तयार करण्याचा प्रयत्न करा.

(१) आमचे मराठीचे **सर** इतके छान शिकवायचे, की अन्य शिक्षकांना त्यांची **सर** येत नसे.

(२) सकाळचा चहा मला **कपात** काठोकाठ भरलेला लागतो. त्यात **कपात** केलेली मला चालत नाही.

(३) एकदा एका शिक्षकांचा मला दूरध्वनी आला.
दूरध्वनीवर ते मला म्हणाले, ''सर, आपण आमच्या शाळेला **भेट** द्या.'' मी त्यांना विचारले, ''काय **भेट** देऊ?'' ते शिक्षक म्हणाले, ''ते शाळेला **भेट** दिल्यानंतर ठरवा.''



## विचार करा. सांगा.

- तुम्ही दरवर्षी अनेक प्रकल्प करत असाल. यावर्षी तुम्ही पूर्ण केलेला प्रकल्प कोणता व तो कसा पूर्ण केला, त्या सर्व कृती क्रमवार लिहून त्यांचा ओघतक्ता बनवा.

## आपण समजून घेऊया.

- वाक्य म्हणजे काय, हे आपण अभ्यासले आहे. वाक्यांचे विविध प्रकार आहेत. त्यातील काही वाक्य प्रकारांची माहिती आपण करून घेणार आहोत.

### (१) विधानार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) माझे घर दवाखान्याजवळ आहे.

(आ) तो रोज व्यायाम करत नाही.

या प्रकारच्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते.

### (२) प्रश्नार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) तुला लाडू आवडतो का?

(आ) तुम्ही सकाळी कधी उठता?

या प्रकारच्या वाक्यांत प्रश्न विचारलेला असतो.

### (३) उद्गारार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) अरेरे ! फार वाईट झाले.

(आ) शाबास ! चांगले काम केलेस.

या प्रकारच्या वाक्यांत भावनेचा उद्गार काढलेला असतो.

### (४) आज्ञार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) मुलांनो, रांगेत चला.

(आ) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

या प्रकारच्या वाक्यांत आज्ञा किंवा आदेश असतो.

- वर दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.


**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वाक्यांचे प्रकार समजावून सांगावेत. विविध उदाहरणे देऊन वाक्य प्रकार ओळखण्यास सांगावे. अधिकाधिक सराव करून घ्यावा.


## कविता करूया.

● पाठामधील सुधीरचा प्रकल्प तुम्ही पूर्ण झालेला पाहिला. सगळ्यांच्या मदतीने त्याने कविता तयार करण्याचा प्रयत्न केला. शेवट समान असणारे शब्द त्याने शोधले. फक्त शेवट समान असणारे शब्द वापरणे म्हणजे कविता करणे नव्हे. त्यासाठी ज्या विषयावर कविता करायची तो विषय समजून घेऊन त्या विषयाशी संबंधित गोष्टींचा विचार करता यायला हवा. त्यासाठी खाली दिलेले संकल्पना चित्र अभ्यासा.

आपल्याला छंद या विषयावर कविता करायची असेल, तर त्या छंदाशी संबंधित काही गोष्टी माहीत असणे आवश्यक आहे.
आकृती क्र.१ चे निरीक्षण करा.

आता त्या छंदाशी संबंधित एक घटक निवडून त्या अनुषंगाने इतर शब्दांचा शोध घ्या.
आकृती क्र.२ चे निरीक्षण करा.





अभिनय करणे माझा छंद,
जोपासतात सारे आप्तवृंद.

यशस्वी होण्यास करतो निरीक्षण,
नेहमीच घेतो पारंगतांचे मार्गदर्शन.

आकृती क्र.२ मधील पुरस्कार हा शब्द घेतला, तर त्या अनुषंगाने इतर शब्दांचा शोध घ्या.
आकृती क्र.३ चे निरीक्षण करा.




आस आहे सदैव पुरस्काराची,
टाळ्या, कौतुक आणि सत्काराची.

वरील शब्दांना गुंफून आपल्याला छोटी छोटी अर्थपूर्ण वाक्ये तयार करता येतात. त्याचप्रमाणे शेवटी समान शब्द आल्यामुळे गेयता असलेली वाक्येही तयार होतात.

वरील शब्दांचा वापर करून तुम्हांला अशा काव्यात्मक ओळी तयार करता येतात का ते पाहा. प्रयत्न करा व छानशी कविता तयार करा.

# १५. असे जगावे

• ऐका. वाचा. म्हणा.

असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!


पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना
संकटासही ठणकावून सांगावे, ये आता बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना
स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर!



**गुरू ठाकूर** (१९६८) : प्रसिद्ध कवी, गीतकार, कथाकार. 'नटरंग', 'अगं बाई, अरेच्चा', 'घर दोघांचे', 'टाइमपास' यांसारख्या अनेक प्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपटांसाठी गीतलेखन.

ज्यांची इच्छाशक्ती प्रबळ असते त्यांना संकटांतही मार्ग सापडतात. संकटांचा हसून सामना करावा, तसेच आयुष्यामध्ये काहीतरी चांगले कार्य करून जावे, असा संदेश कवीने प्रस्तुत कवितेतून दिला आहे.



**प्र. १. जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कवेत अंबर घेताना | (अ) जगाला गहिवर यावा. |
| (२) काळीज काढून देताना | (आ) अनेक मार्ग मिळतात. |
| (३) शेवटचा निरोप देताना | (इ) ओठांवर हसू असावे. |
| (४) इच्छा दांडगी असेल तर | (ई) पाय जमिनीवर असावेत. |

**प्र. २. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

करून जावे असेही काही, दुनियेतून या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवट देताना

**प्र. ३. संकटात कसे वागावे हे कवितेच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ४. 'संकटांना न घाबरता तोंड द्यावे', याविषयी तुमच्या वाचनात आलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन करा.**

**प्र. ५. कवीने या कवितेतून दिलेला संदेश तुमच्या शब्दांत लिहा.**



## चर्चा करूया.

- आयुष्य जगताना स्वप्ने पाहावी.
- इच्छा असेल तर मार्ग मिळतो.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्प्रचार व अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) नजर रोखणे. | (अ) वास्तवाचे भान ठेवणे. |
| (२) पाय जमिनीवर असणे. | (आ) प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे. |
| (३) गगन ठेंगणे होणे. | (इ) निर्भयपणे पाहणे. |
| (४) कवेत अंबर घेणे. | (ई) खूप आनंद होणे. |
| (५) काळीज काढून देणे. | (उ) अशक्य गोष्ट शक्य करणे. |

**(आ) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा.**

(१) अत्तर (२) ताऱ्यांची (३) जाताना

**(इ) खालील अधोरेखित शब्दांसाठी समानार्थी शब्द वापरून ओळी पुन्हा लिहा.**

(१) पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना.

(२) असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून अत्तर.

(३) असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर.

(४) नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर.

(५) स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर.



## वाचा.

सर वर्गात आले. त्यांनी निबंधलेखन स्पर्धेचा निकाल सांगितला व म्हणाले, ''मला अनिताचा व सुरेशचा निबंध खूप आवडला. कोणाचा निबंध निवडावा हे मला समजत नव्हते. दोघांच्याही निबंधांतला आशय मनाला विचार करायला लावणारा आणि स्वत:च्या अंतरंगात डोकवायला भाग पाडणारा आहे; पण तरीही मी सुरेशच्या निबंधाची निवड का केली असावी, तर सुरेशचे सुवाच्य, वळणदार अक्षर व शुद्ध, बिनचूक लेखन.''

प्रत्येकाच्या अक्षराचे वळण वेगवेगळे असते. काहींचे अक्षर टपोरे, वाटोळे व बाकदार असते. अक्षरांत एकसारखेपणा असतो. दोन अक्षरांतले, दोन शब्दांतले अंतर सारखे असते. अक्षरांचा आकार योग्य असतो. लेखनात स्वच्छता, टापटीप जाणवते. अशा लेखनाला, अक्षरांना एक सौंदर्य प्राप्त झालेले असते, तर काहींचे अक्षर खूप गिचमीड असते. ते वाचनीय नसते. हत्तीचा पाय मुंगीला लावल्यावर जसे दिसेल तसे ते अक्षर असते. असे अक्षर कुणाला वाचावेसे वाटेल का? ते अशुद्ध लेखन वाचताना कंटाळा येतो आणि डोळ्यांवर ताण येऊन उगाचच दमणूक होते.

आपले लेखन जेवढे सुवाच्य, सुंदर, वळणदार पाहिजे, तेवढेच शुद्ध आणि बिनचूकही असावे. अशा सुंदर अक्षराची देणगी मिळवण्यासाठी अपार मेहनत घ्यावी लागते. सुंदर अक्षर काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावे लागतात. न थकता, न कंटाळता रोजच्या सरावातून अक्षरांना योग्य वळण मिळते. अक्षरांना बाकदारपणा येतो आणि मग हळूहळू मोत्यांसारखी सुरेख अक्षरे कागदावर उमटू लागतात. अक्षर बिघडू नये, यासाठी कधीही अक्षरांकडे डोळेझाक करून चालत नाही. सुंदर अक्षर हा सुरेख दागिना आहे. 'हा दागिना मी कायमस्वरूपी माझ्याजवळ ठेवीन,' असा वसा प्रत्येकानेच घेतला पाहिजे.



## सारे हसूया.



**रमा** : काय गं, गहू कसा आणलास?

**उमा** : पिशवीतून आणला.


**रमा** : तसं नाही गं, म्हणजे कोणत्या भावानं आणला ?

**उमा** : माझ्या चुलतभावानं आणला.



मुलांनो, तुम्ही दररोज मोबाईल व संगणक हाताळत आहात. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विविध सोईसुविधा आपल्याला या माध्यमांद्वारे पुरवल्या जातात.

या सुविधा म्हणजेच वेगवेगळ्या प्रकारची सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन्स असतात. त्याला तुम्ही ॲप्स असेही म्हणता.




तुम्हांला येथे काही ॲप्सची सांकेतिक चिन्हे दिलेली आहेत. या चिन्हांना काय म्हणतात, ही ॲप्स कशासाठी वापरली जातात, याची माहिती घरातील मोठ्या व्यक्तींकडून जाणून घ्या व लिहा.

### • *विचार करा. सांगा.*

- तुम्हांला मोबाईल/संगणकावरील कोणती ॲप्स वापरायला आवडतात?
- अभ्यास करण्यासाठी अशा एखाद्या ॲपचा वापर करणे तुम्हांला आवडते का? सकारण सांगा.
- या विविध ॲप्सचा उपयोग तुम्हांला आवश्यक वाटतो का? असल्यास/नसल्यास का ते सांगा.
- मोबाईल/संगणकावरील ॲप्स वापरताना तुम्ही कोणती दक्षता घ्याल ?

- तुम्हांला अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टी कठीण वाटतात? त्यासाठी कोणती ॲप्स तयार व्हावीत असे तुम्हांला वाटते?

# १६. कोळीण



**मारुती चितमपल्ली** (१९३२) : पक्षी-वन्य जीवनविषयक ग्रंथकार, प्रसिद्ध लेखक. अनेक पुरस्कारांनी सन्मानित. 'पक्षी जाय दिगंतरा', 'जंगलाचं देणं', 'रानवाटा', 'शब्दांचं धन', 'रातवा', 'मृगपक्षिशास्त्र', 'घरट्यापलीकडे', 'पाखरमाया', 'निसर्गवाचन', 'सुवर्णगरुड', 'आपल्या भारतातील साप', 'पक्षिकोश', 'आनंददायी बगळे' इत्यादी पुस्तके प्रकाशित.

C4EBYS

कोळीण आपले सावज कसे पकडते, आपल्या घराचे दार बंद होऊन आपण असुरक्षित होऊ नये, यासाठी ती कोणती काळजी घेते याचे चित्तवेधक वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

हॉलीवूडपासून दूर अशा डोंगराकडे मी गाडी वळवली. पायथ्याला गाडी ठेवून मी डोंगर चढून वर गेलो. वाकून जमिनीचं लक्षपूर्वक निरीक्षण करू लागलो. मध्येच एक गुडघा टेकून मी सुकलेलं गवत बाजूला सारायचो. कोणी मला अशा अवस्थेत पाहिलं, तर त्याला वाटेल, की माझं काहीतरी हरवलंय आणि ते मी शोधत आहे.

मी ज्याचा शोध घेत होतो ते मला डोंगरमाथ्यावर जवळ जवळ एका तासानं दिसलं. एखादं निकेलचं नाणं उडवावं अन् ते अर्धं मातीत झाकलं जावं तसं ते दिसत होतं. मोठ्या अचूकतेनं बांधलेलं ते कोळ्याचं झापड असलेलं घरटं होतं. आजूबाजूचं गवत आणि हिरव्या शेवाळावर ते रंगगोपनामुळे दिसत नव्हतं.

मी खाली वाकून माझ्या चाकूच्या पात्याचं टोक दाराच्या बाजूला लावलं आणि दार उघडलं. त्या भेगेतून आत पाहिलं. दार उघडलं जाऊ नये, म्हणून कोळिणीनं ते घट्ट धरून ठेवलं होतं. मी कोळीण म्हटलं आहे, कारण नर कोळी आकारानं लहान असतात. त्यांच्या वास्तव्याचा सुगावा लागत नाही. हे घरटं कोळिणीचं होतं. जमिनीत जवळ जवळ एक फूट खोलीवर, न दिसणारं ते घरटं, त्याचं दार आणि अस्तर सारं काही रेशमाच्या धाग्यानं घट्ट असं विणलं होतं.

मला आश्चर्य वाटलं, की कोळिणीनं चाकूचं टोक इतक्या विलक्षण ताकदीनं ओढावं. पातं चांगलंच वाकलेलं दिसलं. मी दार सोडून दिलं. अंधार पडल्यावर मला परत यायचं होतं. रात्रीच्या वेळी कोळीण ज्या वेळी कार्यरत असते, त्या वेळी तिचं छायाचित्र घ्यायचं होतं. चाकूचं पातं बाजूला काढताक्षणीच दार घट्ट बंद झालं. घाबरलेली कोळीण ते दार आतून ओढत होती. बाटलीचं बूच बसावं तसं दार पक्कं झाकलं गेलं. ते इतकं पक्कं बसलं, की त्याच्यात फटदेखील दिसत नव्हती.

माझी साधनसामग्री घेऊन तिथं सायंकाळी पोहचलो. चंद्राच्या मंद प्रकाशानं उजळलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर डोंगर काळे दिसत होते. चंद्राच्या प्रकाशानं, तसंच शहरातील विजेच्या दिव्यांमुळे राशीचे ढग प्रकाशमान झाले होते. पावसाची लक्षणं दिसत होती. ज्या घरट्याजवळ खूण केली होती, तिथं जवळच एका दगडावर मी बसलो आणि अंधूक प्रकाशात जमिनीचं निरीक्षण करू लागलो. झाकलेल्या दरवाजाची कमान मला दिसली.

वसंतऋतूतील तो शेवटचा काळ, परंतु सायंकाळी हवा गार होती. गारठा निर्माण करत ओलसर वारं खोऱ्याकडे वाहत होतं; परंतु माझ्या पायानजीकच्या त्या लहान जगात मी असा काही गुंग झालो होतो, की बाहेरच्या जगाचा मला विसर पडला.

मी स्तब्ध बसलो. माझं सारं लक्ष कोळिणीच्या घराच्या बंद दाराकडे होतं. कसलीही हालचाल नव्हती. कसलंही चैतन्य नव्हतं. एखाद्या दगडासारखा बसून मी शांतपणे तासभर निरीक्षण करत होतो. जरी दार बंद असलं, तरी आतल्या कोळिणीला माझ्या अस्तित्वाची जाणीव होती. मला वाटायचं, की थोड्याच कालावधीत तिला माझा सराव होईल; परंतु दारापलीकडच्या छिद्रातून जिवंतपणाची कसलीच लक्षणं दिसत नव्हती.

थंडगार वाऱ्यानं गवताची पाती डोलायची. पुन: शांत. पावसाचा कुठेतरी शिडकावा झाला, त्यामुळे जमीन थोडी ओलसर झाली. पुन: शांत. त्या थंडगार दगडावर बसून मी चांगलाच गारठलो.

मला वाटलं, की आपण दाराची हालचाल पाहिली. मी एकाग्रचित्त होऊन त्याकडे पाहत होतो. पुन: ते हाललं नाही. मला उगीच तसा त्या अंधारात भास झाला असावा. ते चोरदार किंचित उघडलं. काही क्षण किलकिलत्या दाराजवळ कोळीण वाट पाहत होती. मला ते माहीत होतं.

तिथं गूढ होतं. त्या गूढतेचा तणाव आजूबाजूच्या वातावरणावर आला होता. कोळीण दाराजवळ दबा धरून प्रतीक्षा करत होती. सापळा तयार होता. सावज जवळ येण्याची ती वाट पाहत होती. ते सारं चमत्कारिक होतं. कीटकाच्या लहान जगातील ती अनिश्चिती आणि धोका होता. कोळीण दबा धरून लहान जीवाच्या पावलाची सावट ऐकत रात्रभरही राहिली असावी.



सावज पार तिच्या घराच्या उंबरठ्यावर पोहोचेपर्यंत कोळिणीला वाट पाहावी लागते. मगच त्याच्यावर झडप घालून त्याला आत ओढावं लागतं; पण तिला बिळाचं संरक्षण सोडून जाता येत नाही. जर का कोळिणीनं आपलं बिळ सोडून दिलं असतं अन् दार तिच्या पाठीमागे लागलं असतं, तर तिला ते कधीच उघडता आलं नसतं. घराचा उंबरठा तिला पारखा झाला असता. चोरट्या पावलानं फिरणाऱ्या बाहेरच्या शत्रूपासून संरक्षण व्हावं, म्हणून तिनं या दाराची अशी रचना केली होती. तिच्या माघारी ते दार बंद झालं, तर ते असं काही घट्ट बसेल, की असहाय होऊन गवतातील काळ्या जगात तिची पारध झाली असती. झेप घेऊन कोळिणीनं अचूकपणे सावजाला पकडायला हवं असतं. तिच्या केसाळ हाताचा पंजा सावजाभोवती आवळला गेला पाहिजे, नाहीतर सावज निसटून जातं; परंतु त्याच वेळी तिचं एक पाऊल दारात असतं. तिच्या माघारी दार बंद होणं म्हणजे तिचा मृत्यूच.

बिळापासून एक हातभर अंतरावर दंवारलेल्या गवतात काहीतरी हललं. पाती बाजूला लवली, तसं राखी पाठ असलेलं पावट्याएवढं सोबग दिसलं. ते वेडंवाकडं जमिनीवरून जात होतं. काहीतरी शोधत होतं. मध्येच गिरकी घेत फांदीवर आदळत होतं. पुन: मागे वळत होतं, अन् अडखळत कोळिणीच्या सापळ्याजवळ जात होतं. एखाद्या चित्रपटातील पुढे काय होतं अशा उत्कंठा वाढवणाऱ्या गूढ दृश्यासारखं ते होतं. प्रेक्षक म्हणून मला त्यातील भयानक धोक्याची जाण होती; परंतु काही साहाय्य करता येत नव्हतं. सावज पुढे पुढेच जात होतं. शेवटच्या क्षणी ते वळलं. अरेच्या ते वाचलं तर! पण पुन: चुकून मृत्यूच्या दाराकडेच ते जात होतं.

ते सोबग अटळपणे त्या सापळ्याकडेच जात होतं. कोळिणीनं हालचाल केली तसं दार कंपित झालं. दार जसं किंचित किलकिलं झालं तशी एक काळी रेषा दिसली. जमिनीखालच्या तिच्या जागेपासून वर असलेलं सोबग तिला दिसत नसलं तरी त्याच्या आगमनाची चाहूल तिला लागली होती. क्षणभर कीटकाच्या पावलांचा कंप तिला जाणवला. त्याच्या पावलांचा आवाज जमिनीखालून तिनं ओळखला होता.

सोबग वेडंवाकडं चालत तिच्यापुढे जात होतं. दार हाललं. थोडं उघडलं गेलं. कोळीण आता अस्वस्थ झाली होती, अधीर झाली होती. दारापलीकडच्या काळ्या पोकळीकडे मी टक लावून पाहत होतो. त्या चिरेतील अंधारातून काहीतरी चमकताना मला दिसलं. कोळिणीचे डोळे चंद्राच्या प्रकाशात चमकत होते.

निश्चित नसलेली परिस्थिती तिथं रेंगाळत होती. सोबग वाट पाहत असलेल्या मृत्यूकडेच जात होतं. सोबग माझ्या मनात व्यक्तीसारखं साकार झालं. एखाद्या दु:खी आणि विनोदी पात्रासारखं. त्या अजागळ कीटकाबद्दल मला सहानुभूती वाटत होती; परंतु मी तटस्थ राहिलो.

सोबग जवळ गेलं. दार किंचित खाली पडलं.

दाराजवळ येणाऱ्या सोबगच्या पावलांचा कंप जसा जवळ येऊ लागला, तशी कोळीण चुळबुळ करू लागली. कीटकांच्या जगाला आवाजातील तीव्रता कळत असावी. कोळिणीला सोबगच्या पावलांचा आवाज ऐकू येत असावा, तर माझ्या पावलांच्या आवाजानं तिला काय वाटत असावं! परंतु मला जिकडेतिकडे विलक्षण शांत वाटत होतं. दुसऱ्या जगातील म्हणजे शहरातील संमिश्र आवाज येत होते. दूरवरचा कर्कश भोंगा, मोटारींच्या कर्ण्यांचे व आगगाड्यांचे आवाज ऐकू येत होते.

सोबग छिद्रापासून एक इंच दूर होतं. ते दृश्य मोठं भयानक होतं. त्यानं माझं लक्ष वेधलं. सोबग एखाद्या खुळ्यासारखं नकळत कोळिणीच्या दाराकडे नेणाऱ्या वाटेनं जात होतं. ते तिथं पोहचलं. छिद्रासमोर आलं. दार हाललं नाही. सावज जवळ आल्याची जाणीव कोळिणीला निश्चितपणे झाली होती. तिनं आता अजिबात हालचाल केली नाही. तिथल्या जमिनीप्रमाणे दारही स्तब्ध होतं. सोबगची आता सुटका होईल, असं मला वाटलं. माझ्या अस्तित्वामुळे कोळीण अस्वस्थ झाली असावी. कदाचित नकळत मी सोबगचा जीव वाचवला असेल. मला थोडंसं बरं वाटलं. काळ्या फटीत काहीही हालचाल नव्हती. कोणत्याही जिवाचा मागमूस नव्हता. धोक्याच्या मर्यादेबाहेर सोबग गेलं होतं. काही पावलं गेलं असतं की बचावलं असतं. इतक्यात काळी राक्षसीण जमिनीतून वर आली. दार सताड उघडलं गेलं. केसाळ हात एखाद्या दांडक्यासारखा बडवत त्या कुरूप प्राण्यानं छिद्रातून उडी घेतली. घोंगडी घालावी तसं पुढच्या पायांनी त्याला आवळलं अन् लगेच दृष्टिआड झाली. परत जमिनीखालच्या गूढ अंधाऱ्या जगात गेली. एका क्षणात कोळीण दिसली आणि सावजाला पकडून नाहीशी झाली. पार जमिनीच्या पडद्याआड. तिच्या पाठोपाठ किंचित आवाज करत दार बंद झालं. मला इथे बसल्या बसल्या तो आवाज ऐकू आला होता.

मला या घटनेची अपेक्षा होती; परंतु कोळिणीच्या अकस्मात दिसण्यानं आश्चर्यचकित झालो. हे सारं पाहत असताना बाहेरच्या जगाचा मला विसर पडला. गवताळ डोंगरावरच्या त्या वीतभर जागी माझं लक्ष केंद्रित झालं होतं. गार वाऱ्याची झुळूक लागली. वाटलं आता पुन्हा पाऊस येणार. मी पार गारठून शहरातील दिव्यांच्या प्रकाशाकडे पाहत होतो.

नंतर कोळिणीची घरटी असलेल्या जमिनीची एक डझनभर ढेकळं मी माझ्या स्टुडिओत आणली. खोलीच्या मध्यभागी असलेल्या टेबलावर ठेवली. त्यावर रात्रंदिवस प्रकाशाचा झोत टाकला. अंधाराचा पडदा सोडून कोळिणीला आपलं भक्ष्य उजेडात घेण्याची सवय लागावी म्हणून मी प्रयत्न करत होतो. याची आवश्यकता होती, नाहीतर तिचं रंगीत फिल्मनं चित्रण करता आलं नसतं.

अगदी क्षुद्र कीटकांच्या जगातही व्यक्ती–व्यक्तीनुसार प्रकृतीतही बदल होत असल्याचं पाहून प्रभावित झालो. बुद्धिशून्य अथवा मेंदूची कसलीही यंत्रणा नसलेल्या कोळिणीच्या व्यक्तिमत्त्वात खूप फरक असल्याचं दिसून आलं. डझनभर कोळिणींपैकी कित्येकींनी अन्नाचा पुरवठा करण्याच्या कुठल्याही पद्धतीचा अवलंब करण्याचं अजिबात नाकारलं. त्यांनी अक्षरशः स्वत:ला कोंडून घेतलं. आपली दारं आतून जाळी विणून बंद केली. ही ताटी त्यांनी पुन्हा कधीही उघडली नाही. जणूकाही त्यांनी समाधीच घेतली.

काहीजणी जगण्याइतपत क्वचितच खात. सावजाला पकडण्याच्या नाट्याचं चित्रण मला कॅमेऱ्यानं कधीच करता आलं नाही. एका कोळिणीनं आपल्या घरट्याचा त्याग केला. कदाचित ती हिरव्या कुरणाच्या शोधात गेली असावी. चमत्कारिक अशा सतत प्रकाशाच्या झोतात राहण्यापेक्षा बाहेरच्या धोकादायक जगात जगण्याचं तिनं स्वीकारलं. नंतर काही आठवड्यांनी नि:सत्त्व आणि सुकलेल्या अवस्थेत ती खोलीच्या एका कोपऱ्यात सापडली. फिल्मच्या दोन डब्यांमध्ये सरपटत जाऊन तिनं त्या जागेत तंतूनं आपलं घरटं बांधण्याचा प्रयत्न केला होता.

त्या डझनभर कोळिणींपैकी फक्त एकीनं माझ्या आवश्यकतेप्रमाणं स्वत:ला जमवून घेतलं. माझ्या चित्रपटाची जणू ती तारका बनली. मी डोंगरात पाहिलेल्या दृश्याची पुनरावृत्ती तिला खुणावताच मोठ्या चमत्कारिकरीत्या माझ्या कॅमेऱ्यासमोर ती करून दाखवी. प्रतीक्षा आणि तिची अकस्मात झडप अशी मी पूर्वी पाहिली होती तशी ती करी.

सोबगला ती अगदी सहज पकडे. माझं त्यामुळे समाधान होईना. वाटे की काहीतरी रोमहर्षक घटना घडायला हवी. फाशाच्या दारावरच्या कोळिणीशी एका काळ्या कोळिणीनं अजिबात संघर्ष केला नाही. सोबग जसं नाहीसं होई तशीच एखादी जादूची कांडी फिरावी तशी ती नाहीशी होई. पहिल्यांदा ज्या वेळी काळ्या कोळिणीला तिनं छिद्रात खेचलं, तेव्हा पाहण्यात काही चूक तर झाली नसेल ना असं वाटलं. माझी थोडीफार अपेक्षा होती, की दार ढकलून धुळीचे हात झाडत, माझ्या तारकेला झोडपून ती बाहेर येईल; परंतु दुसऱ्या दिवशी तिथं सुरकुतलेलं काळं कलेवरच मला पाहायला मिळालं. माझ्या नटीनं तिला पार शोषून टाकलं होतं.

मला हवं होतं की माझ्या कोळीण तारकेला सावज सहजपणे छिद्रात ओढून नेता येऊ नये. कॅमेऱ्यानं तिची चांगली दृश्यं टिपायची होती. ज्या वेळी सावज पकडायचं त्याच वेळी ती जमिनीवर येई, तेव्हाच तिचं निरीक्षण करायला मिळे. हे दृश्य एखादया विजेच्या गतीनं नाहीसं होई.

कोळिणीच्या दारातून न जाणाऱ्या कीटकाची सावज म्हणून निवड केली, तर त्यांच्यात बराच वेळ चालणाऱ्या झटापटीचं चित्रण करता येईल असं वाटलं; परंतु कोळीण अजिबात त्याच्या वाटेला जात नसे. मोठा कीटक तिच्या दारापर्यंत जलद जाई; परंतु दार उघडले जात नसे. माझा तर्क असा, की मोठा कीटक जोरानं आवाज करत असावा. कोळिणीला अशा नाट्यात अजिबात रस नव्हता. तिला हवं होतं रोजचं खाणं.


बागेतील दगडाखाली कोळिणीचं भक्ष्य शोधताना मला एकदा लहान शतपाद मिळाला. सोबगचा जसा ती निकाल लावत असे, त्याप्रमाणे शतपादाची विल्हेवाट तिनं लावली. मी शतपाद मिळवण्याचा शोध सुरू केला. मी आठ पाय असलेले कीटक जमा केले. माझ्या खोलीतल्या बाटल्यांमधून सर्व आकाराचे शतपाद भरून ठेवले. जर शतपाद ठेवायचे तर त्यांच्या खाण्याचीही सोय करायला हवी. कॅमेऱ्यानं क्षणैक दृश्यं टिपत होतो, तसंच बागेत दगडांची उलथापालथ करण्यात अनेक तास जात.

वालनट जसे लहान, मध्यम आणि मोठे असे प्रतवार लावतात, तसे मी शतपाद लावले. त्यात अति-लहान, मध्यम लहान, लहान, मध्यम मोठे-लहान, लहान-मध्यम अशी प्रतवारी तयार केली. मी रोज कोळिणीला शतपाद खाऊ घालायचा. गेल्या आठवड्यात दिल्यापेक्षा आकारानं मोठा शतपाद प्रत्येक आठवड्यात दयायचा.

माझ्या कोळिणीला मी अतिशय श्रमपूर्वक आणि कौशल्यानं पढवत होतो. प्रत्येक आठवड्यात ती मोठ्या आकाराच्या शतपादाचा स्वीकार करी. असं करत लोभ आणि अधीरतेनं तिनं भल्यामोठ्या शतपादावर झडप मारली. शतपादाला शंभर पाय असले तरी त्यांतील पन्नास जमिनीला खिळून राहायचे. राहिलेले पन्नास पाय धडपडत आणि वळवळत स्वत:चं संरक्षण करण्याकरिता तिला घट्ट पकडण्याचा प्रयत्न करत असत. कितीतरी सेकंद हे नाट्य चालू असताना ते मी कॅमेऱ्यानं टिपत असे. एकदा तर शतपादानं लढाई जिंकली होती. दारात डोकं सापडून तो सर्पाप्रमाणे वळवळत होता. असा समय आला होता, की त्यानं माझ्या कोळिणीला छिद्रातून बाहेर खेचलं असतं. दार किंचित उघडं होतं. त्यातून तिचे पाय दिसायचे. त्याच्याशी झटापट करत असता ती कलंडली अन् आपल्या शत्रूला तिनं आत ओढलं. कुठेतरी ढिलाई झाली. शतपाद तिच्याभोवती वेटोळं घालण्याचा प्रयत्न करत होता. काही क्षणांतच त्याचे शंभर पाय हवेत वळवळत होते. त्या क्षणी संधी साधून कोळिणीनं शतपादाला विळखा घातला अन् त्याला घेऊन ती छिद्रात नाहीशी झाली. काळं छिद्र झाकलं गेलं, अन् मागे फक्त दरवाजा लागल्याचा आवाज आला.

***

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**




**प्र. २. असे का घडले ते लिहा.**

(अ) लेखक डोंगरावरच्या जमिनीचे निरीक्षण करू लागले.

(आ) लेखकांना बाहेरच्या जगाचा विसर पडला.


(इ) लेखकांनी कोळिणीच्या घरट्याचे उघडलेले दार सोडून दिले.

(ई) कोळिणीला बिळाचे संरक्षण सोडून जाता येत नाही.

**प्र. ३. खालील घटनांचे परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
| --- | --- |
| (अ) लेखकांनी चाकूच्या पात्याचं टोक कोळिणीच्या घरट्याच्या दाराला लावलं. | |
| (आ) पावसाचा कुठेतरी शिडकावा झाला. | |
| (इ) कोळिणीच्या माघारी दार बंद होणे. | |
| (ई) कोळिणीला सोबगच्या पावलांचा आवाज आला. | |

**प्र. ४. आकृतीत दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तर लिहा.**




**प्र. ५. तुम्हांला पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या घरांची नावे माहीत आहेत. ती खालील चौकटींत लिहा.**

| सुगरण | साप | वाघ | गाय | घोडा |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |

## खेळूया शब्दांशी.

- **खालील वाक्प्रचारांच्या अर्थातील योग्य अर्थ शोधून लिहा.**

(अ) प्रतीक्षा करणे
- वाटेने जाणे.
- वाट बघणे.
- वाट लावणे.

(आ) पारखा होणे
- वंचित होणे.
- दुरून बघणे.
- दु:स्वास करणे.

(इ) पारध होणे
- भक्ष्य शोधणे.
- भक्ष्य होणे.
- शिकार होणे.

## आपण समजून घेऊया.

### (५) केवलवाक्य

(अ) ती रोज सकाळी लवकर उठते.

(आ) तो कसोटी सामन्यात खेळतो.

ही **केवलवाक्ये** आहेत. केवलवाक्यात एकच विधान असते, त्यामुळे एक उद्‌देश्य व एकच विधेय असते. केवलवाक्य हे विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थी यांतील कोणत्याही प्रकारचे असू शकते.

### (६) मिश्रवाक्य

(अ) जेव्हा मनात येईल, तेव्हा मी गावाला जाईन.

(आ) पावसाळा आला, की आकाशात काळे ढग जमतात व पाऊस पडू लागतो.

ही **मिश्रवाक्ये** आहेत. मिश्र वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये असतात, जी एकमेकांवर अवलंबून असतात. अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असणारे वाक्य 'मुख्य वाक्य' असते, तर मुख्य वाक्यावर अवलंबून असणारे वाक्य गौणवाक्य असते.

उदा., वरील वाक्यांत 'मी गावाला जाईन' व 'पावसाळा आला' ही दोन मुख्य वाक्ये आहेत.

कधीकधी एका मुख्य वाक्यावर एक किंवा अधिक गौणवाक्ये अवलंबून असतात. ही गौणवाक्ये उभयान्वयी अव्ययाने एकमेकांना जोडलेली असतात.

### (७) संयुक्तवाक्य

(अ) मंदा रोज सकाळी गणिताचा अभ्यास करते आणि संध्याकाळी मराठीचा अभ्यास करते.

(आ) मिहिर खो खो किंवा लंगडी या खेळात भाग घेईल.

ही **संयुक्तवाक्ये** आहेत. संयुक्तवाक्यात दोन वाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात, म्हणजे ती दोन केवलवाक्ये असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात. ते एक जोडवाक्य असते.

# १७. थेंब आज हा पाण्याचा



• ऐका. वाचा. म्हणा.

शब्द जाऊ दे, अर्थ राहू दे, विषय आहे गाण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।धृ.।।

मोती बनुनी सरसर येती, वर्षेमधल्या सरीतुनी
माळ ओवते, निसटुन जाते, बावरते जणू परी कुणी
या मोत्यांचा संचय कर तू, प्रश्न तुझ्या रे जीण्याचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।१।।

आभाळातिल ह्या मोत्याने, मातीमधुनी पिकती मोती
निसर्ग जाणी मोल तयाचे, तुम्ही माणसे का मग कोती?
संचय करता तिजोरीतल्या, खणखणत्या त्या नाण्यांचा
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।२।।

कशास ऐसा वेडाचाळा, स्वत: होऊनी ठगण्याचा
दृष्टिकोन तू बदल आता रे, निसर्गास ह्या बघण्याचा
तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा?
आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।३।।

**सुनंदा भावसार** (१९५९) : नियतकालिकांतून पर्यावरणविषयक कवितांचे लेखन. विविध कार्यक्रमांतून पर्यावरणविषयक कवितांचे सादरीकरण. 'पर्यावरण गीत गंगा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवयित्रीने मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व विशद केले आहे.

## स्वाध्याय

**प्र. १. कवयित्रीने असे का म्हटले असावे ते तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) या मोत्यांचा (पाण्याचा) संचय कर.

(आ) निसर्गाला जे कळते ते माणसाला कळत नाही.

**प्र. २. खाली दिलेल्या अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.**

(अ) आकाशातून पडणाऱ्या पावसाच्या थेंबाने धान्य पिकते.

(आ) मनुष्य खणखणत वाजणाऱ्या नाण्यांचा तिजोरीत संग्रह करतो.

(इ) निसर्गाचे मोल न जाणणे हे स्वत:ला फसवण्यासारखे आहे.

**प्र. ३. संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) आभाळातील मोती.

(आ) मातीतील मोती.

(इ) मोत्यांचा संचय.

(ई) बहुमोल थेंब.

**प्र. ४. खाली दिलेल्या ओळींतील विचार सांगा.**

तहानेसाठी सांग पुरे का घोट तुला रे सोन्याचा ?

आभाळातिल बहुमोलाचा, थेंब आज हा पाण्याचा ।।

**प्र. ५. माणसाने निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. या वाक्याचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

**प्र. ६. फरक स्पष्ट करून तक्ता पूर्ण करा.**

| | माणसाचे धन | निसर्गाचे धन |
|---|---|---|
| कोणते ? | | |
| कोठे ठेवतात ? | | |
| उपयोग | | |

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांचे अर्थ समजून घेऊन त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

उदा., मोल–बहुमोल, अनमोल.

मोल–मातीमोल, कवडीमोल.

**(आ) माती–मोती अशा शब्दांच्या अर्थात केवळ एका मात्रेमुळे खूप फरक होतो. अशा शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**प्रकल्प :**

(१) सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांच्या दुतर्फा पाणीबचतीच्या संदर्भात आपल्यासाठी काही संदेश लिहिलेले असतात. त्यांचा संग्रह करा. त्यांतील तुम्हांला आवडलेल्या संदेशांचे फलक तयार करून शाळेच्या परिसरात लावा.

(२) 'निसर्ग वाचवा' याविषयी घोषवाक्ये तयार करून खालील फलकांवर लिहा.



## लिहिते होऊया.

- **पाऊस पडलाच नाही, तर..... कल्पना करा. खालील मुद्द्यांच्या आधारे निबंधलेखन करा.**
  (१) पाण्याचा दुष्काळ.
  (२) दैनंदिन जीवनावर होणारे परिणाम.
  (३) शेती व उद्योगधंदे यांच्यावर होणारा परिणाम.
  (४) नदी, नाले, विहिरींची स्थिती.
  (५) सजीवांवर होणारा परिणाम.



## विचार करा. सांगा.

- पाणी कसे तयार होते?
- पाणी कोठे साठवले जाते?
- पाण्याचा वापर कशाकशासाठी होतो?
- जलप्रदूषण म्हणजे काय?
- जलप्रदूषणाची कारणे कोणती?
- जलप्रदूषण रोखण्यासाठी काय करावे, असे तुम्हांला वाटते?
- जलसंवर्धनासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल?

**वाचा.**
**लक्षात ठेवा.**

- पाणी फेकून देऊ नका.
- पाणी हवे तेवढेच वापरा.
- पाण्याचा पुनर्वापर करा.
- जवळच्या धरणाला भेट देऊन धरणाचा उपयोग समजून घ्या.
- पाणी घेतल्यानंतर नळ लगेच बंद करा.

**'पाणी अडवा, पाणी जिरवा.'**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या विषयांवर आधारित घोषवाक्ये, सूचना सुवाच्य अक्षरांत लिहून घ्याव्यात. वर्गात किंवा शाळेच्या परिसरात लावाव्यात.

# आभारपत्र

- **सुमितच्या शाळेत १४ नोव्हेंबर रोजी बालदिनाचे आयोजन करण्यात आले होते. सुमित पडवळ शाळेतील सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. बालदिनाच्या कार्यक्रमप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. हेमंत साळवे (प्राचार्य) यांचे आभार मानण्यासाठी सुमितने त्यांना पत्र पाठवले आहे. ते अभ्यासा.**

सुमित पडवळ
विद्यावर्धिनी विद्यालय
उस्मानाबाद,
पिन – ४१३५०१
दिनांक : १५.११.२०२०

**प्रति,**

डॉ. हेमंत साळवे
प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय,
उस्मानाबाद.
पिन – ४१३५०१

आदरणीय महोदय,

स. न. वि. वि.

१४ नोव्हेंबर रोजी बालदिनाच्या निमित्ताने आमच्या शाळेच्या कार्यक्रमासाठी आपण वेळात वेळ काढून उपस्थित राहिलात व आम्हां सर्व मुलांना मार्गदर्शन केले, याबद्‌दल सांस्कृतिक विभाग व शाळेच्या वतीने मी आपले आभार मानत आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपण पंडित जवाहरलाल नेहरू व विद्यार्थी यांच्याबद्‌दल अनेक कथा सांगितल्या. त्या कथा आम्हां सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडल्या. तसेच विद्यार्थी कसा असावा, याबाबतही आपण मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून आम्हांला निश्चितच नवी दिशा मिळाली आहे.

खरे तर आपला रोजचा दिवस कामांमध्ये अत्यंत व्यस्त असतो, त्यातूनही वेळ काढून आपण कार्यक्रमास उपस्थित राहिलात, याबद्‌दल आपले पुनश्च मनापासून आभार.

आपला नम्र,
सुमित पडवळ
(सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रतिनिधी)

- जर तुम्हांला एखाद्या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करायचे असेल, तर कोणत्या गोष्टी विचारात घ्याल, त्याचे सादरीकरण कसे कराल, त्याचा आराखडा तयार करा.
- आंतरशालेय क्रीडामहोत्सवात धावण्याच्या स्पर्धेत तुमच्या मित्राने/मैत्रिणीने प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याचे/तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

## आपण समजून घेऊया.

- खालील तक्त्याचे निरीक्षण करा. शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अ: |
| क | का | कि | की | कु | कू | के | कै | को | कौ | कं | क: |
| – | ा | ि | ी | ु | ू | े | ै | ो | ौ | ं | : |

मराठी वर्णमालेचा म्हणजे अक्षरांचा अभ्यास तुम्ही केला आहे. त्या अक्षरांचा वापर करून आपण शब्द लिहितो हे तुम्हांला माहीत आहे. आपण जे बोलतो ते शब्द ध्वनींनी बनलेले असतात. अक्षरे म्हणजे या ध्वनींसाठीची चिन्हे असतात.

ध्वनींचे दोन प्रकार असतात– स्वर आणि व्यंजने. आता आपण मराठी भाषेतील स्वर आणि व्यंजने पाहणार आहोत.

मराठीत अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, लृ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर आहेत. अलीकडे मराठीत इंग्रजी शब्दांचा वापर सुरू झाल्यामुळे अॅ, ऑ या स्वरांचाही समावेश करण्यात आला.

'लृ' हा स्वर मराठीत फारसा वापरला जात नाही.

क्, ख्, ग्, घ्, ङ्

च्, छ्, ज्, झ्, ञ

ट्, ठ्, ड्, ढ्, ण्

त्, थ्, द्, ध्, न्,

प्, फ्, ब्, भ्, म्

य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह्, ळ् ही व्यंजने आहेत.

क्ष, ज्ञ ही संयुक्तव्यंजने आहेत.

प्रत्येक ध्वनीसाठी एकच अक्षर असते असे तुम्हांला वाटते का? एका अक्षराचा एकच उच्चार होतो का?

- हे शब्द उच्चारून पाहा.

चंद्र    चांदणे

आजी    आजोबा

झाड    झकास

असे आणखी शब्द मिळवा.

# १८. वदनी कवळ घेता...

मुखी घास घेता करावा विचार ।
कशासाठी हे अन्न मी सेविणार ।।

C4X433



वेगवेगळ्या सांस्कृतिक, सामाजिक व कौटुंबिक समारंभांत जेवणाला खूप महत्त्व असते. 'मिष्टान्नम् इतरेजन:' हे मनुष्य स्वभावाला धरूनच आहे, म्हणून अशा समारंभांत पदार्थांचे वैविध्य व रेलचेल असते. यजमान आपल्याला आग्रह करून वाढतात. आपलाही नाइलाज होतो अन् आपल्या ताटात अन्न शिल्लक राहते. अशा वेळी फक्त अन्नच वाया जाते असे नाही, तर त्याबरोबर अनेक घटकांचाही अपव्यय होत असतो.

आज ३१ डिसेंबर. श्रुती जरा नाराजीनंच घरी आली. त्याचं कारणही तसंच होतं. वर्गात तिच्या मॅडमनी तिला नववर्षाचा संकल्प विचारला. इतरांपेक्षा वेगळा संकल्प सांगता न आल्यामुळे ती नाराज झाली. तशीच ती घरी आली आणि ताबडतोब आईबरोबर मावशीकडे गेली. मावशीकडे तिच्या मावसबहिणीचा वाढदिवस होता. झकास बेत होता. गुलाबजाम, केक, कचोरी आणि पुलाव. सगळंच श्रुतीच्या आवडीचं; पण तिनं एक गुलाबजाम खाल्ला अन् डिश बेसिनमध्ये ठेवून दिली.

मावशीनं ते बघितलं. श्रुती उपाशी राहील, म्हणून तिच्या आईच्या कानावर घातलं. घरी आल्यावर आई श्रुतीला खूप रागावली. 'खायचं नव्हतं तर डिश मला का आणून दिली नाहीस?' वगैरे वगैरे. ''मला नाही त्यातलं काही आवडलं,'' श्रुती रागातच म्हणाली. एव्हाना बाबाही आले. तेही श्रुतीला रागावले आणि त्यांनी तिला समजावलं सुद्‌धा.

खट्टू मनानं श्रुती खुर्चीत मान खाली घालून बसली होती. दूरदर्शनवर बातम्या सुरू होत्या. श्रुतीचे बाबा बातम्या ऐकत होते. श्रुतीनं सहज वर बघितलं. दूरदर्शनवर दाखवलेली मेळघाटमधील कुपोषित बालकं तिनं बघितली आणि लगेच विचारलं, ''बाबा ही बालकं अशी वाळलेली का आहेत हो?'' ''बेटा, त्यांना पुरेसं जेवण मिळत नाही, त्यामुळे प्रोटिन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स त्यांना मिळत नाहीत, म्हणून ती अशी वाळलेली आहेत.'' बाबांनी सांगितलं.

एवढ्यात आई बाहेर येत म्हणाली, ''आणि ज्यांना जेवायला मिळतं ते टाकून देतात. श्रुती, अगं असं जेवण टाकून देऊ नये. ''

''माझ्या ऑफिसमध्येसुद्‌धा आज, किती अन्न पानांत टाकलं आणि त्यात किती लोक जेवू शकतात, याचा, केटरिंगवाला बोर्ड लावतो.'' बाबा म्हणाले.

श्रुती उत्साहानं उडी मारून आईला म्हणाली, ''आई नववर्षाचा संकल्प सुचला. मी यापुढे कधीही पानात अन्न टाकणार नाही.''





अन्न शिजवण्यासाठी लागणारे इंधन, गॅस यांचा अपव्यय होतो. खनिज तेल, लाकूड ही इंधने दुर्मीळ होत चालली आहेत. ती वाया घालवणे योग्य नाही.

अन्नपदार्थ तयार करताना मसाले, तेल, तूप वापरतात. पालेभाज्या, फळभाज्या यांच्या वापरांतून पदार्थ बनतात. या घटकांचा देखील अपव्यय होतो.






आपण पानात चपाती, भाकरी, भात असे कितीतरी अन्नपदार्थ टाकतो, त्यामुळे धान्याची देखील नासाडी होते.

अन्न शिजवणाऱ्या व ते शिजवण्यासाठी पूर्वतयारी करणाऱ्या, जसे-पुऱ्या, चपात्या करणारे, भाजी चिरणारे, अन्न वाढणारे, भांडी घासणारे व धुणारे अशा अनेक व्यक्तींचे कष्ट वाया जातात.




उरलेले अन्न कचराकुंडीत फेकून दिले जाते. अन्न खराब झाल्याने त्या परिसरात दुर्गंधी पसरते. अन्नकचरा ही एक समस्या बनू लागली आहे.

**जरा विचार करूया.**

**वदनी कवळ घेता नाम घ्या मातृभूचे ।**
**सहज स्मरण होते आपल्या बांधवांचे ।।**
**कृषिवल कृषिकर्मी राबती दिनरात ।**
**श्रमिक श्रम करूनि वस्तू त्या निर्मितात ।।**
**स्मरण करूनि तयांचे अन्न सेवा खुशाल ।**
**उदरभरण व्हावे चित्त होण्या विशाल ।।**

## आपण हे करू शकतो.



जेवणाऱ्या लोकांना खूप आग्रह करू नका. जेवताना लोक जे मागताहेत ते पदार्थ त्यांना मिळताहेत का, एवढेच यजमानाने पाहणे गरजेचे आहे. लोक पोटभर जेवतात, हवे ते मागून घेतात. त्यांना जास्तीचे अन्न वाढू नका.



आपल्या समारंभाचे स्वरूप मर्यादित ठेवून, जेवणामध्येदेखील अन्नपदार्थांची संख्या कमी ठेवावी, जेणेकरून बनवलेले सर्व अन्नपदार्थ खाल्ले जातील व संपतील.



स्वेच्छाभोजनामुळे जेवणारे लोक त्यांना हवे तेच व हवे तेवढेच पदार्थ वाढून घेतात, त्यामुळे पानात पदार्थांची रेलचेल होत नाही व अन्न वाया जात नाही.



वाया जाणारे अन्न फेकून देण्यापेक्षा गरजू व भुकेलेल्यांना द्यावे.



अन्नावर अवाजवी खर्च करून अन्न वाया घालवण्यापेक्षा त्या पैशांतून गरजू, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना, व्यक्तींना मदत करावी. आपला समारंभ घरगुती व मोजक्या व्यक्तींच्या उपस्थितीत पार पाडून जेवणावळींना फाटा द्यावा. त्यातून वाचणारी रक्कम एखाद्या अनाथाश्रमाला देणगी म्हणून दिली, तर त्यामुळे समाजातील दु:खितांना, गरजूंना थोडासा दिलासा मिळेल.

## शोध घेऊया.



कुपोषण ही एक खूप मोठी समस्या आहे. आदिवासी, दुर्गम भागांत या समस्येचे भयावह स्वरूप पाहायला मिळते. आंतरजालावरून या समस्येची खालील प्रश्नांच्या आधारे माहिती करून घ्या.

(१) ही समस्या का निर्माण होते?
(२) या समस्येच्या निराकरणासाठी कोणकोणत्या संस्था कार्य करत आहेत?
(३) या संस्था कोणत्या स्वरूपाचे काम करतात?
(४) तुमच्या परिसरात एखादे कुपोषित बालक तुमच्या निदर्शनास आल्यास तुम्ही त्याच्यासाठी काय कराल, ते लिहा.



## चर्चा करूया.

(१) आपण वाढदिवसाला कोणकोणत्या गोष्टींसाठी खर्च करतो?
(२) मी माझा वाढदिवस कसा साजरा करू इच्छितो/इच्छिते?
(३) हॉटेलमधील उरलेल्या अन्नाचे काय करतात?
(४) काही कारणास्तव अन्न शिल्लक राहिले, तर तुमच्या घरी त्याचे काय करतात?

### लक्षात ठेवा :

**जेवढी भूक आहे तेवढेच खाणे म्हणजे प्रकृती.**

**जेवढी भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे म्हणजे विकृती.**

**आपल्या जेवणातील दोन घास भुकेलेल्यांना खाऊ घालणे म्हणजे संस्कृती.**

## स्वाध्याय



**प्र. १. श्रुतीच्या नाराजीबाबत तुमचे मत लिहा.**

**प्र. २. आई श्रुतीवर का रागावली?**

**प्र. ३. श्रुतीला नवीन वर्षाचा कोणता संकल्प सुचला?**

**प्र. ४. खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

मुखी घास घेता करावा विचार ।
कशासाठी हे अन्न मी सेविणार ।।

- **खाली काही कृती दिलेल्या आहेत. त्या योग्य की अयोग्य आहेत ते ठरवा. पुढे दिलेल्या चौकटींमध्ये ते नोंदवा.**

(अ) वैभवी शाळेत येताना घरी डबा विसरली. त्या वेळी अनुजाने स्वत:च्या डब्यातील पोळीभाजी तिला दिली.

(आ) राजेंद्र सतत बाहेरचे जंकफूड खातो.

(इ) यास्मिन टीव्ही बघत जेवण करते.

(ई) आनंद जेवण करण्यापूर्वी हात स्वच्छ धुतो.

(उ) पीटर जेवताना खूपच बडबड करतो.

(ऊ) रूपाली सर्व प्रकारच्या भाज्या खाते.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

पितो, महिमा, खजिना, पादुका, झोपवितो, गरिबी, बिया, लिली, पहिली, पुरी, चुका, बाहुली, वनिता, विहिरी, सगुणा, भिडू, जिना.

वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवले?

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार अशी बाराखडीतील चिन्हे (दीर्घ स्वरान्त) आहेत आणि शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार व उकार ऱ्हस्व आहेत.

**शब्दांतील शेवटचे अक्षर दीर्घ स्वरान्त असेल, तर त्या आधीच्या उपान्त्य अक्षरातील इकार व उकार ऱ्हस्व लिहितात.**

या नियमाला अपवाद म्हणजे जेव्हा एखाद्या शब्दाला प्रत्यय लागतो तेव्हा सामान्यरूपातील नामाचे उपान्त्य अक्षर ऱ्हस्व होत नाही.

उदा., पालीला ✓ पालिला ✗

बहिणीला ✓ बहिणिला ✗

- **खालील चित्रांची नावे लिहा.**






# १९. धोंडा

**डॉ. संजय ढोले** (१९६५) : विविध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतून विज्ञानकथा प्रसिद्ध. 'प्रतिशोध', 'प्रेमाचा रेणू', 'अश्मजीव', 'संकरित', 'अंतराळातील मृत्यू' हे विज्ञानकथासंग्रह प्रसिद्ध.

C56240

राजू हा खोडकर, पण जिज्ञासू वृत्तीचा मुलगा आहे. त्याला वेगवेगळ्या प्रकारचे दगडधोंडे गोळा करण्याची आवड आहे. एके दिवशी रात्रीच्या वेळी राजूला एक अनोखा दगड मिळतो. या अनोख्या दगडाबाबतची माहिती आपण या काल्पनिक विज्ञानकथेतून जाणून घेऊया.

राजू चौकस बुद्धीचा, जिज्ञासू मुलगा. सतत काहीना काही उद्योग करणारा. खूप प्रश्न विचारणारा. एक भागिले एक म्हणजे किती? शून्य भागिले एक म्हणजे किती? यात फरक काय? सूर्याचं तापमान किती? असे प्रश्न विचारून भंडावून सोडणारा हा राजू रस्त्यात त्याला काही नवीन वस्तू अथवा प्राणी दिसला म्हणजे तो त्यातच रमत असे.

आजही शाळेतून येताना नेहमीप्रमाणे राजूचे मित्र पुढे निघून गेले होते. संधिप्रकाश अंधूक होऊ लागला होता. राजू एक एक दगड उचलून बॉलिंग करावी तसा फेकत रस्त्याने चालला होता.



**तुम्हांला काय आवडते?**

- तुम्हांला कोणकोणत्या वस्तूंचा संग्रह करायला आवडतो?

अचानक एक गुळगुळीत दिसणारा; पण स्पर्शाला खरखरीत असा दगड राजूच्या हाती आला. त्यानं तो नेहमीप्रमाणे फेकला; पण तो घरंगळत न जाता उड्या मारत अपेक्षेपेक्षा खूपच अंतरावर जाऊन थांबला. गाडीला ब्रेक लागावा तसा. राजूला आश्चर्य वाटलं. तो थोडा वेळ थबकला. जास्त बल न लावता फेकलेला दगड एवढ्या लांबपर्यंत कसा गेला? त्यानं दुसरा धोंडा उचलला. खूप जोर लावून त्यानं तो फेकला; पण पूर्वीच्या फेकलेल्या गुळगुळीत धोंड्यापर्यंत न पोहोचलेला पाहून, राजू थोडा धास्तावला. त्याला काहीच कळत नव्हतं. हा अनुभव त्याला वेगळाच होता. काय करावं त्याला सुचत नव्हतं. कदाचित आपला हा भ्रम असू शकेल, म्हणून त्यानं तो धोंडा पुन्हा फेकण्याचं ठरवलं.

या वेळेस तो गुळगुळीत दिसणारा पण खरखरीत वाटणारा धोंडा त्यानं उचलून, पूर्वीपेक्षा खूपच कमी बलानं फेकला आणि चेंडू जसा उड्या मारत जातो, खोडकर मुलं जशी उड्या मारत पळतात, तसाच तो धोंडा पूर्वीपेक्षाही उंच उड्या मारत गेला व थांबला.

राजूला या नवीन धोंड्याची थोडी गंमत वाटली. एक नवीन खेळणंच आपल्या हाती लागल्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. हा धोंडा काहीतरी विलक्षण असल्याची जाणीव त्याला झाली.

शाळा सुटून बराच वेळ झाला होता. अंधार दाटून आल्यानं हा खेळ राजूला थांबवावा लागला. तो विलक्षण धोंडा त्यानं उचलला. अजून काही वेगवेगळ्या

प्रकारचे दगड त्यानं गोळा केले होते. राजू घरी आला. घरी नेहमीप्रमाणेच त्याचं 'स्वागत' होणार होतं.

राजूचे वडील बाबा पाटील कडक शिस्तीचे आणि करारीही. घरी येताच बाबांचा करडा स्वर राजूच्या कानी पडला.

''राजूऽऽ कुठे होता इतक्या वेळपर्यंत?''

''शाळा सुटल्यानंतर मी खेळत होतो.''

''काय खेळत होतास? दगडधोंडे?'' बाबांचा वैतागलेला स्वर

''होऽऽ!'' राजूचा हुंकार

बाबांनी राजूच्या खिशातील सर्व दगडधोंडे काढून बाहेर भिरकावले. फेकलेल्या त्या गुळगुळीत धोंड्याकडे राजू आशाळभूत नजरेने पाहत राहिला. रात्र बरीच झाली होती; पण राजूला झोपच येत नव्हती. बाबांनी बाहेर फेकलेला तो गुळगुळीत धोंडाच त्याच्या डोळ्यांसमोर येत होता. आजूबाजूला पाहत तो बाहेर पडला. बाहेर किट्ट अंधार होता. तो धोंडा त्याला कुठे सापडणार होता? तरीदेखील बाबांनी जिथे ते सर्व दगडधोंडे भिरकावले होते, ती जागा त्याने शोधून काढली; पण तो धोंडा काही सापडेना. राजू कष्टानं



उठला. शेवटचा प्रयत्न म्हणून झुडपांमध्ये शोधण्याचा निर्णय त्यानं घेतला. तिकडे जात असतानाच, गर्द झुडपात राजूला काहीशी अंधूकशी चकाकी असलेला तो धोंडा दिसला.

'म्हणजे रात्रीच्या वेळी हा असा दिसतो तर?' कुठलीही भीती न बाळगता, राजूनं झुडपात हात घालून तो धोंडा काढला. दबक्या पावलानं घरात येऊन टेबलाचा ड्रॉवर हळूच उघडून, त्यानं सगळे दगडधोंडे एका कोपऱ्यात ठेवले.

सकाळी उठल्यावर राजूनं टेबलाचा संपूर्ण ड्रॉवर उघडला. धोंड्याबरोबर सोबत ठेवलेले इतर तीन-चार दगड त्याला सापडले नाहीत. राजूनं धोंड्याकडे निरखून पाहिलं. तो आकारानं त्याला काहीसा फुगीर भासला. उचलताच पूर्वीपेक्षा जडही जाणवला. हा आपल्याला भास होतोय की काय! राजूला कसलाच अर्थबोध होत नव्हता. तेवढ्यात आईच्या हाकेनं तो विचारशृंखलेतून बाहेर आला.

शाळेत जाताना राजूनं सर्वांची नजर चुकवत तो धोंडा हळूच आपल्या दप्तरात ठेवला. त्या धोंड्यामुळे राजूच्या मनात कुतूहल जागृत झालं होतं.

रात्री कुणालाही न दाखवता राजूनं तो धोंडा पुन्हा आधीच्याच ठिकाणी ड्रॉवरमध्ये ठेवला व फारसा कुणाशी न बोलताच झोपी गेला.

मध्यरात्री एखाद्या स्वप्नातून उठावं तसा तो गडबडून उठला. आई शेजारीच झोपली होती. त्यानं तिला हलवलं; पण ती उठली नाही. राजूला आश्चर्य वाटलं. टाचणी पडल्याचा आवाज होताच उठणारी आई... एवढी गाढ कशी झोपली, याचंच त्याला आश्चर्य वाटत होतं. तेवढ्यात त्याचं लक्ष टेबलाकडे गेलं व तो चकित झाला. जिथे धोंडा ठेवला होता, त्या बंद ड्रॉवरच्या फटीमधून प्रखर प्रकाशकिरणं बाहेर येताना त्याला दिसली. एखाद्या चुंबकाकडे आकर्षित व्हावं तसा राजू टेबलाकडे ओढला गेला. नकळत त्यानं ड्रॉवर उघडला. उघडताच ती खोली प्रकाशानं झळकून गेली. धोंडा एखाद्या हिऱ्यासारखा चमकत होता. त्याच्यापासूनच विशिष्ट प्रकारच्या लहरी निघत होत्या.

त्या प्रखर प्रकाशातही आई व बाबा झोपलेले पाहून राजू गांगरला. कदाचित या धोंड्यामुळेच ते झोपले असावेत, असा तर्क त्यानं केला.



धोंड्यापासून निघणाऱ्या प्रकाशलहरी त्याच्या आईबाबांच्या व परिसरातील इतर सजीव प्राण्यांच्या मेंदूच्या लहरींशी जुळल्यानं ते गाढ झोपेतून उठणं शक्य नव्हतं; पण राजू स्वत: त्याचवेळेस स्वप्नसृष्टीत असल्यानं, धोंड्यापासून निघणाऱ्या लहरी त्याच्या मेंदूशी जुळू शकल्या नव्हत्या, म्हणूनच या महत्त्वाच्या क्षणी राजू जागा झाला होता.

हे सर्व राजूच्या आकलनापलीकडचं होतं.

प्रखर प्रकाश फेकणाऱ्या धोंड्याकडे राजू जास्त काळ पाहू शकला नाही. त्यानं आपली नजर दुसरीकडे वळवली. क्षणानंतर डोळे उघडून त्यानं लख्ख प्रकाशात पुन्हा त्या प्रकाशमय धोंड्याकडे पाहिलं. प्रकाशमय धोंड्याची हालचाल पाहून तो शहारला. धोंडा वेडावाकडा होऊ लागला. त्याच्यापासून दुसऱ्या एका लहान धोंड्याची निर्मिती पाहून तर राजू घाबरला. दगडापासून दगड? त्याला काहीच सुचत नव्हतं.

नुकत्याच जन्मलेल्या त्या लहान धोंड्याची हालचाल पाहून राजूला भीतिमिश्रित गंमत वाटली. छोट्या धोंड्याला स्पर्श करण्याचा मोह त्याला झाला; पण तो त्याने टाळला. दोन प्रकाशमय धोंडे त्याला आता स्पष्ट दिसत होते. धोंड्यांचा प्रकाश हळूहळू लुप्त होऊ लागला, तसा राजूच्या मेंदूवर झोपेचा अंमल चढू लागला.

सकाळी उठताच, रात्रीचा स्वप्नवत प्रसंग राजूला आठवला. तसाच वेगानं तो टेबलाकडे धावला. आत एक लहान व दुसरा मोठा धोंडा पाहून त्याचं हृदय धडधडलं. रात्री आपण जे काही पाहिलं ते खरंच असल्याची त्याची खात्री पटली. दोन्ही धोंडे त्यानं खिशात टाकले.

राजू शांतपणे आपली तयारी करून शाळेत निघून गेला. शाळेत येताच राजूनं शिक्षकांना, मित्रांना त्या धोंड्याविषयी सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्याचा हा नेहमीचाच विचित्रपणा असेल म्हणून त्यांनी टाळलं. तो निराश झाला. कुणीच ऐकत नाही म्हटल्यानंतर त्याची जास्तच घालमेल होऊ लागली. तो अस्वस्थ झाला.

त्याच दिवशी शाळेत विज्ञान मंडळातर्फे प्रसिद्ध विज्ञान कथाकार श्री. अनिल घोटे यांचं व्याख्यान होतं. त्यांनी अंतराळासोबतच परग्रहावरील जीवसृष्टीसंबंधीची कथा सांगितली. राजूनं त्यांची कथा बारकाईनं ऐकली. त्यानंतरचा राजूचा संपूर्ण दिवस अस्वस्थतेत गेला. त्यातच त्यानं एक ठाम निश्चय केला. राजूच्या ठाम निश्चयाला त्याच्या बाबांचाही पाठिंबा मिळाला. राजूच्या शाळेतील पाटीलसरांनी राजू व त्याच्या बाबांना प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. अनिल घोटे यांच्याकडे नेले.

त्यानंतर काही दिवसांनी डॉ. अनिल घोटे यांच्या समवेत त्यांचे शास्त्रज्ञ मित्र डॉ. कसबे व डॉ. पंडित हे

राजूच्या शाळेत आले. पाटीलसरांनी शाळेतील सर्व मुलांना पाहुण्यांची ओळख करून दिली. श्री. घोटे बोलू लागले, ''राजू अतिशय चलाख, चाणाक्ष व हुशार मुलगा आहे. कुठल्याही गोष्टीचा पाठपुरावा करण्याची त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. कुतूहलापोटी जमवलेल्या धोंड्यांविषयी सांगण्यासाठी राजू सहा दिवसांपूर्वी त्याच्या बाबांबरोबर माझ्याकडे आला होता. त्याच्या हातात धोंडे पाहून मलाही प्रथम त्याच्याविषयी शंका आली; पण पुढे धोंड्याविषयीचा अनुभव त्याने माझ्याजवळ सांगितला. त्यानं मी शहारलो. त्याच रात्री आम्ही प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. कसबे व डॉ. पंडितांकडे गेलो.'' डॉ. घोटेंनी डॉक्टरद्वयींकडे कटाक्ष टाकला. 'पुढचा प्रसंग तुम्हीच सांगा,' असा निर्देश करत डॉ. घोटे थांबले.

डॉ. कसबे सांगू लागले, ''राजूनं सांगितलेल्या अनुभवानं आम्हीही चरकलो. आमच्या समोरच ते दोन धोंडे त्यानं ठेवले होते. त्याच रात्री आम्ही संशोधनाला सुरुवात केली. हा तुमचा छोटा राजूही आमच्याबरोबर होता. त्या धोंड्यांतून आम्हांला धक्कादायक माहिती मिळाली. हे धोंडे दूरवर असलेल्या परग्रहावरील सजीव प्राणी होते, आपल्यापेक्षा कित्येक पटीने बुद्धिमान असे. असेच धोंडे अमेरिकेच्या एका प्रांतात सापडल्याची नुकतीच बातमी आली आहे. या धोंड्यांमध्ये पृथ्वीवरील सजीवांबरोबरच निर्जीव वस्तूही गिळंकृत करण्याची क्षमता होती. अगदी दगडंसुद्धा. त्यानंच त्यांचा उदरनिर्वाह होत होता. पर्यायानं प्रजननक्षमता वाढून त्याच्यापासून दुसऱ्या धोंड्यांची निर्मिती होऊ लागली होती. राजूनं हे शोधलं नसतं, तर काही वर्षांतच मानवाचं उच्चाटन झाल्याखेरीज राहिलं नसतं. त्यासाठीच धोंड्यांचा नायनाट करणं आवश्यक होतं. त्यात आम्ही यशस्वीही झालो. या सर्वांचं श्रेय राजूलाच आहे. त्याच्यामुळेच पृथ्वीवरील अरिष्ट टळलेलं आहे.''

***

## स्वाध्याय



### प्र. १. खालील आकृत्या पूर्ण करा.

(अ) राजूचे गुणविशेष

(आ) राजूला सापडलेल्या धोंड्याची वैशिष्ट्ये

(इ) शास्त्रज्ञ डॉ. पंडितांनी धोंड्याबद्दल सांगितलेली माहिती

### प्र. २. हे केव्हा घडले ते लिहा.

(अ) राजूला नवीन धोंड्याची गंमत वाटली.

(आ) प्रखर प्रकाशातही राजूचे आईबाबा झोपले होते.

(इ) राजूच्या मेंदूवर झोपेचा अंमल चढू लागला.

प्र. ३. चकाकणारा दगड सापडल्यानंतर राजूची झालेली मन:स्थिती, याबाबतचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

प्र. ४. राजूला दगड सापडल्यापासून त्याला शास्त्रज्ञ भेटेपर्यंत घडलेल्या गोष्टी क्रमाने लिहा.

प्र. ५. चौकसपणा व जिज्ञासूवृत्ती हे गुण तुम्हांला महत्त्वाचे वाटतात का? का ते सांगा.

## खेळूया शब्दांशी.

- कंसातील शब्द योग्य ठिकाणी वापरून रिकाम्या जागा पूर्ण करा.


(करडा, विचारशृंखला, अस्वस्थता, घालमेल)

(अ) लेखकांची........................ तुटल्यामुळे त्यांना खूप राग आला.

(आ) शिक्षकांचा ........................ कटाक्ष बघून विद्यार्थी एकदम शांत बसले.

(इ) वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर होताना संजयच्या मनात प्रचंड .................. होत होती.

(ई) रामरावांची ...................... बघून त्यांना ताबडतोब दवाखान्यात भरती केले गेले.



## खेळ खेळूया.

- खाली दिलेल्या चौकटींत म्हणी लपलेल्या आहेत, त्या ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | णा | श | त्या |
| का | ति | चा | ल |
| हा | मा | बै | रि |

| | | | |
|---|---|---|---|
| ए | भा | ना | ध |
| रा | क | ड | ध्या |
| भ | चिं | र | |

| | | | |
|---|---|---|---|
| ऐ | ज | चे | क |
| ना | का | वे | ना |
| म | रा | वे | चे |



## लिहिते होऊया.

- राजूला ज्याप्रमाणे अनोखा धोंडा सापडला, त्याप्रमाणे तुम्हांला कधी वेगळ्या वस्तू सापडल्या का? त्या कोणत्या?
- विद्यार्थ्यांनो, तुम्हांला आवडलेल्या राजूच्या कथेचा शेवटचा भाग हा काल्पनिक विज्ञानकथेचा भाग आहे. या पाठाचा शेवट बदलून वेगळ्या प्रकारे कथा पूर्ण करण्याचा तुम्ही प्रयत्न करा.
- दोन शास्त्रज्ञ व राजू यांच्यात काय बोलणे झाले असेल, ते संवादरूपाने लिहा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील शब्द वाचा.**

पाऊण, पाऊस, खरीप, बहीण, जमीन, मूल, रूळ, फूल, कठीण, देऊन, चूल, गरीब, सामाईक, माणूस.

वरील प्रत्येक शब्दातील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवले?

या प्रत्येक शब्दामधील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार नाहीत आणि शेवटून दुसऱ्या (उपान्त्य) अक्षरांतील इकार, उकार दीर्घ आहेत.

**जेव्हा मराठी शब्दांतील शेवटच्या अक्षरात काना, मात्रा, वेलांटी, उकार दर्शवलेले नसतात, तेव्हा शेवटून दुसऱ्या अक्षरांतील इकार, उकार दीर्घ लिहितात.**

वर दिलेल्या वर्णनानुसार किमान दहा शब्द लिहा.

**लक्षात ठेवा : तत्सम शब्दांतील शेवटून दुसऱ्या (उपान्त्य) अक्षरांतील इकार व उकार संस्कृतमधील मूळ शब्दांप्रमाणेच ऱ्हस्व लिहितात.**

उदा., नूपुर, चतुर, मानसिक, गुण, मंदिर, कुसुम, तरुण, प्रिय.

- **खालील चित्रांची नावे लिहा.**









### सुविचार

- **पुस्तकांच्या वाचनातून आपल्याला एकांतात विचार करण्याची सवय लागते आणि त्यातूनच खरा आनंद मिळतो. – डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**
- **काहीतरी करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीला या जगात अशक्य काहीच नाही. – अब्राहम लिंकन**
- **कष्ट आणि सेवा यांतच खरा आनंद आहे. दुसऱ्यांसाठी झटणाऱ्यांना खरा आनंद अनुभवता येतो. – सुभाषचंद्र बोस**

# मल्लखांब



साधा मल्लखांब

मल्लखांब हा वैशिष्ट्यपूर्ण असा महाराष्ट्रीय व्यायाम प्रकार आहे. कुस्तीमध्ये प्रावीण्य मिळवण्याच्या उद्देशाने मल्ल विशिष्ट लाकडी खांबावर अनेक कसरतीचे प्रकार करत असल्याने त्यास हे नाव पडले.

बाळंभटदादा देवधर हे मल्लखांबाचे जनक होत. कुस्तीगिराच्या अंगी ताकद, चपळता, लवचीकपणा, डावपेचात्मक सफाई इत्यादी गुणांच्या वाढीबरोबरच त्याचा दमही वाढावा, या उद्देशाने बाळंभटदादा देवधर यांनी मल्लखांबावरील निरनिराळे कसरतींचे व उड्यांचे प्रकार तयार केले.

मल्लखांबाचे आकार व प्रकार अनेक आहेत; पण सर्वसामान्यपणे प्रचलित असलेला साधा मल्लखांब हा २ ते २$\frac{१}{२}$ मीटर उंचीचा, शिसवी अथवा सागवानी लाकडाचा, वरच्या दिशेने निमुळता होत जाणारा असतो. अंग, मान व बोंड असे त्याचे तीन भाग असतात.

(१) **अंग–** मल्लखांबाच्या बुंध्यापासून मानेपर्यंतच्या निमुळत्या होत जाणाऱ्या भागास 'अंग' असे म्हणतात.

(२) **मान–** मल्लखांबाच्या अंगाच्या वर जो बारीक निमुळता नसलेला सरळ भाग असतो, त्याला 'मान' असे म्हणतात.

(३) **बोंड–** मल्लखांबाच्या सर्वांत वरच्या गोलाकृती भागास 'बोंड' असे म्हणतात.

**पूर्वीच्या मल्लखांबाचे प्रकार**

(१) वेताचा मल्लखांब
(२) हल्यारी मल्लखांब
(३) पलित्याचा मल्लखांब
(४) उसाचा मल्लखांब

**आताच्या मल्लखांबाचे प्रकार**

(१) पुरलेला मल्लखांब
(२) टांगता मल्लखांब
(३) दोरीचा मल्लखांब

मल्लखांबावरील कौशल्यांचे सोळा प्रकारांत वर्गीकरण केले आहे.

(१) अढी (२) तेढी (३) बगली (४) दसरंग (५) फिरकी (६) सुईदोरा (७) वेल (८) उतरती (९) झाप (१०) फरारे (११) आसने (१२) आरोहण-उड्या (१३) उड्या (१४) ताजवे (१५) सलाम्या (१६) चमत्कृतिजन्य कामे.

कुस्तीच्या कामी मल्लखांबाचा उपयोग कसा व किती होतो याचा अंदाज तुम्हांला आलाच असेल; पण त्याशिवाय नुसता व्यायामाचा प्रकार म्हणून देखील मल्लखांब फार वरच्या दर्जाचा मानला जातो. या व्यायामापासून आरोग्याचा चांगला लाभ होतो. यातील कौशल्ये करताना निरनिराळ्या प्रकारे शरीर वाकवून करायची असल्याने शरीराच्या आतील इंद्रियांच्या क्रिया सुधारतात. शरीराच्या सर्व भागांतील स्नायूंना उत्तम प्रकारे ताण पडून ते मजबूत होतात. या कौशल्यांमुळे शरीर लवचीक राहते. या शारीरिक कौशल्यांत पुष्कळ वेळा, खाली डोके वर पाय अशा स्थितीत राहावे लागते, त्यामुळे रक्ताभिसरणाचे कार्य सुधारते व आरोग्य चांगले राहते. थोडक्यात, आपल्या असे लक्षात येते, की शरीरातील विविध क्षमता विकसित करण्यासाठी मल्लखांब उपयुक्त आहे.

- तुम्हांला कोणता न कोणता तरी खेळ खेळायला नक्कीच आवडत असेल. खाली काही मुद्दे दिले आहेत. त्या आधारे तुमचे विचार लिहा.

तुमचा आवडता खेळ

येथे खेळाचे चित्र लावा.

१ हा कोणत्या प्रकारचा खेळ आहे? (वैयक्तिक/सांघिक)

२ हा कोणत्या स्वरूपाचा क्रीडा प्रकार आहे? (शारीरिक/बौद्‌धिक)

३ हाच खेळ तुम्हांला का आवडतो?

४ या खेळामध्ये किती खेळाडू असतात?

५ या खेळामुळे कोणते फायदे होतात?

६ या खेळात विजयी होण्यासाठी काय आवश्यक आहे?

७ या खेळामधील तुमचे प्रेरणास्थान कोण आहे?

## आपण समजून घेऊया.

कोणत्याही भाषेत सुरुवातीला खूप शब्द नसतात. जसजशी ती भाषा अनेक भागांत वापरली जाते तसतशी त्या भाषेतील शब्दसंख्या वाढू लागते. वेगवेगळ्या भाषांतील शब्द आपल्या भाषेत मिसळतात व ते इतके रूढ होतात, की हा शब्द आपल्या भाषेतील नाही, असे आपल्याला मुळीच वाटत नाही. कधी कधी आपण इतर भाषांतील शब्द आपल्या भाषेत जसेच्या तसे घेतो, तर कधी कधी शब्दांच्या मूळ रूपांत बदल करतो.

शब्द कसा बनतो म्हणजे सिद्‌ध होतो, हे पाहणे यास **शब्दसिद्‌धी** म्हणतात. आपल्या मराठी भाषेत अनेक भाषांतून आलेले शब्द समाविष्ट आहेत. मराठी भाषेची शब्दसंपत्ती विपुल आहे. त्यांत प्रामुख्याने तत्सम, तद्‌भव, देशी व परभाषीय अशा चार प्रमुख प्रकारांतील शब्द आहेत.

### (१) तत्सम शब्द

संस्कृत भाषेतील अनेक शब्द जसेच्या तसे म्हणजे त्यांच्या रूपांत काही बदल न होता मराठी भाषेत आले आहेत. असे शब्द म्हणजे **तत्सम शब्द** होय.

उदा., कन्या, पुत्र, पिता, पुष्प, जल, भगवान, भूगोल, परंतु.

### (२) तद्‌भव शब्द

संस्कृत भाषेतील अनेक शब्द जसेच्या तसे न येता, त्यांच्या रूपांत काही बदल होऊन मराठी भाषेत आले आहेत. असे शब्द म्हणजे **तद्‌भव शब्द** होय.

उदा., गाव (ग्राम), दूध (दुग्ध), हात (हस्त), कान (कर्ण), पान (पर्ण), कोवळा (कोमल).

### (३) देशी शब्द

जे शब्द अन्य भाषांतून आलेले नाहीत, अशा मूळ शब्दांना **देशी शब्द** म्हटले जाते.

उदा., चिमणी, वांगे, झोप, डोळे, दगड, झाड, हाड, बाजरी, गुडघा.

### (४) परभाषीय शब्द

जसे संस्कृतमधील शब्द आपल्या मराठी भाषेत आढळतात, तसेच संस्कृतशिवाय इतर भाषांतील शब्ददेखील मराठीत समाविष्ट झालेले आहेत. असे शब्द म्हणजे **परभाषीय शब्द** होय.

उदा., टेबल, पेन, इनाम, तारिख, बटाटा.

- **कानडी, इंग्रजी, तेलुगू, पोर्तुगीज, फारसी, अरबी, हिंदी, गुजराती अशा भाषांतून आलेल्या शब्दांची काही उदाहरणे पाहूया.**

| हिंदी | कानडी | इंग्रजी | पोर्तुगीज | फारसी | अरबी | तेलुगू | गुजराती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दाम | भाकरी | बॅट | पगार | पेशवा | मेहनत | अनारसा | डबा |
| करोड | गुढी | पेन | बटाटा | अत्तर | इनाम | चेंडू | दादर |
| मिठाई | विळी | टेबल | पेरू | कामगार | हुकूम | गदारोळ | शेट |
| भाई | ताई | फी | चावी | सामान | अर्ज | ताळा | घी |
| बेटा | अडकित्ता | डॉक्टर | कोबी | हकीकत | जाहीर | | रिकामटेकडा |
| | | बस | | | | | |
| | | फाइल | | | | | |

# २०. विचारधन



**महर्षी धोंडो केशव कर्वे :** हे 'अण्णासाहेब कर्वे' म्हणून ओळखले जात. समाजसुधारणेच्या कामात ते हिरिरीने भाग घेत. हिंगणे स्त्रीशिक्षण संस्था, एस. एन.डी. टी. महिला विद्यापीठ या संस्था त्यांच्या प्रयत्नांनी नावारूपाला आल्या. त्यांनी केलेल्या समाजसेवेच्या गौरवार्थ आपल्या भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' हा किताब दिला.

**त्यांचे विचार–** 'विद्यार्थी व विद्यार्थिनी हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. त्यांनी दोन गोष्टी सतत ध्यानी बाळगाव्यात.

(१) गतानुगतिक वृत्ती टाकून स्वतंत्र विचार करायला त्यांनी शिकावे, मात्र हे लक्षात ठेवले पाहिजे, की आपल्याला स्वतंत्र विचार करण्याचा जसा हक्क आहे तसाच तो इतरांनाही आहे.

(२) मनाचा समतोलपणा राखावा.

केव्हाही मनाचा समतोल ढळता कामा नये. हा तोल सावरणे ही कठीण गोष्ट आहे. हा तोल सांभाळला नाही, म्हणूनच जगात मोठमोठे अनर्थ घडून आलेले आहेत. मनाचा समतोल सांभाळून व भावनांच्या आहारी न जाता, आपल्याला पटलेली गोष्ट धैर्याने आचरणात आणणारी माणसेच आपले हे स्वराज्य टिकवू शकतील.

समतेचे तत्व आचरणात आणणारी व भेदाभेद न मानणारी माणसे मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय या देशाचा उद्‌धार होणार नाही, अशी माझी ठाम खात्री आहे.'



**नामदार गोपाळ कृष्ण गोखले :** हे लोकमान्य टिळकांचे समकालीन. उदारमतवादी म्हणून ते प्रसिद्ध होते. विधायक कार्य करणाऱ्या अनेक संस्थांना त्यांनी चालना दिली. त्यांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली. 'भारत सेवक समाज' या नावाने आता ती परिचित आहे. गोपाळ कृष्ण गोखले यांना महात्मा गांधी गुरुस्थानी मानत.

**त्यांचे विचार–** 'आज सर्वांत अधिक गरज असेल, तर ती देशाच्या चारी कोपऱ्यांत ऐक्याची नि देशभक्तीची शिकवण देणाऱ्या कार्यकर्त्यांची. देशप्रेम इतके पराकोटीला पोहोचायला हवे, की केवढाही त्याग करायला लागो तो आनंददायी वाटला पाहिजे. आज त्यागाची अधिक जरूर आहे. बोलणे नको, काम हवे! आपण सारे भाऊ भाऊ आहोत. आपण सारे हिंदी आहोत. धर्म आणि पंथ यांत गुरफटून जाऊ नका. समाजाची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी राष्ट्रीय चारित्र्यही हवे. आज नैतिक सामर्थ्य कमी होत आहे. संकुचित भावना आणि क्षुद्र विचार यांची मगरमिठी न सोडवू तर भाग्योदय कसा होणार? आपल्या सर्व कामांत शिस्त, स्वार्थत्याग व कुशलता हे गुण प्रामुख्याने हवेत.

राष्ट्राची उभारणी हे सोपे काम नाही. त्यासाठी सबंध आयुष्य द्यावे लागते. आपण खत होऊया, भावी पिढी पीक घेईल.'

# २१. संतवाणी

- ऐका. वाचा. म्हणा.

C5PRB1

**पंढरी नगरी दैवत श्रीहरी । जाती वारकरी व्रतनेमें ।।१।।**
**आषाढी कार्तिकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करिती तेथें ।।२।।**
**साधुसंत थोर पताकांचा भार । मुखीं तो उच्चार नामामृत ।।३।।**
**आनंदाचा काला गोपाळकाला केला । हृदयीं बिंबला नरहरी ।।४।।**

**– संत नरहरी सोनार**

**संत नरहरी सोनार** – संत नरहरी सोनार हे महाराष्ट्रातील थोर संत कवी होते. प्रस्तुत अभंगात आषाढी-कार्तिकी वारी करून पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला नित्यनेमाने जाणाऱ्या वारकऱ्यांचे वर्णन केले आहे.

**माझें माहेर पंढरी । सुखें नांदु भीमातीरीं ।।१।।**
**येथें आहे माय बाप । हरे ताप दरुशनें ।।२।।**
**निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरींची ।।३।।**
**कैशी विटेवरी शोभली । पाहुनि कान्होपात्रा धाली ।।४।।**

**– संत कान्होपात्रा**

**संत कान्होपात्रा** – संत कान्होपात्रा या महाराष्ट्रातील थोर संत कवयित्री.

प्रस्तुत अभंगात कान्होपात्रा म्हणतात, की 'माझे माहेर पंढरपूर आहे. तिथे भीमा नदीच्या तीरावर सुख, आनंद आहे. पांडुरंग हे माझे आईवडील आहेत. विटेवर उभ्या असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनाने माझ्या मनातील चिंता, व्यथा, तळमळ दूर होते.'

# शब्दार्थ

पाठ्यपुस्तकातील पाठ, कविता व बोली यांमध्ये आलेले कठीण शब्द, वाक्प्रचार व त्यांचे अर्थ येथे दिलेले आहेत. दिलेले शब्द व वाक्प्रचार यांची मांडणी विद्यार्थ्यांनी वहीत शब्दकोशाप्रमाणे करावी.

◆ **जय जय महाराष्ट्र माझा (गीत)**

**तट्टू** – लहान घोडा. **जबाब** – उत्तर. **निढळ** – कपाळ, ललाट. **तक्त** – तख्त, सिंहासन.

◆ **स्वप्नं विकणारा माणूस**

**तुच्छ लेखणे** – तिरस्कार करणे, कमी लेखणे. **कुतूहल** – उत्सुकता. **ऐट**– तोरा, मिजास. **गराडा पडणे** – गर्दी होणे. **दिलखेच** – मनाला आकर्षित करणारे. **मती कुंठित होणे** – विचारप्रक्रिया थांबणे. **संभ्रमात पडणे** – गोंधळात पडणे. **तल्लीन होणे** – मग्न होणे. **तरतरी पेरणे** – उत्साह निर्माण करणे. **भरभरून बोलणे** – तोंडभरून बोलणे. **ढब** – शैली. **गहिवरून येणे** – कंठ दाटून येणे.

◆ **तोडणी**

**मनात काहूर उठणे** – कावरेबावरे होणे. **झिरा** – झरा. **पाचूंदा** – कडब्याचा पाच पेंढ्यांचा गट. **सरमड** – बाजरीचे ताट, कडबा. **तांबडं फुटणे** – सकाळ होणे. **काकडून निघणे** – थंडीने गारठणे. **पाचट** – उसाचा वाळलेला पाला, चिपाड. **हबकून जाणे** – धक्का बसणे. **उलघाल होणे** – अस्वस्थ, बेचैन होणे. **आबाळ होणे** – हेळसांड होणे. **पैकं** – पैसे. **आनंदाला पारावार न उरणे** – खूप आनंद होणे.

⦿ **भाषेचा नमुना**

**अहिराणी बोली**

**नही** – नाही. **सिकेल** – शिकलेला. **टाप** – हिंमत. **पाळी** – वेळ. **घरना** – घरचा **गावनाभी** – गावचा. **भायेरल्याज** – बाहेरच्या. **उट्यारेट्या** – चौकश्या. **बांधवरथून** – बांधावरून. **कज्या** – भांडणे. **मिटाडाले** – मिटवायला. **रातलेभी** – रात्रीसुद्धा. **याळम्हान कव्हळज** – दिवसभरात कधीही. **आत्तेज** – आत्ताच. **धुयेल** – धुतलेले. **धुवळाफूल** – पांढरेशुभ्र. **टार्च** – कडक. **बसीसन** – बसून. **फोपाटा** – धूळ.

◆ **श्रावणमास (कविता)**

**हर्ष** – आनंद. **मानसी**– मनाला, मनास. **शिरवे** –पावसाच्या सरी. **नभोमंडपी** – आकाशरूपी

मंडपात. **जलद** – मेघ. **बलाकमाला** – उडणाऱ्या बगळ्यांची रांग. **अवनी** – पृथ्वी. **पावा** – बासरी. **गाय** – गात. **सुवर्णचंपक** – सोनचाफा. **विपिनी** – अरण्यात, वनात. **भामा** – सत्यभामा, श्रीकृष्णाची पत्नी. **रोष** – राग. **पुरोपकंठी** – नगराजवळील बागेत. **ललना** – स्त्रिया.

### ◆ भांड्यांच्या दुनियेत

**कोठीची खोली** – धान्य साठवण्याची खोली. **नित्योपयोगी** – नेहमी उपयोगात असणारी. **काठवट** – पीठ मळण्यासाठी वापरली जाणारी लाकडी परात. **प्रगल्भ** – परिपक्व.

### ◆ थोरांची ओळख – डॉ. खानखोजे

**खलबत** – गुप्त चर्चा. **पर्वणी** – दुर्मीळ संधी.

### ◆ माझी मराठी (कविता)

**ऋण** – उपकार. **उतराई होणे** – ऋणातून मुक्त होणे. **लोहापरी** – लोखंडाप्रमाणे. **गंध** – सुवास. **अमृत** – सुधारस. **प्राशन करणे** – पिणे. **वर्णावी** – वर्णन करावी.

### ◆ गचकअंधारी

**पंचक्रोशी** – चार-पाच कोसांच्या आतील गावे. **मेटाकुटीला येणे** – रडकुंडीला येणे. **गिल्ला करणे** – गोंधळ करणे. **झुंजूमुंजू** – पहाटेचा संधिप्रकाश. **वक्ती** – वेळेस. **कोला** – कोल्हा. **पुळे** – पुढे. **भेव** – भीती. **युक्ती फळाला येणे** – यशस्वी होणे. **हिव भरणे** – थंडीने गारठून जाणे. **प्रभा फाकणे** – सकाळ, सूर्योदय होणे. **शंकेची पाल चुकचुकणे** – शंका निर्माण होणे. **करुणा भाकणे** – दयेची याचना करणे. **दरदरून घाम फुटणे** – खूप भीती वाटणे. **जिवात जीव येणे** – निश्‍चिंत होणे. **सुसाट पळत सुटणे** – वेगाने पळत सुटणे.

### ◆ नात्याबाहेरचं नातं

**झंकार** – मंजूळ नादयुक्त आवाज. **आगेकूच** – वाटचाल. **हुडहुडी** – थंडी, गारवा. **भास होणे** – समज होणे. **नखशिखान्त** – पायाच्या नखांपासून डोक्यापर्यंत. **न्याहाळणे** – एकाग्रतेने, बारकाईने पाहणे. **कणव निर्माण होणे** – दया निर्माण होणे. **भुरळ घालणे** – आकर्षित करणे. **काळजात धस्स होणे** – भीतीने धक्का बसणे.

## ◆ गोमू माहेरला जाते (गीत)

**नाखवा** – मुख्य नावाडी. **घोव** – पती, नवरा. **खाडी** – नदीत समुद्राचे पाणी जेथवर येते तो भाग. **ताटवा** – फुलझाडांचा मांडव, वाफा. **शहाळी** – कोवळे नारळ. **मापवणे** – मोजणे. **झणी** – लवकर. **गलबत** – होडी, नौका.

## ⦿ भाषेचा नमुना

### सामवेदी बोली

**यासॉ** – येत असे. **उगडलॉ** – उघडला. **वाशीली** – वाचली. **जकल्या** – सगळ्या. **मरॅशे** – मरणार आहोत. **बग्यादो** – बघण्यासाठी. **वेळूस** – वेळ. **नॉतो** – नव्हता. **आटपॉन** – आटपून. **खाट्येऑर** – खाटेवर. **आयकॉ**– ऐकायला. **भॉठो** – मोठा. **खांबोरसॉ** – खांबावरील. **बारझाड** – झाडताना. **घरोर** – घरावर. **टुकीलॉ** – पाहिला.

## ◆ बाली बेट

**कंठा** – गळ्यातील सोन्या-मोत्यांचा हार. **कंठमणी** – गळ्यातल्या हारातील सर्वांत मोठे रत्न. **उभयता** – दोघे. **राई** – बन. **परिसमाप्ती** – शेवट. **अश्राप** – सभ्य, गरीब. **मिस्कीलपणे** – खट्याळपणे. **भाट** – स्तुती गाणारे, स्तुतिपाठक.

## ◆ सलाम-नमस्ते !

**दुर्मीळ** – मिळण्यास कठीण. **मन हेलावणे** – दु:ख वाटणे. **बावरणे** – गोंधळून जाणे. **थक्क होणे** – आश्चर्यचकित होणे. **पचनी पडणे** – मानवणे, आत्मसात होणे.

## ◆ अनाम वीरा... (कविता)

**अनाम वीर** – अज्ञात सैनिक. **जीवनान्त** – जीवनाचा शेवट. **समर** – युद्ध, लढाई. **देशाकाशीं** – देशाच्या आकाशात. **विलीन होणे** – सामावून जाणे. **रियासत** – वतन. **तुशें** – तुझे. **मृत्युंजय** – मृत्यूवर विजय मिळवणारा.

## ◆ कवितेची ओळख

**काव्यप्रतिभा** – काव्यनिर्मितीची शक्ती. **प्रकल्प** – विशिष्ट कालावधीसाठी करण्यास दिलेले काम. **सांजवात** – संध्याकाळच्या वेळी लावलेला दिवा. **पाश सोडणे** – बंधनातून मुक्त होणे. **हेका धरणे** – हट्ट करणे. **भावनांचे मोहोळ चेतवणे** – भावना जागृत करणे.

## ◆ असे जगावे (कविता)

**नजर रोखणे** – निर्भयपणे पाहणे. **गुलामी** – दास्यत्व. **दांडगी इच्छा** – प्रबळ इच्छा. **कवेत अंबर घेणे** – अशक्य गोष्ट शक्य करणे. **काळीज काढून देणे** – प्रिय गोष्ट दुसऱ्याला देणे, समर्पण करणे. **ठणकावून सांगणे** – न घाबरता सांगणे. **कठोर** – दयाशून्य, निष्ठुर.

## ◆ कोळीण

**सुगावा लागणे** – शोध लागणे. **कमान** – अर्धवर्तुळाकार. **गुंग होणे** – मग्न होणे. **गूढ** – रहस्य. **दबा धरणे** – हल्ला करण्यासाठी लपून बसणे. **प्रतीक्षा करणे** – वाट पाहणे. **असहाय** – हतबल. **पारध होणे** – शिकार होणे. **सोबग** – एक प्रकारचा कीटक. **उत्कंठा** – उत्सुकता. **तटस्थ** – उदासीन. **मागमूस नसणे** – माहीत नसणे. **अकस्मात** – अचानक. **प्रतवारी** – वर्गवारी.

## ◆ थेंब आज हा पाण्याचा (कविता)

**मोल** – मूल्य. **कोती** – संकुचित वृत्तीचे. **चाळा** – नाद, सवय. **ठगणे** – फसवले जाणे.

## ◆ वदनी कवळ घेता...

**रेलचेल** – समृद्धी, विपुलता. **अपव्यय** – वाया घालवणे. **नासाडी** – नासधूस. **यजमान** – समारंभाचे प्रमुख आयोजक. **अवाजवी** – आवश्यकतेपेक्षा जास्त. **दिलासा मिळणे** – आधार मिळणे.

## ◆ धोंडा

**भंडावून सोडणे** – हैराण करणे. **धास्तावणे** – घाबरणे. **भिरकावणे** – फेकणे. **लुप्त होणे** – गायब होणे. **पाठपुरावा करणे** – मागोवा घेणे. **अरिष्ट** – संकट.

## ◆ विचारधन

**हिरिरीने भाग घेणे** – उत्साहाने भाग घेणे. **नावारूपाला येणे** – लौकिक प्राप्त होणे. **समकालीन** – समान काळातील.

## ◆ संतवाणी

**व्रतनेमें** – नित्यनेमाने. **बिंबणे** – ठसणे. **निवारणे** – दूर करणे. **व्यथा** – दु:ख. **धाली** – संतुष्ट झाली.

***

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

---

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ७ वी (मराठी) ₹ ४६.००